संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ पाने १२ (६+६) किंमत ३ रुपये अहिल्यानगर, शुक्रवार दि. ०९.०५.२०२५ अंक नं. ३३ वर्ष ६८ वे दैनिक वर्ष ६२ वे ANR/022/2018-2020

महेंद्र पेडावाला

रजवाडी गुजराती थाळी

दर रविवारी दालबाटी व चुरमा व दररोज आमरसचा बेत

हापुस आमरस 400/- किलो

ट्रेन पार्सल, किटी पार्टी व बर्थडे पार्टी सुविधा उपलब्ध.

कापड बाजार, अहिल्यानगर. पार्सल सुविधा उपलब्ध...

## शोक मिलन



**स्व. राजेंद्र शांतीलालजी मुनोत**

कळविण्यात अत्यंत दुःख होते की, श्री. राजेंद्र शांतीलालजी मुनोत यांचे गुरुवार दि. ८ मे २०२५ रोजी दुःखद निधन झाले.

• शोक मिलन •
शुक्रवार दि. ९ और शनिवार दि. १० मई २०२५
समय : शाम ५ से ८ बजे
**स्थळ : २८, स्नेह बंगलो, आदर्श कॉलनी,** अजय गॅस मागे, माणिकनगर, अहिल्यानगर.

**विनोद मुनोत एवंम् मुनोत परिवार**
**सचिन कटारिया, प्रतिक मुथा**
**लुणिया - मुनोत ॲण्ड कंपनी**
**प्रमोद गांधी, विनय गांधी एवंम्**
**एस.बी. गांधी परिवार**

---

आपल्या विचारांचा वारसा
जपत राहू निरंतर..



मा. केंद्रीय मंत्री
**मा.खा. दिलीपजी गांधी साहेब**
(जन्म दि. ९ मे १९५१)
जयंती दिनी विनम्र आदरांजली

श्रीमती सरोज गांधी । श्रीमती छाया गांधी
अनिल गांधी - संगीता गांधी
स्वानंद नवसारीकर - सौ. स्मिता नवसारीकर
देवेंद्र गांधी - सौ. प्रगती गांधी । सुवेंद्र गांधी - सौ. दीप्ती गांधी
पंकज गांधी - सौ. पल्लवी गांधी - रवींद्र गांधी - सौ. सुरूची गांधी
चि. वेदिका, जस्विल, पलक व चि. राजवीर, ईशान, पार्थ
व्हेरा एल.ई.डी. लाईट प्रा. लि. । चैतन्य ॲक्वा लि.
सुवेंद्र एन्टरप्राईजेस । मनसुख मिल्क प्रा. लि.

**गांधी परिवार**

---



## काका
सदैव आठवणीत...

अहिल्यानगरचे ज्येष्ठ नेते व माजी आमदार आदरणीय
**स्व.अरुणकाका बलभीमराव जगताप** यांना
भावपूर्ण श्रद्धांजली

* दशक्रिया विधी *
रविवार दि. ११ मे २०२५ रोजी सकाळी ७ वा.
अमरधाम, नालेगाव, अहिल्यानगर येथे

* शोकाकुल *
**दगडूमामा पवार व पवार परिवार**
अहिल्यानगर

---

फक्त फायदाच फायदा !

खरेदीवर पॉइंट पॉइंट्सवर गिफ्ट

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™


संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

12वी तील यशस्वी विद्यार्थ्यांसाठी
गोल्डन ऑफर

चेन व अंगठी खरेदीवर मिळवा
आपल्याला मिळालेल्या टक्केवारीएवढी
मजुरीत सूट*
योजना 9 मे 2025 पर्यंत लागू.
योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी आपल्या मुळ मार्कशीटची झेरॉक्स प्रत स्वतः घेवून येणे आवश्यक.

चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड,
सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

---



## काका
तुम्ही कायम आमच्या
आठवणीत अमर राहाल..

अहिल्यानगरचे ज्येष्ठ नेते व माजी आमदार आदरणीय
**स्व.अरुणकाका बलभीमराव जगताप** यांना
भावपूर्ण श्रद्धांजली

* दशक्रिया विधी *
रविवार दि. ११ मे २०२५ रोजी सकाळी ८ वा.
अमरधाम, नालेगाव, अहिल्यानगर येथे

* शोकाकुल *
बाबुराव नारायण काकडे,
सुजित बाबुराव काकडे, अजित बाबुराव काकडे
केडगांव, अहिल्यानगर


आमरसासह
राजस्थानी थाळी
स्वादिष्ट.. रुचकर
भोजनाचा आस्वाद घ्या..
लोकसेवा प्युअर व्हेज
एम.जी.रोड,अहमदनगर. फोन : 2327060, 9850799850






# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा



अत्याधुनिक नेत्र शिबीर
चष्मा घालवा कायमचा
* कॉन्टयूरा व्हिजन * मोतिबिंदू * काचबिंदू * नेत्ररोपण
मोफत नेत्रतपासणी सवलतीच्या दरात लेसर नेत्रशस्त्रक्रिया
शनिवार सकाळी १० ते १
वर्धमान, माणिक चौक, अ नगर ४१४००१
डॉ. कांकरियांचे साई सूर्य नेत्रसेवा
दृष्टी साजरी करा
Help line 9112288611 / 8888982222



रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने १२ (६+६) | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. ०९.०५.२०२५ | अंक नं. ३३ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020





## लोकनेते

अहिल्यानगरचे ज्येष्ठ नेते व माजी आमदार आदरणीय

## स्व.अरुणकाका बलभीमराव जगताप

यांना भावपूर्ण श्रध्दांजली

* दशक्रिया विधी *
रविवार दि. ११ मे २०२५ रोजी सकाळी ७ वा.
अमरधाम, नालेगाव, अहिल्यानगर येथे


* शोकाकुल *

**अंबादास (लिंबाशेठ) नागरगोजे । गहिणीनाथशेठ नागरगोजे**

**अंबिका उद्योग समुह अहिल्यानगर**



चंद्र सूर्य तारे आहे तोपर्यंत
असेल तुमची किर्ती..
मनामनात राहील
सदैव तुमची मूर्ती..



अहिल्यानगरचे ज्येष्ठ नेते व माजी आमदार आदरणीय

## स्व. अरुणकाका जगताप

यांना भावपूर्ण श्रध्दांजली

* दुःखांकित *

गितांजली सुनिल काळे
माजी उपमहापौर, म.न.पा. अहिल्यानगर

सुनिल काळे, सुभाष काळे, विनायक काळे
अभिजीत काळे, सागर काळे, तेजस काळे, विराज काळे

**समस्त काळे परिवार**





अहिल्यानगरचे ज्येष्ठ नेते व माजी आमदार आदरणीय

## स्व. अरुणकाका जगताप

जो आवडे सर्वांना
तोच आवडे देवाला

यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

* दुःखांकित *

**मे. ए.पी. सोनीमंडलेचा**
(माकावाला)

**अशोक सोनीमंडलेचा । अनुज सोनीमंडलेचा**

**एवम् सोनीमंडलेचा परिवार**

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## प्रेरणादायी अक्षरधन...

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१



### ये रे ये रे पावसा.. यंदाचा शुभ अंदाज

सध्या महाराष्ट्रात सूर्य आग ओकतोय. मे च्या अगोदरच पारा ४५ च्या वर पोहोचलाय. काही भागात अवकाळी व गारांचा पाऊस झाला असला तरी बहुसंख्य शहरात उष्णतेच्या लाटा चालू आहेत.

प्रचंड वाळू उपसा, रस्त्यांचे काँक्रिटीकरण, झाडांची बेसुमार कत्तल, पर्यावरणाचा तोल ढासळू देतोय. जलशिवाराचा प्रचार प्रसार असूनही गावागावांत, वाडीवस्त्यांत पाण्याची तीव्र टंचाई भासत आहे. शासन, प्रशासन, राज्यकर्ते, विरोधी पक्ष इ. या नैसर्गिक, सामाजिक जीवनमरणाचा प्रश्न ठरू शकणाऱ्या विषयांवर किती गंभीर आहे. अशा दाहक उन्हाळ्यानंतर पुन्हा दुष्काळाचे सावट पडू लागले तर... तर काय?

सुदैवाने यंदा चांगला मान्सून होणार असल्याची सुवार्ता हवानाम खात्यासह स्कायमेटनेही दिली आहे. जून ते सप्टेंबर साधारणतः चारही महिन्यात मौसमी पावसासाठी प्रादेशिक व जागतिक हवामानविषयक स्थिती अनुकूल राहण्याचा अंदाज आहे.

यंदा प्रशांत महासागरात 'लानिना' स्थिती जाऊन 'तटस्थ स्थिती' निर्माण झाली आहे. त्यामुळे मान्सूनच्या ४ महिन्याची परिस्थिती अनुकूल राहील असा कयास आहे.

अर्थात हा प्राथमिक अंदाज असून, हा पाऊस सर्वदूर व व्यापक प्रमाणात होणार की खंडीत स्वरूपात कुठे कमी तर कुठे प्रचंड इ. हे येणार मान्सून सांगेलच.

पाण्याचा दुरुपयोग, गैरवापर करण्यात भारतात वैश्विक विक्रम होतच असतात. अमेरिका व चीन मिळून जेवढा भूजलाचा वापर करतात त्या तुलनेत भारताचा वापर अनेक पटींनी जास्त आहे. अनेक नद्यांचे रुपांतर छोट्या नाल्या-गटारांत झाले आहे. रेनवॉटर हार्वेस्टिंगचा तर आनंदच आहे. पाणी अडवा-पाणी जिरवा, झाडे लावा-झाडे वाढवा, प्रत्येक गावात जलशिवार या गोष्टी अजूनही कृतीशील गांभीर्याने न घेतल्यास पुढच्या मारामाऱ्या अटळ असतील.

# अनेक वर्ष जुनं डेरेदार असं उंबराचं झाड महापालिकेने तोडले

### महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून प्रशासनाचा निषेध, अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी

नगर - शहरातील आण्णाभाऊ साठे चौकातील अनेक वर्ष जुनं डेरेदार असं उंबराचं झाड महापालिकेने कोणाचीही तक्रार नसताना तोडले ९ मे रोजी तोडले आहे. त्यामुळे मनसेने तीव्र संताप व्यक्त करत महापालिका प्रशासनाचा निषेध केला आहे. तसेच हे झाड तोडायला लावणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणीही मनसे विद्यार्थी सेनेचे राज्य उपाध्यक्ष सुमित वर्मा यांनी केली आहे.

याबाबत बोलताना सुमित वर्मा म्हणाले, शहरभर ढोल वाजवत मनपा आयुक्त वसुंधरा अभियानाचे फोटो सेशनमध्ये स्वतःचा चमकोपणा करत असतात पण प्रत्यक्षात कृतीमध्ये भर उन्हाळ्यामध्ये डेरेदार असं अण्णाभाऊ साठे चौकातील अनेक वर्ष जुनं असं उंबराचं झाड तोडण्यात आले. रस्त्याचा कोणताही अडथळा नसताना कोणत्यातरी निष्कर्मी राजकीय माणसाच्या दबावाला बळी पडून मनपा प्रशासनाने उद्यान विभागाच्या अधिकाऱ्यांनी ९ मे रोजी कोणत्याही तक्रारी विना आणि कोणत्याही परवानगी विना हे झाड तोडले, याचा आम्ही महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने जाहीर निषेध करतो. एकीकडे वसुंधरेचा ढोंग करायचं आणि दुसरीकडे त्याच वसुंधरेचा अपमान करायचा हा कोणता प्रकार. आता तर झाड तोडले आहे, पण आता ते खोड जर त्या ठिकाणावरून हलवलं तर गाठ महाराष्ट्र नवनिर्माण सेनेशी आहे, असा इशाराही वर्मा यांनी दिला आहे.

नगर महानगरपालिकेला पुण्यासारख्या महापालिकेकडून काहीतरी शिकायला हवं, रस्त्याच्या मध्ये जर झाड येत असेल तर रस्ता झाडाच्या बाजूने काढायला हवा पण झाडाला धक्का लागता कामा नये. या विचारासाठी त्या लायकीचे अधिकारी लागतात. आपल्याकडे फक्त झटपट काम कसं होईल याच विचाराचे अधिकारी आहेत याचं वाईट वाटतं. महानगरपालिकेचे वसुंधरा अभियान म्हणजे निव्वळ दिखाऊ पणा असून, प्रशासनाने आता महापालिकेच्या लोगो मध्ये निरंतर नगरसेवा ऐवजी निरंतर गैर सेवा हे वाक्य लावावे असे म्हणत सुमित वर्मा यांनी महानगरपालिका प्रशासनाचा जाहीर निषेध केला.



शहरातील आण्णाभाऊ साठे चौकातील अनेक वर्ष जुनं डेरेदार असं उंबराचं झाड महापालिकेने तोडले असल्याचे छायाचित्रात दिसत आहे.

# आयपीएलचे सामने अनिश्चित काळासाठी स्थगित

### भारत-पाकिस्तान तणावामुळे बीसीसीआयचा निर्णय, विदेशी खेळाडूंना त्यांच्या देशात जायला सांगितले

मुंबई - भारत आणि पाकिस्तानमधील तणावपूर्ण वातावरणामुळे आयपीएल २०२५ अनिश्चित काळासाठी पुढे ढकलण्यात आले आहे. दोन्ही देशांमधील तणाव सतत वाढत आहे आणि लष्कराने जबाबदारी स्वीकारली आहे. आयपीएलचा अंतिम सामना २५ मे रोजी कोलकाता येथे होणार होता परंतु देशातील युद्धजन्य परिस्थितीमुळे तो रद्द करण्यात आला. तसेच विदेशी खेळाडूंना त्यांच्या देशात जायला सांगण्यात आले आहे.

याबाबत बीसीसीआयच्या अधिकाऱ्याने पीटीआयला सांगितले - देशात युद्ध सुरू असताना आपण क्रिकेट खेळत राहणे चांगले वाटत नाही. याचा अर्थ असा की देशाची सुरक्षा खेळांपेक्षा जास्त महत्त्वाची आहे. लखनौ सुपर जायंट्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यातील सामना ९ मे रोजी एकाना स्टेडियमवर होणार होता. पण आता असे होणार नाही. ८ मे रोजी पंजाब किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यातील आयपीएल सामनाही सुरक्षेच्या कारणास्तव रद्द करण्यात आला.

८ मे रोजीच, भारतीय सैन्याने रात्री नियंत्रण रेषेवर आणि आंतरराष्ट्रीय सीमेवर मोठ्या काउंटर-ड्रोन ऑपरेशनमध्ये ५० हून अधिक पाकिस्तानी ड्रोन पाडले होते. पाकिस्तानने भारतात ड्रोन पाठवण्याचा प्रयत्न केला पण तो अयशस्वी झाला. या घटनांनंतर आयपीएल रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. देशाची सुरक्षा प्रथम येते म्हणून हा निर्णय घेण्यात आला. खेळ नंतरही होऊ शकतो, पण देश सुरक्षित राहिला पाहिजे. देशातील सध्याच्या वातावरणात क्रिकेट खेळणे योग्य नाही. त्यामुळे आयपीएल २०२५ रद्द करण्यात आली आहे. परिस्थिती सामान्य झाल्यावरच ते पुन्हा सुरू केले जाईल.

यापूर्वी, आयपीएल प्रमुख अरुण धुमल यांनी ८ मे रोजी रात्री एका निवेदनात म्हटले होते - आम्ही सरकारच्या सूचनांची वाट पाहत आहोत. लवकरच निर्णय घेतला जाईल. अरुण धुमल यांच्या गृहनगर धर्मशाला येथे पंजाब किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यातील सामना १०.१ षटकांनंतर रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. दरम्यान, भारतीय कर्णधार रोहित शर्मानेही भारतीय सैन्याला पाठिंबा दिला आहे. आता आयपीएलचे १६ सामने बाकी आहेत.

# मोबाईलमध्ये अश्लिल व्हिडिओ दाखवून महिलेशी गैरवर्तन

नगर - मोबाईलमध्ये अश्लिल व्हिडिओ दाखवून एका महिलेशी गैरवर्तन केल्याची घटना भिंगार उपनगरात घडली. या प्रकरणी २९ वर्षीय पीडित महिलेने दिलेल्या फिर्यादीवरून भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. साद फकीर महमंद शेख (रा. ब्रम्हतळे, आलमगीर) असे गुन्हा दाखल झालेल्या संशयित व्यक्तीचे नाव आहे.

सदर घटना ७ मे रोजी दुपारी १२.३० वाजता घडली. फिर्यादीच्या घरातील लाईट वायरिंग आणि लाईट बोर्ड दुरूस्ती करण्यासाठी आलेल्या साद फकीर महमंद शेख याने तिच्यासमोर त्याच्या स्मार्टफोनवरून अश्लिल (पोर्न) व्हिडिओ दाखवला. यानंतर त्याने तिचा उजवा हात पकडून तोंड दाबले आणि तिच्यावर जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केला. शेखच्या या वर्तनामुळे फिर्यादीस लज्जा उत्पन्न झाली. दरम्यान, सदरचा प्रकार घडल्यानंतर पीडिताने लगेच भिंगार कॅम्प पोलीस ठाणे गाठून पोलिसांना घडलेला प्रकार सांगितला. पीडिताने दिलेल्या फिर्यादीवरून पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

या घटनेची माहिती मिळताच कॅम्प पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर यांनी पथकासह घटनास्थळी भेट दिली. पोलीस अंमलदार बी. एस. म्हस्के अधिक तपास करीत आहेत.

# घरासमोर लावलेल्या मोटारसायकलची चोरी

नगर - घराचे समोर रस्त्यालगत लावलेली होंडा कंपनीची अॅक्टीव्हा मोपेड (क्र. एच एच १६ बी जे ५४११) तसेच तिच्या डिक्कीत ठेवलेला अॅपल कंपनीचा आयपॅड अज्ञात चोरट्याने चोरुन नेल्याची घटना भवानी नगर मधील उत्कर्ष बंगल्यासमोर ६ मे रोजी रात्री ७.४५ च्या सुमारास घडली.

या प्रकरणी अक्षय राजकुमार मुनोत (वय ३७, रा. उत्कर्ष बंगला, भवानीनगर, अ.नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन कोतवाली पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३ (ब) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

# कत्तलीसाठी गोवंशीय जनावरे घेवून चाललेला पिक अप पकडला

### ६ गोवंशीय जनावरांची सुटका, शहरातील उड्डाणपुलावर पोलिसांची कारवाई

नगर- कत्तलीकरीता गोवंशीय जनावरांची बेकायदा वाहतूक करणारा टेम्पो कोतवाली पोलिसांनी ८ मे रोजी पहाटे बसस्थानकाजवळ उड्डाणपुलावर पकडला आहे. या कारवाईत ६ गोवंशीय जनावरे व टेम्पो अशा ५ लाख ४० हजार रुपये किंमतीच्या मुद्देमालासह दोघांना ताब्यात घेतले.

कोतवाली पोलीस शहर हद्दीत रात्रगस्त घालत असतांना एक महिन्द्रा पिकअप टेम्पो संशयास्पदरित्या कायनेटिक चौकातून नगर शहराकडे जाताना दिसला. त्यावेळी पोलिसांनी पिकअप टेम्पोचा पाठलाग करुन टेम्पो माळीवाडा बस स्टँड समोरील उड्डाण पुलावर अडवून त्या टेम्पोची पाहणी केली असता टेम्पोत गोवंशीय जातीचे जनावरे दिसुन आले. त्यावेळी पोलिसांनी टेम्पो चालक व त्याचेसोबत असलेला एक इसम यांना त्यांचे नाव गाव विचारले असता टेम्पो चालक याने त्याचे नाव जुबेर जावेद सय्यद, (वय २५, रा.मस्तान शहा चौक, कोठला,अ.नगर) व त्याचेसोबत असलेल्या इसमाने त्याचे नाव सकलेन आसौफ कुरेशी, (वय २१, रा.नालबंद खुंट, पिरशाह खूंट, अ.नगर) असे सांगितले. वाहन चालकाकडे अधिक चौकशी केली असता त्याने सांगितले की, हा टेम्पो गाडी व आतील जनावरे ही सकलेन कुरेशी याची असून ही गोवंशीय जनावरे ही कत्तलीसाठी झेंडीगेट येथे घेवून जात आहोत असे सांगितले.



कत्तलीसाठी गोवंशीय जनावरे घेवून चाललेला पिक अप पकडल्यानंतर दोघा आरोपींसह कोतवाली पोलिसांचे पथक.

पोलिसांनी टेम्पोतील ८० हजार रुपये किमतीच्या ४ जर्सी गायी, १० हजार रुपये किंमतीचे २ लहान बछडे व ४ लाख ५० हजार रुपये किमतीची महिंद्रा बोलेरो पिकअप टेम्पो असा ५ लाख ४० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल ताब्यात घेतला. ताब्यात घेतलेली गोवंशीय जातीची जनावरे पांजरापोळ, गोरक्षण संस्था, अरणगाव येथे जमा करण्यात आले.

या प्रकरणी कोतवाली पोलीसांनी जुबेर सय्यद व सकलेन कुरेशी यांचे विरुध्द गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक प्रविण पाटील, चालक सहायक फौजदार संभाजी कोतकर, पोलीस अंमलदार कृष्णा पारखे, याकूब शेख, नकुल टिपरे, राजेंद्र आव्हाड, राम हंडाळ यांनी केली आहे.

# गोवंशीय जनावरांची वाहतूक करणारा पिकअप केडगावच्या लिंकरोडवर पोलिसांनी पकडला

नगर - कत्तल करण्याच्या उद्देशाने गोवंशीय जनावरे वाहतूक करणारा पिकअप कोतवाली पोलिसांनी केडगाव परिसरातील लिंक रोडवरील हॉटेल रंगोली जवळ ९ मे रोजी सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास पकडला आहे. या कारवाईत ५ गोवंशीय जनावरांसह ४ लाख ८० हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

कोतवाली पोलीस केडगाव परिसरात गस्त घालत असताना त्यांनी लिंक रोड येथून येणाऱ्या महिंद्रा कंपनीचा बोलेरो पिकअप (क्र. एम एच १६ क्यू ५१५६) थांबवून चौकशी करुन पाहणी केली असता त्यात एक गाय व चार कालवड दाटीवाटीने बांधलेले दिसून आले. पोलिसांनी त्या जनावरांबाबत चौकशी केली असता ही जनावरे कत्तल करण्यासाठी घेऊन जात असल्याची माहिती टेम्पोच्या चालकाने दिली.

त्यामुळे पोलिसांनी टेम्पो चालक मुजीब मारूफ पठाण (वय ३३, रा. घास गल्ली, कोठला), त्याचा साथीदार बाबू सत्तार कुरेशी (रा. व्यापारी मोहल्ला, झेंडीगेट) यांना जनावरे व पिक अप सह ताब्यात घेतले.

त्यांच्या विरुद्ध पो.कॉ.अर्जुन फुंदे यांनी दिलेल्या फिर्यादी वरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मालट्रकच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

नगर - नगर सोलापूर महामार्गावर पाठीमागून भरधाव वेगात आलेल्या मालट्रकने पुढे चाललेल्या मोटारसायकल जोराची धडक दिल्याने मोटारसायकलवरील तरुणाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना नगर तालुक्यातील शिराढोण गावच्या शिवारात माळवाडी येथे ८ मे रोजी सकाळी ११.४५ वाजण्याच्या सुमारास घडली. प्रवीण भगवान वाघ (वय ३०, रा. शिरढोण, ता.नगर) असे मयताचे नाव आहे.

मयत प्रवीण वाघ हा त्याची मोटारसायकलवर (क्र. एम एच १६ सी आय ७४०५) नगर सोलापूर महामार्गावर शिराढोण गावचा शिवारातून जात असताना पाठीमागून वेगात आलेल्या मालट्रकने (क्र. आर जे ११ जी सी ३५४१) त्याच्या मोटारसायकलला पाठीमागून धडक दिली. या धडकेत प्रवीण वाघ याचा जागीच मृत्यू झाला.

याप्रकरणी मयताचा चुलत भाऊ हरीश मोहन वाघ (रा. शिराढोण, ता. नगर) याने नगर तालुका पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरुन ट्रक चालक धरमपाल शंकरलाल शर्मा (रा. परतापुर, फिरोजाबाद, उत्तर प्रदेश) यांच्याविरुद्ध अपघाताचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# गांजा व नशेचे इंजेक्शन विक्री करणाऱ्या दोघांना नगरमध्ये पकडले

### ३५ हजार ४४३ रुपये किंमतीचा साठा जप्त, माळीवाडा परिसरातील कारवाई

नगर - नगर शहरात गांजा तसेच महाराष्ट्र शासनाकडून बंदी असलेले मानवी शरीरास अपायकारक असलेले मेफेन टरमाईन इंजेक्शन विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगणाऱ्या दोघांना कोतवाली पोलिसांनी ८ मे रोजी सायंकाळी ३५ हजार ४४३ रुपये किंमतीच्या मुद्देमालासह पकडले आहे. ही कारवाई माळीवाडा येथील पृथ्वीराज लॉज मागे असलेल्या घरात करण्यात आली शाहरुख अस्लम मनियार (वय २८) आणि सैजल अस्लम मनियार (वय २६, दोघे रा. पुथ्वीराज लॉजींगचे पाठीमागे, माळीवाडा, अ.नगर) अशी दोघांची नावे आहेत.

याबाबत ची माहिती अशी की कोतवाली पोलीस माळीवाडा परीसरात पेट्रोलिंग करीत असताना त्यांना माहिती मिळाली की शाहरुख मनियार व सैजल मनियार यांनी माळीवाडा येथे मादक पदार्थ गांजा तसेच महाराष्ट्र शासनाकडुन बंदी असलेले, मानवी शरीरास अपायकारक असलेले मेफेन टरमाईन इंजेक्शन जवळ बाळगुन विक्री करीत आहेत.अशी माहिती मिळाल्याने पोलीस निरीक्षक प्रताप दराडे, पोलीस उपनिरीक्षक गणेश देशमुख, महिला पोलीस हवालदार रोहिणी दरंदले, पोलीस अंमलदार दीपक रोहकले, तानाजी पवार, शिरीष तरटे, सचिन लोळगे, राम हंडाळ यांच्या पथकाने तेथे छापा टाकून दोघांना पकडले.

पोलीसांनी त्यांची अंगझडती तसेच राहते घराची झडती घेतली असता त्यांचे राहत घरात दिवाणचे आतील कप्यामध्ये प्लॅस्टीकच्या निळ्या रंगाचे पिशवीमध्ये गांजा व मेफेनटरमाईन इंजेक्शन औषधाच्या बाटल्या मिळुन आल्या. त्याबाबत त्यांचेकडे विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, बाटलीत असलेले मेफेन टरमाईन सल्फेट हे औषध नशा करण्यासाठी तसेच बॉडी बिल्डींगकामी प्रती इंजेक्शन ७०० रुपये प्रमाणे देतो व गांजा हा १०० व ५० ग्रॅमच्या पुड्यांमध्ये विक्री करतो. पोलीसांनी तेथून २ हजार ३४३ रुपये किमतीच्या मेफेन टरमाईन सल्फेट इंजेक्शनच्या ७ बाटल्या, ३३ हजार १०० रुपये किमतीचा गांजा असा ३५ हजार ४४३ रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला.

या प्रकरणी पोलीस हवालदार रोहिणी दरंदले यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन कोतवाली पोलीस ठाण्यात दोघांविरुध्द बी एन एस २०२३ चे कलम २७८, १२५, १२३ सह गुंगीकारक औषधद्रव्य आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ चे कलम ८ (सी), २०(बी), (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.



### रस्ते खोदाईमुळे नगरकरांची जीवघेणी कसरत

शहराच्या बहुतांश भागात पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी सिमेंट पाईप गटारीची कामे सुरु आहेत, त्यामुळे रस्ते खोदून ठेवले असल्याने नगरकरांना घराबाहेर पडणेही मुश्कील झाले असून घराबाहेर पडल्यास रस्त्याने जाताना मोठी जीवघेणी कसरत करावी लागत आहे. पटवर्धन चौक परिसरात रस्त्याने सायकलवर जात असलेला मुलगा या खड्ड्यात सायकलसह घसरून पडल्याचे छायाचित्रात दिसत आहे. असे छोटे मोठे अपघात दररोज शहरात होत आहेत. महापालिका प्रशासनाने संथ गतीने चाललेल्या या कामांचा वेग वाढवावा अशी मागणी होत आहे. (छाया - लहू दळवी)

# वेल्डिंगच्या केलेल्या कामाचे पैसे मागितल्याने हॉटेलच्या चालकाकडून वेल्डरला बेदम मारहाण

नगर - वेल्डिंग केलेल्या कामाचे पैसे मागितल्याचा राग येऊन हॉटेल चालकाने वेल्डरला शिवीगाळ करुन लाथाबुक्क्यानी मारहाण करीत जीवेच ठार मारण्याची धमकी दिली. ही घटना नेप्ती कांदा मार्केट जवळील हॉटेल पारिजात येथे ८ मे रोजी सकाळी घडली.

या बाबत वेल्डर ऐजाज अहमद शेख (वय ३५, रा रामवाडी, सर्जेपुरा अ. नगर ) याने नगर तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे वेल्डर असून वेल्डिंग करण्याचे काम करतात. फिर्यादी यांनी राजेश सातपुते (पूर्ण नाव माहित नाही. रा. केडगाव अ.नगर) यांच्या पारिजात हॉटेल मध्ये वेल्डिंग करण्याचे काम केले. त्यानंतर झालेल्या कामाचे पैसे मागण्याकरिता राजेश सातपुते यांच्याकडे गेले व त्यांनी सातपुते यांना झालेल्या कामाचे पैसे मागितले. त्यावेळी सातपुते यांना पैसे मागितल्याचा राग आल्याने त्यांनी फिर्यादीस तुझे कसले पैसे मी देत नाही जा. असे म्हणून शिवीगाळ करीत लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. तसेच पुन्हा पैसे मागितले तर जिवंत सोडणार नाही. असे म्हणून जीवे मारण्याची धमकी दिली.

या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात ऐजाज शेख यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन राजेश सातपुते याचेविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ११५, ३५१(२) (३),३५२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलिस उप निरीक्षक आव्हाड हे करीत आहे.

### दर्शन भोसले यांचे अल्पश: आजाराने निधन



श्रीरामपूर - येथील दर्शन गोविंदराव भोसले (वय ५८) यांचे अल्पश: आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन भाऊ, दोन मुले, पुतणे, सून, नातवंडे असा परिवार आहे. ते नवीन मराठी शाळेचे शिक्षक पंजाबराव भोसले व चि.गोपाळ भोसले यांचे वडील, राजेंद्र, बाळासाहेब व विकास भोसले यांचे बंधू होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# अरुणकाका यांना श्रद्धांजली वाहताना गुणे आयुर्वेद संस्थेत सर्वांना अश्रू अनावर

नगर – माजी आमदार व आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळाचे अध्यक्ष (कै.) अरुणकाका जगताप यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी गंगाधर शास्त्री गुणे आयुर्वेद रुग्णालय व महाविद्यालयाच्या वतीने शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. गेल्या ३४ वर्षापासून गुणे आयुर्वेद संस्थेची नाळ अरुण जगताप यांच्याशी जुळलेली असल्याने त्यांच्या आठवणींना उजाळा देताना व भावना व्यक्त करताना उपस्थित सर्वांनाच अश्रू अनवर झाले.



माजी आमदार व आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळाचे अध्यक्ष कै. अरुणकाका जगताप यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी गंगाधर शास्त्री गुणे आयुर्वेद रुग्णालय व महाविद्यालयाच्या वतीने आयोजित शोकसभेत भावना व्यक्त करताना संस्थेचे सचिव डॉ. विजय भंडारी.

यावेळी मंडळाचे मानद सचिव डॉ. विजय भंडारी, संचालक ठाकूर नवलानी, ज्ञानदेव पांडुळे, अरविंद शिंदे, डॉ.शिवाजी वाव्हाळ, रत्नाकर कुलकर्णी, ज्ञानेश्वर रासकर, वैशाली ससे, प्राचार्य दत्तात्रय लोडे, वैद्य प्रभाकर पवार, डॉ.उमेश सुद्रिक, उपप्राचार्य डॉ.सुरेशसिंह ठाकूर, डॉ. विक्रम म्हसे, डॉ.निळकंठ ठाकरे, व्यवस्थापिका प्रतिभा भारदे आदींसह सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी डॉ. विजय भंडारी म्हणाले, १९९१ साली अरुणकाका जगताप यांनी आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळाच्या अध्यक्षपदाची धुरा हातात घेत मोडकळीस आलेल्या गुणे आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय या संस्थेचा कायापालट केला. संस्थेमध्ये अनेक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देऊन विद्यार्थ्यांना चांगले वैद्यकीय शिक्षण मिळावे तसेच येथील रुग्णालयांमधून दर्जेदार आयुर्वेदिक उपचार मिळावेत यावर त्यांचा कायम भर असे. यासाठी अनेक चांगल्या सोयीसुविधा त्यांनी स्व खर्चाने उपलब्ध करून दिल्या. गोरगरीब रुग्णांना अत्यंत अल्प दरात या ठिकाणाहून औषधोपचार देण्याची गुणेशास्त्री यांची परंपरा काकांनी पुढे चालवत कायम ठेवली. अशा महान व्यक्तिमत्वाच्या निधनाने कधीही भरून न येणारी पोकळी निर्माण झाली आहे.

यावेळी सर्वच भावना व्यक्त भावनिक झाले होते. गुणे आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय संस्था व सर्व कर्मचारी जसे काकांच्या पाठीशी उभे होते तसेच भविष्यात आ. संग्राम जगताप व सचिन जगताप यांच्या पाठीशी उभे राहण्याचा संकल्प उपस्थित सर्वांनी केला. शोकसभेच्या प्रास्ताविकात प्राचार्य डॉ.दत्तात्रय लोडे यांनी अरुणकाकांच्या सर्वांना मदत करण्याच्या स्वभावाचा उल्लेख करून त्यांच्या विषयी भावना व्यक्त केल्या. निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. समीर होळकर यांनी सूत्रसंचालन केले. पसायदानाने शोकसभेची सांगता करण्यात झाली.

# अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाची १३ मेपासून 'वसंत व्याख्यानमाला'

## विक्रम एडके, वैभव डूस, प्रियांका कर्णिक यांचा सहभाग





नगर – अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाच्यावतीने १३ ते १५ मे या कालावधीत वसंत व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. यात विक्रम एडके, लेखक वैभव डूस, प्रियांका कर्णिक विविध विषयावर मार्गदर्शन करणार असल्याची माहिती वाचनालयाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक व प्रमुख कार्यवाह विक्रम राठोड यांनी दिली.

ही व्याख्यानमाला रोज सायंकाळी ६ वा. नेता सुभाष चौक चितळे रोडवरील वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात होईल. व्याख्यानमालेचे उद्घाटन १३ मे रोजी सायं ६ वा. रामदास शिंदे निरीक्षक जिल्हा ग्रंथालय अधिकारी यांच्या हस्ते होणार आहे.

उद्घाटनानंतर व्याख्यानमालेत लेखक अभ्यासक विक्रम एडके (पुणे) हे अपरिचित रामायण या विषयावर प्रथम पुष्प गुंफतील.

१४ मे रोजी फक्त १८० दिवसांमधे दीड लाख प्रतींची विक्री होणारे भारतातील एकमेव पुस्तक. एक असे पुस्तक ज्या पुस्तकाने संपूर्ण भारताला वेड लावले, लाखो तरुणांच्या आणि तरुणींच्या आयुष्यात बदल घडवुन आणला आणि महाराष्ट्रातील मागील १०० वर्षांमध्ये सर्वात जास्त वेगाने विक्री होणारे आणि सर्व रेकॉर्ड ब्रेक करून टाकणारे एकमेव पुस्तक ठरले ते म्हणजे अंतः अस्ति प्रारंभः The end is the beginning लेखक वैभव डूस (श्रीरामपूर) दुसरे पुष्प गुंफतील.

१५ मे रोजी प्रियांका कर्णिक (पुणे) भारतीय विद्या पारंगत (एम.ए– इंडॉलॉजी Rank Holder in University ) माझी साहित्यिक वाटचाल या विषयावर तिसरे पुष्प गुंफतील.

वाचनालयाच्या वसंत व्याख्यानमालेस रसिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन उपाध्यक्ष अनंत देसाई व दिलीप पांढरे, सहकार्यवाह डॉ. राजा ठाकूर, खजिनदार तनवीर खान, संयोजक किरण आगरवाल, शिल्पा रसाळ, प्रा.ज्योती कुलकर्णी, सदस्य, निमंत्रित सदस्य यांनी केले आहे.

# काष्टी परिक्रमा सायन्स कॉलेजचा ९९.११% निकाल






नगर – श्रीगोंदा तालुका येथील काष्टी मधील परिक्रमा सायन्स कॉलेजच्या एच एस सी निकाल ९९.११%लागला आहे. दर वर्षी प्रमाणे उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे.

बबनराव पाचपुते विचारधारा ट्रस्टचे परिक्रमा सायन्स कॉलेज या विद्यालयाचा इयत्ता बारावी फेब्रु./मार्च २०२५ परीक्षेचा निकाल महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ यांचेकडून जाहीर झाला असून यामध्ये कॉलेज मध्ये जाधव भक्ती काशिनाथ ही ८४% गुण मिळवून प्रथम, चव्हाण कृष्णा यशवंत हा ८२% गुण मिळवुन द्वितीय आला असुन तृतीय क्रमांक कुलकर्णी तनिष्का अरुण हिने ८१ टक्के गुण मिळवले तर खामकर सिद्धी जीजाराम या विद्यार्थिनीने ८१% गुण मिळवले तिला देखील कॉलेज ने ३रा क्रमांक दिला आहे.

अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला असून विद्यालयाचा एकूण निकाल ९९.११% एवढा लागला. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक बबनराव पाचपुते, संस्थेच्या अध्यक्षा डॉ.सौ.प्रतिभाताई पाचपुते, संस्थेचे सचिव आ.विक्रमसिंह पाचपुते संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ॲड. प्रतापसिंह पाचपुते, अकॅडेमीक डायरेक्टर सौ.इंद्रायणी पाचपुते, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा.अनिल पुंड, डेप्युटी अकॅडमीक डायरेक्टर डॉ.संजीव कदम पाटील, विद्यालयाचे प्राचार्य डॉ. इथापे पी.ए. व सर्व विभागाचे प्राचार्य तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

# 'स्नेहबंध' तर्फे छावणी परिषद शाळेतील शिष्यवृत्ती गुणवंतांचा सत्कार

नगर – राज्य परीक्षा परिषद आयोजित इ.५ वी व ८ वीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत छावणी परिषदेच्या पीएमश्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळेने यश संपादन केले. या शिष्यवृत्ती गुणवंतांचा स्नेहबंध सोशल फौंडेशनतर्फे छावणी परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रांत मोरे व स्नेहबंधचे संस्थापक डॉ. उद्धव शिंदे यांनी प्रमाणपत्र, पदक व गुलाबपुष्प देऊन सत्कार केला.



'स्नेहबंध' तर्फे छावणी शिष्यवृत्ती गुणवंतांचा सत्कार छावणी परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रांत मोरे व स्नेहबंधचे डॉ. उद्धव शिंदे यांनी प्रमाणपत्र, पदक व गुलाबपुष्प देऊन केला. यावेळी मुख्याध्यापक संजय शिंदे, सुभाष भारूड, सीमा चोभे, एस.जे.लबडे व स्नेहल लवांडे आदी.

शैक्षणिक वर्ष २०२४–२५ मध्ये इ.५ वीच्या विद्यार्थ्यांनी अहिल्यानगर प्रज्ञाशोध परीक्षा, राज्यस्तरीय लक्ष्यवेध परीक्षा, राज्यस्तरीय मंथन सामान्य ज्ञान परीक्षा, हिंदसेवा टॅलेंट सर्च अशा ५ वेगवेगळ्या परीक्षांमध्ये सहभाग घेतला होता. प्रसाद अशोक शेलार याने प्रत्येक परीक्षेत गुणवत्ता यादीत स्थान पटकावले. इ.६ वीतील आयुष घोरपडे याने लक्षवेध प्रज्ञाशोध परीक्षेत गुणवत्ता यादीत स्थान मिळवले. इ.८ वीतील विद्यार्थिनी अर्शीन सय्यद, साक्षी वाघमारे, क्रांती मोरे हे एनएमएमएस उत्तीर्ण झाल्या.

मुख्य कार्यकारी अधिकारी मोरे म्हणाले, शालेय जीवनातील या स्पर्धा परीक्षा भविष्यकाळातील एमपीएससी, यूपीएससी परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. यापुढे असेच परिश्रम घेत रहा, आपल्या सुद्धा आधिकारी बनण्याचे स्वप्न नक्कीच पूर्ण होईल.

पीएम श्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळेतील या गुणवंत विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र, पदक, गुलाब पुष्प देऊन विद्यार्थ्यांना डॉ. उद्धव शिंदे यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक संजय शिंदे, यशस्वी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे सुभाष भारूड, सीमा चोभे, एस.जे.लबडे व स्नेहल लवांडे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन महेश मोहिते यांनी केले. संजय हजारे यांनी आभार मानले.

### शिष्यवृत्ती परीक्षेत यांनी मिळवले यश

प्रसाद अशोक शेलार २४४, स्नेहल काळू हिले २०४, कल्याणी निशांत नन्नवरे १६८, ईश्वरी रवि नन्नवरे १५८, श्रावणी संदिप साबळे १५०, अभिमन्यू गोरखे १५०, सार्थक सचिन कुरमकर १४२ तसेच इ.८ वीच्या क्रांती सचिन मोरे हिने १५४ गुण प्राप्त करून यश मिळवले.

# बारावी बोर्ड परीक्षेत पेमराज सारडा महाविद्यालयाची उत्तुंग यशाची परंपरा कायम

नगर – इयत्ता बारावी परीक्षेचा नुकताच जाहीर झाला आहे. या परीक्षेत अहिल्यानगरच्या पेमराज सारडा महाविद्यालयाच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करत उत्तुंग यशाची परंपरा कायम ठेवली आहे, अशी माहिती प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित यांनी दिली.



बारावी बोर्ड परीक्षेत पेमराज सारडा महाविद्यालयाने उत्तुंग यशाची परंपरा कायम राखली.

सारडा महाविद्यालयाचा विज्ञान शाखेचा निकाल ९८.२६%, वाणिज्य शाखेचा निकाल ८७.७९% लागला आहे. विज्ञान शाखेचा विद्यार्थी संकेत नाबगे याने गणित विषयात १०० पैकी १०० गुण मिळवून विक्रम प्रस्थापित केला. तसेच वाणिज्य विभागात ओम चोरबेले याने ९३.८५% गुण मिळवून प्रथम येण्याचा मान पटकवला तर कला शाखेचा हर्षा पुंड ही विद्यार्थिनी ९०.८३% मिळवून कला शाखेत प्रथम आली आहे. विज्ञान शाखेच्या संकेत नाबगी या विद्यार्थ्याचा कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन डॉ. पारस कोठारी यांच्या हस्ते सत्कार करून अभिनंदन करण्यात आले.

सारडा महाविद्यालयातील विज्ञान शाखेतील गुणवंत विद्यार्थी पुढील प्रमाणे, प्रथम क्रमांक संकेत नाबगे ८९.५०%, द्वितीय कु. गायत्री परसवानी ८७.१७%, तृतीय कु. मानसी देशपांडे ८५.८३%. वाणिज्य शाखेत प्रथम ओम चोरबले ९३.८३%, द्वितीय यश कालिया ९२.५०%, तृतीय पियुष गुंडू, अनुष्का गुलाटी व दिशा पालीवाल या तिघांनी ८८.८३% गुण मिळवले. कला शाखेत प्रथम हर्षा पुंड ९०.८३%, द्वितीय अंतरा वाडेकर ८८.५०%, तृतीय इशिका हिंदुजा ८७%.

दरवर्षीप्रमाणे पेमराज सारडा महाविद्यालयाने इयत्ता बारावीच्या परीक्षेत यशाचा आलेख चढता ठेवला आहे. या यशस्वी व गुणवंत विद्यार्थ्यांचे हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक, कार्याध्यक्ष डॉ. रमेश झरकर, मानद सचिव संजय जोशी, डॉ. पारस कोठारी, ब्रिजलाल सारडा व अजित बोरा, सुमतीलाल कोठारी, पेमराज सारडा महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित, उपप्राचार्य प्रा. मिलिंद देशपांडे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. गिरीश पाखरे, प्रबंधक अशोक असेरी, पर्यवेक्षक डॉ. सुजित कुमावत, पर्यवेक्षक राजू रिक्कल व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी वृंद यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



## गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांना ध्यानधारणेची पुस्तके देण्यात आली भेट

जगभरात १४३ देशात ध्यानधारणा शिकवणाऱ्या प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या वतीने गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांची भेट घेऊन बी के डॉ. दीपक हरके यांनी ध्यानधारणेची पुस्तके भेट दिली. यावेळी विहान हरके, प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या बाणेर सेवाकेंद्राच्या संचालिका ब्रह्माकुमारी डॉ. त्रिवेणी दीदी व मिस इंडिया बी के डॉ. ईशा अगरवाल उपस्थित होते.



पटावर चाल देऊन मोतीलालजी फिरोदिया अखिल भारतीय खुली क्लासिक बुद्धिबळ स्पर्धेच्या दुसऱ्या सत्राचे शुभारंभ करताना आयुक्त यशवंत डांगे.

# पटावर चाल देऊन मोतीलालजी फिरोदिया अखिल भारतीय खुली क्लासिक बुद्धिबळ स्पर्धेच्या दुसऱ्या सत्राचा शुभारंभ

नगर – अखिल भारतीय मोतीलालजी फिरोदिया खुल्या बुद्धिबळ स्पर्धेचे दुसऱ्या सत्राचे उद्घाटन अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे व राहुरी कृषी विद्यापीठाचे क्रीडा अधीक्षक प्रा. गायकवाड सर यांनी पटावर चाल देऊन शुभारंभ करण्यात आले.

यावेळी सचिव यशवंत बापट, खजिनदार सुबोध ठोंबरे, विश्वस्त श्याम कांबळे, पारुनाथ ढोकळे, प्रकाश गुजराथी, पंच प्रवीण ठाकरे, पवन राणे, शार्दुल टापसे, देवेंद्र ढोकळे, प्रशांत गागरे, अनुराधा बापट, शुभदा ठोंबरे, रोहिणी आडकर आदींसह खेळाडू, पालक उपस्थित होते.

यावेळी बुद्धिबळ संघटनेचे सचिव यशवंत बापट यांनी प्रस्ताविकात संघटने विषयी व स्पर्धेविषयी माहिती सांगितली.

यावेळी मनपा आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, बुद्धिबळ खेळामुळे आपल्याला महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यास मदत होते व बुद्धिबळ खेळामुळे बुद्धीला चालना भेटते व जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर खेळाला महत्त्व द्यावे तसेच बुद्धिबळ खेळातून आपले करिअर घडवण्यासाठी निश्चित मदत होते व अहिल्यानगर जिल्ह्यात बुद्धिबळ संघटनेचे कार्य उत्तम असून बुद्धिबळ खेळाडू घडवण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहे. या स्पर्धा आयोजनामुळे अनेक आय एम, एफ एम, ग्रँडमास्टर घडले जातील असल्याची भावना व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पारुनाथ ढोकळे यांनी केले तर आभार सुबोध ठोंबरे यांनी मानले.

# कौशल्याचे संवर्धन करून त्याचा व्यावसायिक प्रगतीसाठी करावा

## इतिहास संशोधक भूषण देशमुख यांचे प्रतिपादन; द पॉवर ऑफ व्हॉइस चार दिवसीय कार्यशाळेचा यशस्वी समारोप

नगर – मनुष्याला जन्मजात काहीतरी कौशल्य देवाने दिलेले आहे त्याचे संवर्धन करून त्याचा व्यावसायिक प्रगतीसाठी कसा उपयोग करून घेता येईल याचा प्रत्येकाने विचार करणे गरजेचे असल्याचे इतिहास संशोधक भूषण देशमुख यांनी सांगितले.



IMS SEEDC तर्फे आयोजित द पॉवर ऑफ व्हॉइस – आवाजाच्या क्षेत्रातील करिअरच्या विविध संधी या चार दिवसीय कार्यशाळेचा यशस्वी समारोप झाला.

IMS SEEDC तर्फे आयोजित द पॉवर ऑफ व्हॉइस – आवाजाच्या क्षेत्रातील करिअरच्या विविध संधी या चार दिवसीय कार्यशाळेचा यशस्वी समारोप झाला. या समारोप समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून भूषण देशमुख आणि खचड चे माजी सरसंचालक आणि शिक्षणतज्ज्ञ डॉ. शरद कोलते यांची उपस्थिती लाभली.

IMS डेप्युटी डायरेक्टर डॉ. विक्रम बार्नबस seedc समन्वयक डॉ. ऋचा तांदूळवाडकर आणि या कार्यशाळेच्या मुख्य मार्गदर्शक निवेदिका वीणा दिघे आदी मंचावर उपस्थित होते

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. कोलते म्हणाले, आपल्यातील क्षमता ओळखायला शिका आणि त्यावर अभ्यासपूर्वक कौशल्य विकसित करा. आजच्या स्पर्धेच्या युगात हीच यशाची गुरुकिल्ली आहे.

कार्यक्रमासाठी ट्रेक कॅम्पचे संस्थापक विशाल लाहोटी आणि कृष्णा बेलगावकर हे देखील उपस्थित होते.

या समारोप सत्राची खासियत म्हणजे संपूर्ण सूत्रसंचालन, पाहुण्यांचे स्वागत आणि आभार प्रदर्शन कार्यशाळेतील सर्व सहभागी विद्यार्थ्यांनीच अत्यंत उत्साहाने पार पाडले. त्यांनी आपला अनुभव कथनातून या कार्यशाळेने त्यांच्या आत्मविश्वासात व संवादकौशल्यात कसा सकारात्मक बदल घडवला, हे मनोगतातून व्यक्त केले.

सौ. वीणा दिघे यांच्या अनुभवसंपन्न मार्गदर्शनाखाली माईक कसा धरावा या छोट्याशा पण प्रमुख गोष्टीपासून ते वाणीचे प्रकार, संवाद कौशल्य, प्रभावी बोलणे, व्यक्तिमत्त्व विकास आणि आवाज नियंत्रण या महत्त्वाच्या पैलूंवर सखोल प्रशिक्षण या चार दिवसांत देण्यात आले.

कार्यक्रमाचे सुरुवातीचे सूत्रसंचालन प्रशिक्षणार्थी सत्यम लुनिया व मरियम सय्यद यांनी केले. तनिष्का सोरटूरकर हिने पाहुण्यांचे परिचय करून दिला. प्रशस्तीपत्र वाटप वाचन प्रदीप तांदळे यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा. सुप्रिया सापा आणि प्रणव रामदिन यांनी केले. कार्यक्रमाची संपूर्ण तांत्रिक बाजू सोहम सौंदणकर याने सांभाळली यावेळी विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्शनही सादर केले त्याचे निवेदन सौ. सुहासिनी डांगे यांनी केले. यामध्ये पल्लवी शिंगी, अमृता कवडे आणि वैष्णवी मुटकुळे यांनी आपली कला सादर केली. निलेश पठारे, प्रमिला डोके, सोनाली साळुंके आणि मालती बढे यांनी यावेळी आपले या कार्यशाळेचे अनुभव कथन केले.

या प्रकारची व्यावसायिक क्षमताविकासावर आधारित कार्यशाळा नगरमध्ये प्रथमच झाली असून, सर्वच वयोगटातील व्यक्तींनी याचा उत्कृष्ट लाभ घेतला, हे विशेष.

IMS SEEDC तर्फे अशा कार्यशाळांची मालिका भविष्यातही राबवली जाणार असल्याचे समन्वयक डॉ. ऋचा तांदूळवाडकर यांनी यावेळी सांगितले.

पुढील बॅचची नाव नोंदणी चालू झाली असून अधिक माहितीसाठी व नावानोंदणी साठी ९८५०३७०१४१ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### असा सुटेल पोटात गुडगुडण्याचा आवाज

पोटातून गुडगुडण्याचा आवाज येणे ही एक सामान्य समस्या आहे, जी बहुतेकदा भूक, गॅस किंवा पचनाशी संबंधित कारणांमुळे उद्भवते. जरी ते गंभीर नसले तरी ते कधीकधी अस्वस्थ करते. पोटातील आवाज हे बहुतेकदा उपासमारीचे लक्षण असते. अशा परिस्थितीत एकाच वेळी जड अन्न खाऊ नका. दिवसातून ४-६ वेळा थोडे थोडे जेवण करा. यामुळे तुमचे पोट भरलेले राहील आणि आवाजापासून आराम मिळेल. राजमा, चणे, कोबी, तळलेले पदार्थ किंवा अन्न खाल्ल्यानंतर लगेच चहा किंवा कॉफी घेतल्याने गॅस होऊ शकतो. जर हा आवाज गॅसमुळे येत असेल तर त्यापासून दूर राहा. जेवल्यानंतर १५-२० मिनिटे हलके फिरायला जा. यामुळे पचनक्रिया सक्रिय होते आणि गॅस, ॲसिडिटी सारख्या समस्यांपासून आराम मिळतो, ज्यामुळे पोटातील आवाज देखील कमी होतो. त्याचप्रमाणे अन्न चांगले चावून खावे यामुळे पचनसंस्था चांगली काम करते आणि गॅस किंवा आम्लपित्तची समस्या कमी होत.

## पाककला

### दही वडा

**साहित्य :** मिक्सरमध्ये पाणी न घालता वाटून ठेवलेली आणि रात्रभर भिजवलेली २ वाटी उडीद डाळ, कुटून ठेवलेली १ चमचा मिरी, चवीनुसार मीठ, तेल, १ वाटी पुदिना, कोथिंबीरीची हिरवी चटणी, १ वाटी खजूर, चिंचेची आंबट चटणी, १/२ वाटी लसणाची तिखट चटणी, १/४ वाटी बारीक शेव, १/२ किलो छान फेटून घेतलेले दही त्यात मीठ व साखर घातलेली असावी.

**कृती :** वाटलेल्या पिठामध्ये मीठ व कुटलेली मिरी घालून हाताने छान फेटून घ्यावे. कढई गॅसवर ठेवून त्यामध्ये तेल घालावे. तेल गरम झाले की त्यामध्ये हातानेच वडे सोडावे व सोनेरी रंगावर तळून घ्यावे. मग एका प्लेटमध्ये वडे ठेवून त्यावर थंड घट्ट दही घालावे त्यावर पुदिन्याची चटणी, चिंचेची चटणी व लसणाची चटणी घालून थोडी शेव घालावी व खायला द्यावे.

## वास्तू

### पाण्याच्या स्त्रोतांची दिशा

❊ पाण्याचे भांडे किंवा पाणी शुद्ध करणारे पदार्थ उत्तर दिशेला ठेवल्याने घरात त्याचे शुभ परिणाम पहायला मिळतात. वास्तुशास्त्रानुसार, जर तुम्ही तुमच्या घराच्या उत्तरेकडील दिशेला मत्स्यालय ठेवले तर तुमच्या जीवनात संपत्तीचे दरवाजे उघडतील, तुम्हाला नोकरीत यश मिळेल, कामातील अडथळे दूर होतील.

❊ जर तुम्ही तुमच्या घराच्या उत्तरेकडील दिशेला नदीच्या धबधब्याचा फोटो लावला तर तुमच्या घरातील वाद आणि वाद संपतील, घरात शांतीचे वातावरण राहील.

## सल्ला

सिल्कच्या साडीची काळी झालेली बॉर्डर साफ करण्यासाठी संत्र्याची साल बॉर्डरवर चोळा व नंतर स्वच्छ पाण्याने धुवा.

## सौंदर्य

अँटीऑक्सिडंट्सने भरलेली कॉफी कोलेजन उत्पादन वाढवते आणि एक शक्तिशाली नैसर्गिक एक्सफोलिएटर म्हणून काम करते. कॉफी सूज आणि पिगमेंटेशन कमी करण्यास देखील मदत करते, ज्यामुळे ती आपल्या डोळ्यांखालील त्वचेसाठी एक उत्तम पर्याय बनते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शनिवार, दि. १० मे २०२५

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, वैशाख शुक्लपक्ष, चित्रा २७।१५, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०५ वा. ४० मि.**

### राशिभविष्य

**मेष** : आजचा दिवस आपल्या करियरवर विधायक परिणाम घडवू शकतो. महत्त्वाकांक्षा पूर्ण होतील. व्यापार-व्यवसाय सुरळीत राहाणार नाही.

**वृषभ** : आर्थिक विषयांमध्ये सावधगिरी न बाळगल्याने नुकसन. वाहनसुख मिळेल. उत्तम भोजनाचे सुख मिळेल.

**मिथुन** : आजचा दिवस विधायक कामासाठी चांगला आहे. आपला जोडीदार आपल्याबरोबर राहील.

**कर्क** : आजचा दिवस छान जाईल. मनोरंजनासाठी वेळ काढाल. हुशारीने गुंतवलेले धन आपला फायदा करुन देईल.

**सिंह** : एखाद्या कल्पक, सर्जनशील कार्यात गुंतलेले राहू शकता. शत्रू पराजित होईल. रोख रकमेची मोठी देवघेव होईल.

**कन्या** : आरोग्य नरम-गरम राहील. नोकरदार मंडळीना हिंतशत्रूंपासून त्रास होईल. मुले देखील त्रास देऊ शकतात.

**तूळ** : मित्रांपासून आनंद मिळेल. एखाद्या कार्यक्रमाला उपस्थित रहाल. आरोग्य उत्तम राहील.

**वृश्चिक** : आजची संध्याकाळ आपणासाठी फारच अर्थपूर्ण होईल. अत्यंत परिश्रम केल्यानंतर थोडे यश मिळेल.

**धनु** : छोट्या-छोट्या अडचणी येतील. पण त्याकडे दुर्लक्ष कराल. काळजीपूर्वक कार्य कराल.

**मकर** : योजनाबद्धरीतीने आपले काम करण्याचा प्रयत्न केल्याने यश. कामांमध्ये प्रगती होईल.


**कुंभ** : पळापळ अधिक राहील. आरोग्य बिघडेल. आर्थिक विषयांमध्ये देवाण-घेवाण टाळाल.

**मीन** : संवाद कायम ठेवण्याचा प्रयत्न कराल. पत्नी व मुले यांचा आनंददायी सहवास लाभेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# शब्दगंध क्र. ७१७३

सौ.शैलजा कुलकर्णी




**आडवे शब्द :-** १) उभी लांबी; हाईट ३) ओझे वाहणारा; हमाल ७) कडक; निबर ९) वेगाने वाहणारी हवा; वात; पवन १०) सूत कातण्याचे चक्र १२) एक फळ १३) मध्य प्रदेशातील एक प्रसिद्ध शहर १४) वाखाणणी; प्रशंसा १६) घात करणारे; हानिकारक १७) एक फळ १८) उसंत; फुरसत १९) या पिकापासून गोणपाट तयार होते २०) रुग्णाईत; दुखणाईत २१) सामान ज्यात बांधतात ते कापड अथवा गोणपाट

**उभे शब्द :-** १) या प्राण्याला वाळवंटातील जहाज म्हटले जाते २) दुर्मिळता; अभाव (पैशाची वगैरे) ४) गव्हाचे कणीदार पीठ ५) जिवंत राहण्यासाठीचा एक आवश्यक घटक; वायू ६) आणभाक; आश्वासन वगैरेचा प्रकार ८) एक निवृत्त व अष्टपैलू भारतीय क्रिकेटपटू ११) मूस; साचा; ज्यात पातळ रस ओतून एखादी वस्तू तयार केली जाते ते साधन १२) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची एक गाजलेली कादंबरी १३) धोबी; परीट १५) लवकर न तुटणारे; लवचीक १७) डोंगरातील आरपार रस्ता १८) शिक्षा; दंड; शासन १९) धातूचा दोरा

**शब्दगंध क्र. ७१७२ चे उत्तर**



**फिल्मीचक्कर क्र. ११८७ चे उत्तर**



# ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ मुलांचे विश्व ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : दुसऱ्यांचे सुख पाहण्याची क्षमता ज्यांच्याकडे असते त्यांची प्रगती कोणीही थांबवू शकत नाही.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### सिंह कोणत्या दोन प्राण्यांना घाबरतो?

सिंहाला जंगलाचा राजा मानले जाते, कारण त्याची शारीरिक सामर्थ्य आणि ताकद त्याला सर्व प्राण्यांपेक्षा वरचे स्थान देते. सिंहाच्या पकडीत सापडल्यास मृत्यू टाळता येऊ शकत नाही, कारण त्याची ताकद आणि शिकारी कौशल्य अत्यंत धारदार असते. सिंहाच्या उपस्थितीमुळे लहान प्राणी त्याच्या आजूबाजूला देखील फिरत नाहीत, कारण त्यांना त्याच्या शिकार कौशल्याची भीती असते. परंतु, तुम्हाला माहिती आहे का, सिंह कधी कधी कोणत्या प्राण्यांपासून घाबरतो? त्याच्या सामर्थ्याची मर्यादा कोणत्या प्राण्यांमध्ये आहे? सिंह, जो जंगलातील अत्यंत शक्तिशाली प्राणी मानला जातो, हत्तीच्या सामर्थ्यापासून घाबरतो आणि त्याच्याशी भिडायला टाळतो. हत्ती दिसताच सिंह आपला मार्ग बदलतो, कारण त्याला हत्तीच्या विशालतेची आणि ताकदीची भीती असते.

सिंह गेंड्याला पाहून थरथर कापतो आणि त्याच्या विशालतेला सामोरे जाण्याऐवजी लगेच पळून जातो.

### खापर

एका मनुष्यापाशी बराच पैसा होता, पण तेवढ्याने त्याचे समाधान होईना. कित्येक व्यापारी लोकांनी अगदी थोड्या वेळात हजारो रूपये मिळविलेले पाहून, आपणही व्यापारावर पैसा मिळवावा, असे त्यास वाटले. मग त्याने काही भांडवलावर व्यापार केला व त्यात त्यास सुदैवाने पुष्कळ पैसा मिळाला.

'इतक्या अल्प अवकाशात तुम्ही एवढे श्रीमंत कशाने झाला?' असा काही लोकांनी त्यास प्रश्न केला; तेव्हां तो म्हणतो, 'हे सगळे चातुर्याचे आणि उद्योगाचे फळ आहे.' मिळालेल्या पैशांत समाधान मानून तो मनुष्य जर स्वस्थ बसला असता, तर त्यास आपले सगळे आयुष्य मोठ्या सुखाने घालविता आले असते, परंतु दुर्दैवाने आणखी द्रव्य मिळविण्याची इच्छा त्यास उत्पन्न झाली. शेवटी व्यापार करता करता सगळेच पारडे फिरले आणि एके दिवशी तर दुपारच्या जेवणाचीही त्यास भ्रांत पडली! ही त्याची दुःस्थिती ऐकून काही लोक त्याच्या समाचारास आले.

त्यांनी त्यास विचारले, 'अहो, ही इतकी वाईट स्थिती तुम्हांस आली तरी कशी?' तो म्हणाला,

'हे सगळे माझ्या दैवाचे खेळ आहेत; माझ्या दैवाने माझी अशी स्थिती केली.' दैव जवळच होते, त्याने हे शब्द ऐकताच त्यास म्हटले, 'अरे बाबा, तुला जेव्हा पैसा मिळाला होता, तेव्हा जर तुला माझी आठवण झाली नाही, तर आता तुझ्या या दुःस्थितीचे खापर तू माझ्या कपाळावर का फोडतोस?'

तात्पर्य : तोटा झाल्यास त्याचे खापर नेहमी दुसऱ्यावर फोडले जाते.

# रहमते दर्शन (भाग - १)



एक-दो की बात सुनने के बाद ही महाराज दर्शनसिंह जी ने कृपाकर मुझे बुलाया। कहने लगे, क्या बात है, क्या काम करते हो? मैंने संक्षिप्त में बताया कि मैं दिल्ली प्रशासन् के विद्यालय में प्रधानाचार्या के पद पर कार्य कर रही हूँ।

यह सुनकर हुजूर मुस्कराये और कहने लगे, ऐसा पद क्यों लिया है? इस पद पर तो लोगों की गालियाँ भी सुननी और सहन करनी पड़ती हैं। फिर तुरन्त ही पूछने लगे, अच्छा, कहो क्या बात है? मैंने सारी कठिनाई विस्तार से बता दी। इस पर महाराज जी ने मुझसे सभी कठिनाई उत्पन्न करने वालों के नाम बताने को कहा। मैंने नाम बता दिये। सारा कुछ सुन कर महाराज जी उठ गये और कहा, अच्छा महाराज जी दया करेंगे। इसके साथ ही सुश्री शशि को, जो महाराज जी से बात कराने में मदद करती थीं, कहा, इनकी बात ध्यान से सुनो और मुझे बाद में और बताओ ।

### उन्होंने अपनी रहमत से मुझे बुलाया

अगले ही सप्ताह से हुजूर की कृपा से कठिनाई उत्पन्न करने वाली अध्यापिकाओं का स्थानान्तरण होना शुरू हो गया। अध्यापक संघ का महासचिव कुछ दिन बाद ही संघ के चुनावों में महासचिव पद पर हार गया तथा अंत में उनके ही समूह की उपप्रधानाचार्या का भी स्थानान्तरण हो गया। इस प्रकार विद्यालय में शांति स्थापित हो गई तथा विद्यालय का सारा कार्य सुचारू रूप से चलना आरम्भ हो गया।

इसके बाद तो मैंने सत्संग की अनेकों पुस्तकें पढ़ीं और इतना ही नहीं, विद्यालय की अनेक अध्यापिकायें भी सत्संग की पुस्तकें पढ़ने लगी हैं तथा उनमें से एक अध्यापिका ने तो वर्तमान महाराज जी, संत राजिन्दर सिंह जी से नामदान भी ग्रहण कर लिया है तथा निरंतर सत्संग सुनने के लिए समय निकालती है।

-------------------

### उनके लिए कोई अछूत नहीं था

परम संत कृपालसिंह जी महाराज को ज्योति जोत समाये एक वर्ष बीत चुका था। महाराष्ट्र की संगत अपने आने वाले मार्गदर्शक का बड़ी बेसब्री से इंतजार कर रही थी । उस घोर अधकार में दयाल पुरुष संत दर्शनसिंह जी महाराज के रूप में एक प्रकाश पुंज प्रकट हुआ। कुछ समय पश्चात महाराज जी ने बम्बई के दौरे का कार्यक्रम बनाया। महाराज जी बम्बई आये और अपने अमृत वचनों से संगत को निहाल किया। इसके पश्चात महाराज जी ने नामदान की अमूल्य दात से संगत को निहाल किया। मुझे भी हुजूर ने नामदान बख़्शा। मैं नामदान की दौलत पाकर इतनी ख़ुश थी कि इस दौलत के सामने, मुझे दुनिया की सारी दौलतें फीकी नज़र आने लगीं। माटुंगा, बम्बई के पश्चात महाराज जी का कार्यक्रम ठाणे ज़िले में दो जगह सत्संग करने का था। महाराज जी ने अपने सत्संग में नेक कमाई के

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग - २)

इस चक्र पर जो कम्पन होते हैं उनकी आवाज एक नाद की तरह होती है। इस लिये इसे अनाहत चक्र कहते हैं।

इस चक्र की सिद्धि होने पर व्यक्ति अपनी शक्ति को दूसरे शरीर में प्रविष्ट करने में समर्थ हो जाता है। इस चक्र के जागृत होने पर शरीर में से सुगंध निकलने लगती है, जिस से ना केवल व्यक्ति परंतु पेड़ पौधे भी उल्लसित हो जाते हैं। यह चक्र उच्च भावनाओं से भरे हृदय तथा अध्यात्मिक विकास का प्रतीक है। इसका संतुलन खराब होने पर कई बीमारियों हो जाती हैं जिस के परिणाम स्वरूप प्रेम वा सेवा भावना का अभाव, सम्बन्धों में गिरावट, निराशा वा डिप्रेशन आदि हो जाते हैं।

यह चक्र थाईमस ग्रन्थि से जुड़ा हुआ है। यह ग्रंथि हृदय के करीब होती है। इस ग्रंथि के रस स्त्राव से शरीर की रोग निवारण शक्ति बढ़ जाती है। व्यक्ति को रोग से मुक्त होने में अधिक बल मिलता है। नाकारात्मक चिंतन से हृदयदाह का रोग हो जाता है जिस से यह ग्रंथि कमजोर हो जाती है और इस से शरीर में रोग प्रतिरोधक शक्ति कम हो जाती है जिस से कैंसर, टी.बी. आदि भयंकर रोग हो जाते हैं।

### अनाहत चक्र

यह चक्र दूसरों के साथ आपस में बटे हुए गहरे रिश्ते और बिना शर्त प्यार की स्थिति को नियंत्रित करता है। प्यार एक उपचारात्मक शक्ति है, यह चक्र भी चिकित्सा का केंद्र माना जाता है। परोपकारिता, खुद के लिए तथा दूसरों के लिए प्यार, क्षमा, अनुकम्पा तथा सुख यह संतुलित अथवा खुले अनाहत चक्र की गहरी विशेषतायें हैं। इसमें इच्छाओं को पूरा करने की शक्ति है। अगर यह चक्र सही प्रकार संतुलित और शुद्ध है तो मनोकामनाएं जल्दी से पूरी हो जाती हैं।

अनाहत चक्र २

यह चक्र हृदय समेत नाक के ऊपरी भाग में मौजूद है तथा ऊपर के अंगो का काम इसके अधीन है। यह चक्र मुख्य रुप से दिल, थाईमस और फेफड़ों को नियंत्रित करता है। अनाहत अर्थात खुला हुआ अर्थात अजेय । यह चक्र हृदय के द्वारा शरीर की हरेक कोशिका को खून और आक्सीजन पहुंचाता है। यह चक्र बहुत ही महत्वपूर्ण है क्योंकि यह दिल को नियंत्रित करता है और दिल बहुत नाजुक है यह यदि रुक जाये तो व्यक्ति की ५ मिनट में मृत्यु हो जाती है।

कानों का एक मुख्य काम है सुनना, आंखों का काम है देखना, नाक का काम है सांस लेना, मुख का काम है खाना, पैरों का काम है चलना ऐसे ही अनाहत चक्र का मुख्य काम है खून की सप्लाई शरीर के हर एक भाग को पहुंचाना तथा इस का सूक्ष्म कार्य है प्रेम, दया, कल्याण, सेवा, सहयोग और अपनेपन की भावनाओं का विकास करना। इस चक्र का सीधा सम्बन्ध प्रेम से है। जितना प्रेम करेगें, प्रेम के संकल्पों में रहेंगे उतना ही यह चक्र सक्रिय होता जायेगा और शरीर निरोगी और शक्तिशाली बनता जाएगा। यह केन्द्र बहुत शक्तिशाली है और प्यार की तरंगे छोड़ता है, जो व्यक्ति को सकून देती हैं तथा सभी जीव जन्तु तक भागे चले आते हैं। यह केन्द्र अपने आप कार्य करने लगता है जब हम प्यार का संकल्प मन में रखते हैं, उसे रिपीट करते हैं और कार्य व्यवहार में सोचते रहते हैं कि मैं प्रेम स्वरूप हूं।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**मुलगी** : हॉटेलचे बील तुम्ही पुरुषांनीच द्यायचे असतं म्हणूनच कार्डावर लिहिलेलं असतं 'MEN-U' समजलं ? **मुलगा** : नाही ग वेडे, असं नाहीये. ते दोघांनी मिळून Pay करायचं असतं 'ME-N-U'... चल दे अर्धे बील दे.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

❊ कोणत्या देशाचे खेळाडू बॉल कुरतडतात?

– इंग्लड, द.आफ्रिका, ऑस्ट्रेलिया

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

**२) तीन महिने ते एक वर्ष :** या काळात बाळ आईला चांगल्या प्रकारे ओळखायला लागते. आईने बोललेले शब्द बाळाला 'कळायला लागतात. आईचा स्पर्शदेखील बाळाला समजतो, त्यामुळे बाळ घरातील इतर सदस्यांकडे न राहता, केवळ आईकडेच राहण्याचा हट्ट करते. या काळामध्ये बाळ अंघोळीच्या वेळी हात पाय हलविणे, तोंडाने आवाज करणे या सर्व क्रिया खूप आनंदाने करीत असते. वेगवेगळ्या आकाराची, रंगांची खेळणी बाळाला खेळण्यास देऊन आपण त्याच्या बुद्धीला चालना देऊ शकतो. बाळाच्या घ्राणेंद्रियांचा विकास होण्यासाठी गुलाब, मोगरा, जाई, जुई या नैसर्गिक फुलांचा वास आपण बाळाला देऊ शकतो. फुलांचा वास देताना बाळाच्या नाकामध्ये परागकण जाणार नाहीत व ते फूल 'बाळ तोंडात घालणार नाही, याची दक्षता घ्यावी. थोडेसे अंतर ठेवूनच बाळाला फुलांचा वास द्यावा. घ्राणेंद्रिय उत्तेजित केल्यामुळे बाळाच्या बुद्धीला नक्कीच चालना मिळेल.

रसनेंद्रियाचा विकास चांगला होण्यासाठी बाळ १५ दिवसांचे झाल्यावरच त्याला विनि फळांच्या रसाची चव चाखवावी. बाळ चार महिन्यांचे झाल्यावर त्याला बाहेरील पेयपदार्थ थोडे सर्व पदार्थांमधील याचे झाल्याला पालकाच्या जास्त प्रमाणात देण्यास सुरुवात करावी. सर्वांत प्रथम बाहेरील अन्न सुरू करण्याआधी अन्नप्राशन संस्कार करून घ्यावा. त्यानंतर वरणाचे पाणी, पालकाच्या भाजीचे पाणी बाळाला देण्यास सुरुवात करावी. बाळ सहा महिन्यांचे झाल्यावर फळांचे ज्यूस, भाज्यांचे सूप, नाचणीसत्त्व बाळाला द्यावे. पासव पदाथामधाल चवीतील फरक बाळ चांगल्या प्रकारे ओळखू लागते. यातील काही पदार्थ बाळ आवडीने खाते, तर काही पदार्थ खाताना बाळ रडावयास लागते. चवीमधील फरक ओळखता यण म्हणजच रसनेंद्रियाचा विकास करून मेंदला उत्तेजित करणे होय. याचे खास उदाहरण द्यावयाच म्हणजे औषध पिताना त्याची चव बाळाला आवडत नाही, म्हणून बाळ लगेचच रडावयास सुरुवात करते. मारोतमाम

### पंचेंद्रियांचा विकास

स्पर्शेंद्रियाचा विकास चांगला होण्यासाठी बाळाला जास्तीत जास्त आईच्या जवळ ठेवावे.

बाळाला आईने शास्त्रोक्त मसाज करणे, अभ्यंगस्नान घालणे यामधून आपण बाळाच्या स्पर्शद्रियाचा विकास करू शकतो. याचबरोबर घ्राणेंद्रियांचा विकास व्हावा म्हणून स्नेहन (मसाज) करताना औषधीसिद्ध 'दुर्वांकुर बेबी ऑईल' वापरावे, यामुळे बाळाची रोगप्रतिकारशक्ती वाढून बाळाचे आरोग्य चांगले राहते. आईने स्नेहन करताना एखादे बडबडगीत, बालगीत किंवा एखादा मंत्र वारंवार म्हणावा. यामधून आपण बाळाच्या श्रवणेंद्रियाला उत्तेजना देऊ शकतो. स्नेहन करताना बाळाशी गप्पा मारणे, मस्ती घालणे, गुदगुल्या करणे हे प्रयोग आनंदाने करावेत. आईने वात्सल्यपूर्वक, प्रेमाने केलेले स्नेहन बाळाला नक्कीच आनंददायी ठरते.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## शेंगाच नव्हे, पानेही गुणकारी!

आपल्याकडे मृग नक्षत्र सुरू झाले की, शेवग्याची भाजी बनवून खाण्याची प्रथा आहे. मात्र, केवळ मृग नक्षत्रात किंवा पावसाळ्यातच नव्हे, तर वर्षभर कधीही शेवग्याच्या पानांची भाजी खाणे आरोग्यासाठी उत्तम ठरू शकते. शेवग्याच्या पानांमध्ये अनेक पोषक घटक असतात जे आपल्या शरीराला लाभदायक ठरतात, असे तज्ज्ञ सांगतात.

शेवग्याच्या पानात व्हिटॅमिन्स ए, सी, ई, आणि बी-कॉम्प्लेक्स, कॅल्शियम, पोटॅशियम, प्रोटिन आणि फायबरचे प्रमाण जास्त प्रमाणात असते. नियमित सेवनाने आपल्या शरीराला पोषकतत्त्व मिळतात आणि आरोग्य चांगले राहते.



शेवग्याच्या पानात अँटी ऑक्सिडेंट तत्त्वांचा खजिना आहे. त्यामुळे रोगप्रतिकारक शक्तीत वाढ होते. तसेच शरीर आजारांचा योग्य प्रकारे सामना करू शकते. शेवग्याची पाने सकाळी उपाशी पोटी चावून खाल्ल्यास रक्तदाबावर नियंत्रण राहाण्यास मदत मिळते. यातील पोटॅशियम आणि मॅग्नेशियम हृदयाच्या ठोक्यांना नियंत्रित करण्यास सहायक ठरते. त्यामुळे हृदयाशी संबंधित आजारांचा धोका कमी होतो.

शेवग्याच्या पानात फायबरचे प्रमाण जास्त असते, त्यामुळे पचनयंत्रणादेखील चांगली रहाते. यामुळे बद्धकोष्ठतादेखील दूर रहाते, अन्य पचनासंदर्भातील आजारही दूर होतात. या पानात व्हिटॅमिन्स ए आणि ईचे प्रमाण जादा असते. त्यामुळे त्वचा आणि केसांचे आरोग्य चांगले होते. त्वचेला सुरुकत्या होण्याचे प्रमाणदेखील कमी होते. शेवग्याच्या पाने मेटाबॉलिझ्म म्हणजेच चयापचय क्रिया वाढविण्यास मदत करतात, ज्यामुळे वजन नियंत्रणात राहाते. याच्या सेवनामुळे भूक कमी होते आणि शरीरातील ऊर्जा वाढते.

शेवग्याच्या पाने खाल्ल्याने ब्लड शुगरची पातळी नियंत्रणात राहाते. त्यामुळे मधुमेह असणार्यांना ही पाने चघळल्याने फायदा होतो. मानसिक आरोग्यासाठीही शेवग्याची पाने चांगली असतात. यातील तत्त्वे तणाव आणि चिंता दूर करतात.

## अंतराळवास्तव्याचे परिणाम

भारतीय वंशाच्या सुनीता विल्यम्स आणि बॅरी विल्मोर या नासाच्या अंतराळवीरांना घेऊन बोईंग कंपनीचे 'स्टारलायनर' हे यान ५ जून रोजी अंतराळात झेपावले. त्यांनी ८ दिवस राहण्याची योजना आखली होती. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरून एक किंवा दोन आठवड्यांत ते परततील अशी अपेक्षा होती. मात्र आता एक महिना होत आला असून अद्याप 'स्टारलायनर' पृथ्वीवर परतले नाही. अंतराळवीर 'आयएसएस'मध्ये सुरक्षित आणि चांगल्या स्थितीत असले, तरी त्यांचा परतीचा प्रवास सध्या लांबला आहे. अर्थात अंतराळ स्थानकात सलग सहा-सहा महिनेही राहिलेले अंतराळवीर आहेत. मात्र, दीर्घकाळ अंतराळात राहिल्याने शरीरावर कोणते परिणाम होऊ शकतात, याचीही माहिती असणे आवश्यक असते.दीर्घकाळ अंतराळात राहिल्याने शरीरावर हे होतात परिणाम

अंतराळात गुरुत्वाकर्षणाच्या अभावामुळे शरीरातील द्रव पदार्थांचे (जसे रक्त आणि पाणी) नुकसान होते.



सामान्यतः गुरुत्वाकर्षण शरीरातील द्रव संतुलित ठेवते. पण सूक्ष्म गुरुत्वाकर्षणामध्ये, शरीराला द्रव पदार्थ उलट (पायापासून डोक्याच्या) दिशेने वाहू लागते, ज्यामुळे किडनीला त्रास होऊ शकतो. मूत्रपिंड योग्य द्रव संतुलन राखण्यासाठी संघर्ष करतात, ज्यामुळे दीर्घकालीन निर्जलीकरण होऊ शकते किंवा द्रव घटकांचे प्रमाण वाढण्याची शक्यता असते. सूक्ष्म गुरुत्वाकर्षणामुळे हाडांमधून कॅल्शियमचे उत्सर्जन वाढल्याने मुतखड्याचा धोका वाढतो, जो वेदनादायक असतो. अंतराळात, या त्रासाला सामोरे जाणे आणखी कठीण आहे कारण शरीरातून मुतखडा बाहेर पडण्यासाठी आवश्यक गुरुत्वाकर्षण तिथे उपलब्ध नसते. अंतराळामध्ये रेडिएशनच्या संपर्कात आल्यास सतत धोका वाढतो. किडनीच्या पेशी आणि ऊतींना नुकसान करू शकते, ज्यामुळे किडनीच्या गंभीर आजाराचा धोका वाढतो.

सतत गुरुत्वाकर्षणाच्या कमतरतेमुळे सूक्ष्म गुरुत्वाकर्षण शरीराची हाडे आणि स्नायू कमकुवत करते. अंतराळात गुरुत्वाकर्षणाच्यामुळे शरीराच्या वेगवेगळ्या भागांमध्ये, विशेषत: डोके आणि कंबरे वरच्या भागांमध्ये शरीताली द्रव पदार्थ (जसे रक्त आणि पाणी) उलट दिशने वाहू लागतात ज्यामुळे चेहरा सुजतो, टाळूवर दाब वाढू शकतो आणि दृष्टी कमी होऊ शकते. तसेच मेंदूच्या कार्यावर परिणाम होऊ शकतो. कॉस्मिक रेडिएशनच्या संपर्कात आल्याने कॅन्सर आणि गंभीर रेडिएशन सिकनेसचा धोका वाढतो.



## स्वर्गात जमीन घ्यायचीय?


स्वर्ग किंवा नरक कसे असेल, यावर आतापर्यंत अनेक दावे-प्रतिदावे केले गेले आहेत. याच्याशी संबंधित अनेक घटनाही आपण ऐकल्या आहेत. पण, त्या खर्या आहेत की खोट्या, याविषयी नेहमीच संभ्रम आहे. अर्थात, यादरम्यान काही दावे असेही होतात, ज्या निव्वळ थक्क करणार्या असतात. अशातच सोशल मीडियावर एक व्हिडीओ बराच व्हायरल होत असून यात 'स्वर्गात जमीन मिळेल, तीही अतिशय स्वस्तात', अशी जाहिरात केली गेली आहे.

सोशल मीडियावर एका चर्चने हा व्हिडीओ व्हायरल केला असून, यातील अनोखी ऑफर यामुळे विशेष चर्चेत आली आहे. 'इग्लेसिया डेल फाइनल डे लॉस टिमपोस' असे या चर्चचे नाव असून, या चर्चला 'चर्च ऑफ द एंड ऑफ टाइम्स' या नावानेही ओळखले जाते. चर्चमधील फादरनी या व्हिडीओत असा अजब दावा केला आहे की, आपले देवाशी थेट बोलणे झाले आहे आणि त्यांना यात देवाकडून स्वर्गात जागा खरेदी-विक्री करण्याची परवानगी मिळाली आहे. स्वर्गामध्ये प्रति चौरस फूट ८ हजार रुपये दराने जागा मिळेल, असेही या फादरनी सदर व्हिडीओत पुढे नमूद केले आहे.

रिपोर्टनुसार, चर्चमधील फादर देवाच्या महलाच्या आजूबाजूच्या प्रमुख जागा आणि स्वर्गातील निश्चित जागा मिळवून देण्याचा दावा करतात. एका इन्स्टाग्राम अकाऊंटवर हा व्हिडीओ शेअर करण्यात आला आहे. हा ३२ सेकंदांचा व्हिडीओ इंटरनेटवर खळबळ उडवत आहे. अनेकांनी या व्हिडीओवर कमेंट करताना हा व्हिडीओ फक्त मनोरंजनाच्या हेतूने तयार केला असेल, असा दावा केला आहे. यातील काही भन्नाट कमेंट अर्थातच रंजक ठरत आल्या आहेत.

## सर्वसामान्यांना करता येणार स्पेसवॉक

आतापर्यंत नासाच्या विविध मोहिमांमधून अंतराळ यात्री स्पेसवॉक करत आले आहेत. मात्र, आता सर्वसामान्यांसाठीही स्पेसवॉक करता येणार आहे. एलन मस्क यांच्या मालकीची 'स्पेसएक्स' ही एरोस्पेस कंपनी लवकरच पहिले व्यावसायिक स्पेसवॉक फ्लाईट लाँच करणार असून, त्याची तयारी अंतिम टप्यात आली आहे. मिशन पोलरिस डॉन या मोहिमेंतर्गत प्रवासी स्वखर्चाने अंतराळात स्पेसवॉकचा आनंद यामुळे घेऊ शकणार आहेत. अंतराळ यानातून बाहेर पयेत अंतराळात चालणे याला 'स्पेसवॉक' असे संबोधले जाते.



या मोहिमेची प्रारंभिक घोषणा २०२२ मध्ये केली गेली होती. त्यानंतर विविध टप्प्यांत ही योजना प्रत्यक्षात उतरवण्याची तयारी सुरु होती. ती तयारी आता अंतिम टप्यात पोहोचली आहे. पोलरिस डॉनची योजना अंतराळात मनुष्याला अधिक काळ राहण्यानुरुप बनवण्याच्या दिशेने डिझाईन केली गेली आहे. पोलरिस मिशनच्या माध्यमातून अंतराळात मनुष्यावर होणाऱ्या परिणामांवर देखील लक्ष ठेवले जाणार आहे. न्युरो ओक्युलर सिंड्रोम अर्थात एसएएनएस याचाही यात समावेश आहे. एखादी व्यक्ती अंतराळात मायक्रो ग्रॅव्हिटीमध्ये असते. त्यावेळी स्पायनल फ्लयूडचा दबाव मेंदू, डोळ्यांच्या नसाच्या आसपास असतो. यामुळे अनेक समस्या निर्माण होतात. असे सर्व धोके कसे टाळता येतील, यावरही यात भर दिला जाणार आहे.

या मोहिमेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे मागील ५० वर्षांत एकही मानव इतक्या दूर पाठवण्यात आलेला नाही. ५२ वर्षांपूर्वी १९७२ मध्ये अपोलोची चांद्र मोहीम यशस्वी झाली. त्यावेळी नील आर्मस्ट्राँग चंद्राच्या पटलावर पाऊल टाकणारे पहिली व्यक्ती ठरले होते. त्यानंतर स्पेसएक्सची पहिलीच मोहीम अशी आहे, ज्यात अंतराळात सर्वात दूरचे अंतर कापले जाणार आहे. १९६५ मध्ये जेमिमी-४ वर अंतराळवीर एड व्हॉईट यांनी सर्वप्रथम स्पेसवॉक केले.

## अमर ताऱ्यांच्या ऊर्जेचे रहस्य

आपली सौरमालिका ज्या आकाशगंगेचा एक भाग आहे तिला 'मिल्की वे' असे नाव आहे. या आकाशगंगेच्या केंद्रभागी तार्यांचा एक विशिष्ट समूह आहे. या तार्यांना मिळणार्या ऊर्जेचा स्त्रोत अंतहीन असल्याने हे तारे जणू काही 'अमर'च बनलेले आहेत. त्यांना ही ऊर्जा 'डार्क मॅटर'मुळे मिळत असल्याचे संशोधकांनी म्हटले आहे. हे तारे सातत्याने डार्क मॅटरचे कण पकडून ते नष्ट करीत आहेत व या क्रियेतूनच त्यांना ऊर्जा मिळत आहे, असे एका नव्या संशोधनातून दिसून आले.

संशोधकांनी या अभ्यासासाठी कॉम्प्युटर सिम्युलेशन्सचा वापर केला. त्यांना आढळले की या तार्यांच्या गुरुत्वार्षणाने डार्क मॅटरचे जे कण पकडलेले असतात ते तार्यामध्ये वारंवार एकमेकांना धडकतात व त्यांचे रुपांतर सामान्य कणामध्ये होते. या प्रक्रियेत ते लक्षणीय प्रमाणात ऊर्जा उत्सर्जित करतात. ऊर्जेचा हा अतिरिक्त स्त्रोत संबंधित तार्याची स्थिरता टिकवून ठेवण्यास मदत करतो.



एखाद्या तार्याचा नियमित आण्विक इंधनाचा पुरवठा संपला की त्याचा मृत्यू होतो. मात्र, असा अतिरिक्त पुरवठा होत असल्याने हे तारे जणू काही अमरच बनत आहेत. स्टॉकहोम युनिव्हर्सिटीतील इसाबेल जॉन यांनी याबाबतची माहिती दिली. प्रत्येक आकाशगंगेच्या केंद्रस्थानी एक शक्तिशाली कृष्णविवर असते. 'मिल्की वे'च्या केंद्रभागीही असेच एक शक्तिशाली कृष्णविवर आहे. त्याच्या जवळच असा तार्यांचा समूह आहे.

## हिंगाचे सेवन का गरजेचे?

हिंग हा एक असा मसाला आहे, जो डाळींपासून ते भाज्यांपर्यंत प्रत्येक पदार्थाला चांगली चव देतो. प्रत्येकाच्या स्वयंपाकघरात या मसाल्याशिवाय कोणतेही अन्न पूर्ण मानले जात नाही. पण, तुम्हाला माहीत आहे का की, हिंग डाळी आणि भाज्यांची चव तर वाढवतोच; पण याचा आरोग्यालाही भरपूर फायदा होतो. हिंगामध्ये असलेले पोषकतत्त्व आपल्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर आणि आवश्यक आहेत. त्याच्या वापराने अनेक गंभीर आजारांवर नियंत्रण ठेवता येते. हिंगाचे नियमित सेवन केल्यास अनेक आजारांवर मात करता येते, असे तज्ज्ञ सांगतात. जाणून घेऊया याचे फायदे...

हिंग पचनक्रिया सुधारण्यास मदत करते. यामुळे गॅस, अपचन आणि पोटदुखी यांसारख्या समस्यांपासून आराम मिळतो. हिंगाचे सेवन केल्याने पाचक एंझाइम अधिक सक्रिय होतात, ज्यामुळे अन्नाचे पचन सुधारते.

ऋतू कोणताही असो, अॅसिडिटी आणि गॅसची समस्या सामान्य आहे. एक ग्लास गरम पाण्यात चिमूटभर हिंग मिसळून प्यायल्याने आम्लपित्त आणि गॅसपासून आराम मिळतो. हिंगातील अँटिव्हायरल आणि अँटिबॅक्टेरियल गुणधर्म सर्दी आणि खोकल्याच्या उपचारातदेखील मदत करतात.




गरम पाण्यात हिंग मिसळून प्यायल्याने घसादुखी आणि खोकल्यापासून आराम मिळतो.

हिंगामध्ये दाहक-विरोधी गुणधर्म असतात जे मासिक पाळीच्यादरम्यान वेदना आणि पेटके दूर करण्यास मदत करतात. कोमट पाण्यात हिंग टाकून सेवन केल्याने मासिक पाळीत येणार्या वेदनांच्या समस्यांपासून आराम मिळतो. हिंग आरोग्यासाठी फायदेशीर असले, तरी त्याचे मर्यादित प्रमाणात सेवन केले पाहिजे. कारण, त्याचे जास्त प्रमाणात सेवन केल्याने डोकेदुखी, मळमळ आणि उलट्या यासारख्या समस्या उद्भवू शकतात. गरोदर महिला आणि लहान मुलांनी डॉक्टरांच्या सल्ल्यानेच हिंगाचे सेवन करावे. वेगवेगळ्या ऋ तूंमध्ये चिमूटभर हिंग वापरून तुम्ही अनेक आजारांपासून दूर राहू शकता आणि तुमचे आरोग्य सुधारू शकता.

## चंद्रावर आढळली मोठी गुहा

खगोलशास्त्रज्ञांनी चंद्रावर एका मोठ्या गुहेचा छडा लावला आहे. ५५ वर्षांपूर्वी नील आर्मस्ट्राँग आणि बझ ऑल्ड्रिन ज्याठिकाणी उतरले होते, त्या ठिकाणापासून ही गुहा जवळच आहे. संशोधकांच्या म्हणण्यानुसार याठिकाणी अन्यही शेकडो गुहा असू शकतात.




त्यामध्ये भविष्यात अंतराळवीर आश्रय घेऊ शकतील.

इटालियन वैज्ञानिकांच्या एका टीमने सांगितले की, चंद्रावर एक मोठी गुहा असल्याचे पुरावे मिळाले आहेत. 'अपोलो-११' च्या लँडिंग स्थळापासून ही गुहा केवळ ४०० किलोमीटर अंतरावरील 'सी ऑफ ट्रँक्विलिटी' याठिकाणी आहे. ही गुहा म्हणजे एक खोल खड्डा किंवा विवरच असून, ती यापूर्वी शोधण्यात आलेल्या २०० पेक्षा अधिक अन्य खड्ड्यांप्रमाणेच एक लाव्हा ट्यूब खचल्यामुळे निर्माण झाली होती. संशोधकांनी 'नासा'च्या लूनार रिकनायसन्स ऑर्बिटरद्वारे रडार मोजमापांचे विश्लेषण केले आणि पृथ्वीवरील लाव्हा ट्यूबशी त्यांची तुलना केली. याबाबतच्या संशोधनाचे निष्कर्ष 'नेचर अॅस्ट्रॉनॉमी' या नियतकालिकात प्रसिद्ध करण्यात आले आहेत. त्यानुसार 'मारे ट्रँक्विलिटी' नावाचा खड्डा हा चंद्रावरील सर्वात खोल खड्डा आहे. तो ४५ मीटर रुंद आणि ८० मीटर लांबीच्या एका गुहेकडे जातो. ही गुहा चंद्राच्या पृष्ठभागापासून सुमारे १५० मीटर खोलीवर आहे. तिचे क्षेत्रफळ सुमारे चौदा टेनिस कोर्ट इतक्या आकाराचे आहे. इटलीच्या ट्रेंटो विद्यापीठातील लोरेंजो ब्रुजोन यांनी या गुहेला एक संभाव्य पोकळ लाव्हा ट्यूब ठरवले आहे.

## टॅटूप्रेमींनो सावधान!

सध्या फॅशन फ्रिक लोकांना कपड्यांसोबतच काही वेगळी शैली अंगीकारणे आवडते. ज्यामध्ये तुम्हाला अनेक टॅटू प्रेमी सापडतील, ज्यांना त्यांच्या शरीरावर एकापेक्षा जास्त डिझाईन कोरणे आवडते. पण, अशा टॅटूप्रेमींनी थोडे सावध राहणे आवश्यक आहे. कारण, ते आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकते. यासंदर्भात नुकत्याच झालेल्या एका अभ्यासातून असे समोर आले आहे की, टॅटू काढणार्या लोकांमध्ये रक्ताचा कर्करोग असलेल्या लिम्फोमाचा धोका ८१ टक्क्यांपर्यंत जास्त असतो.

स्वीडनमध्ये याबाबत टॅटूवर केलेल्या संशोधनात असे समोर आले आहे



की, टॅट्टू बनवल्याने ब्लड कॅन्सरचा धोका वाढतो. यासंदर्भात संशोधकाने स्वीडिश नॅशनल कॅन्सर रजिस्टरचा १० वर्षे म्हणजेच २००७ ते २०१७ या कालावधीत २० ते ६० वर्षे वयोगटातील लोकांचा सखोल अभ्यास केला होता, ज्यामध्ये शाई वापरल्याचे आढळून आले. टॅटूसाठी त्यात आढळणारे रसायन लिम्फोमाचा धोका वाढवते. सध्यातरी याबाबत कोणताही ठोस पुरावा समोर आलेला नाही.

संशोधनात असे आढळून आले आहे की, टॅटूच्या शाईमध्ये अनेकदा कर्करोग निर्माण करणारे पदार्थ असतात. सर्वप्रथम टॅटू बनवण्याच्या प्रक्रियेत सुगंधी अमाइन, पॉलिसायक्लिक फ्रॅग्रन्स हायड्रोकार्बन्स आणि धातू वापरल्या जातात.

## गाजरातील पोषण खजिना

पूर्वी गाजरे केवळ हिवाळ्यात मिळत असत; पण हल्ली ती वर्षभर बाजारात उपलब्ध असतात. अर्थातच गाजर खायला अनेकांना आवडतंही. गाजर विविध भाज्यांमध्ये किंवा सलाड म्हणून सर्व्ह केले जाते. शिवाय गाजरापासून हलवा, मिठाईही बनवली जाते. काही लोक दररोज गाजर खातात. रोज गाजर खाण्याचे अनेक फायदेही आहेत. त्याबाबतची ही माहिती...

**डोळ्यांसाठी चांगले** – यात व्हिटॅमिन-ए चे प्रमाण जास्त असते.



हे डोळ्यांसाठी लाभदायक असते. गाजर चांगली दृष्टी राखण्यास आणि डोळ्यांच्या विविध समस्या कमी करण्यास मदत करते.

**कर्करोगापासून बचाव** – गाजर हे अँटिऑक्सिडंट्सने समृद्ध आहे. हे अँटिऑक्सिडंट कर्करोग रोखण्यास मदत करते. त्यामुळे गाजर नियमितपणे खावे.

**हृदय निरोगी ठेवते** – गाजर हृदयासाठीही चांगले असते. कारण अनेक घटक रक्तदाब नियंत्रित करतात. यात लाइकोपीनदेखील असते. तसेच हृदयासाठीही फायदेशीर आहे.

**रोगप्रतिकार शक्ती वाढवते**– यात व्हिटॅमिन-सी देखील भरपूर प्रमाणात असते. यामुळे रोगप्रतिकार शक्ती वाढते. पावसाळ्यात रोगप्रतिकार शक्ती कमी होते. जर तुम्ही गाजर नियमित खाल्ले तर ही समस्या कमी होईल.


**पचनक्रियेसाठी चांगले** – गाजर पोट निरोगी ठेवते आणि पचनक्रिया सुधारते. त्यात फायबरचे प्रमाण जास्त असते. हे फायबर पोट निरोगी ठेवण्यास आणि पचन सुधारण्यास मदत करते.

**वजन कमी करण्यास मदत करते** – यामुळे चयापचय वाढण्यास मदत होते. त्यामुळे चरबी वेगाने वितळते. त्यामुळे गाजर नियमित खाणे फायदेशीर ठरते.

**त्वचा निरोगी ठेवते** – गाजरातील अनेक घटक त्वचेसाठी चांगले असतात. गाजर नियमित खाल्ल्यास त्वचा चमकेल आणि त्वचेचा कोरडेपणा दूर होईल.

**रक्तदाब नियंत्रित करते** – गाजरातील अनेक घटक रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करतात. थंड हवामानात अनेकांना उच्च रक्तदाबाचा त्रास होतो. गाजर त्यांच्यासाठी खूप उपयुक्त आहे.

## नशेत बेधुंदाची बुडी



दारूच्या नशेत असलेली माणसं काय करतील, याचा काही भरवसा नसतो. तैवानमध्ये एका मद्यपीने असाच एक अनोखा पराक्रम केला. एका रिंगच्या सहाय्याने किनाऱ्याजवळ समुद्रात तरंगत असलेल्या या माणसाने दारू पिली आणि त्या नशेत तो कधी समुद्राच्या पाण्यात पुढे जात राहिला, हे त्याला कळलेही नाही. ज्यावेळी त्याला भान आले, त्यावेळी आपण समुद्रात एकटेच तरंगत आहोत, असे दिसले. अशा स्थितीत तो १९ तास एकटाच तरंगत राहिला होता!

समुद्रात रात्रभर तो रिंगवरच

गेल्या ७ जुलैला तैवानच्या न्यू तैपेईच्या एका बेटाकडे जात असलेल्या मच्छीमारांच्या बोटीतील लोकांना दूर अंतरावर पाण्यावर काही तरी तरंगत असताना दिसले. त्यांनी बोट त्या दिशेने नेल्यावर त्यांना एका रबरी ट्यूबच्या सहाय्याने एक माणूस तरंगत असल्याचे दिसले. दूर समुद्रात अशा स्थितीत कुणी दिसणे, ही चमत्कारिकच बाब होती. त्यांनी या माणसाला वाचवले आणि त्याला बोटीत ओढून घेतले. त्याचा एक व्हिडीओही समोर आला आहे. पिण्यास पाणी न मिळाल्याने थकलेल्या या ५७ वर्षांच्या माणसाला आपला जीव वाचला, हेच पुष्कळ वाटत होते. हाँग नान नावाच्या या माणसाने सांगितले की, ६ जुलैला सायंकाळी सहाच्या दरम्यान तो कामावरून परत आला. थकवा वाटत असल्याने तो थोडावेळ रिंग घेऊन समुद्रात गेला. तिथे त्याने दारू प्यायली आणि रिंगवरच त्याचा डोळा लागला. काही तासांनी त्याला जाग आली त्यावेळी तो समुद्राच्यामध्ये होता व दूरपर्यंत त्याला पाण्याशिवाय दुसरे काही दिसत नव्हते.

# थॅलेसेमिया : एक विश्व

दरवर्षी ८ मे हा दिवस जागतिक थॅलेसेमिया दिन म्हणुन साजरा केला जातो. थॅलेसेमिया इंटरनॅशनल फेडरेशन (TIF) द्वारे १९९४ साली जागतिक थॅलेसेमिया दिन साजरा करण्यास सुरुवात झाली. थॅलेसेमिया आजाराबद्दल जागरुकता निर्माण करणे, त्याची लक्षणे, कारणे, निदान आणि उपचारांच्या पर्यायांबद्दल लोकांना शिक्षीत करणे या मुख्य उद्देशाने हा विशेष दिवस जगभरात साजरा केला जातो. थॅलेसेमियाग्रस्त रुग्णांच्या प्रती सहानुभुती दर्शविण्यासाठी जागतिक थॅलेसेमिया दिन एक महत्वाचा दिवस आहे. या दिवसाचे औचित्य साधुन थॅलेसेमियाची ओळख वाचकांना व्हावी यासाठी हा लेखप्रपंच.

थॅलेसेमिया हा आजचा दुर्लक्षित झालेला एक ज्वलंत असा प्रश्न आहे. संपूर्ण जगामध्ये या आजाराने डोकं वर काढलेलं आहे. कधीकाळी अतिशय गंभीर व असाध्य वाटणाऱ्या अनेक आजारांवर वैद्यकिय शास्त्रातील संशोधनाने मात केलेली आहे. अनेक साथरोगांचे आणि संसर्गजन्य आजारांचे समुळ उच्चाटन करण्यास मानवाला यश आले आहे. जीवघेणे आजार औषधेपचारांनी वा शस्त्रक्रियांनी नियंत्रणात ठेवणे किंवा बरे करणे शक्य झाले आहे. मात्र आजही असे काही आजार आहेत, ज्यावर फारसे प्रभावी उपचार उपलब्ध नाहीत. जगभरातील संशोधकांना आजही आव्हान देणाऱ्या आजारांपैकी एक म्हणजे थॅलेसेमिया.. भारतामध्येही दरवर्षी दहा ते बारा हजार नवीन मेजर थॅलेसीमिक पेशंटची भर पडते आहे. त्यापेक्षा जास्त कोवळी फुलं कोमेजून जाताहेत, त्यांचं जीवन फुलण्यापूर्वीच संपतंय. विशेष बाब म्हणजे आजाराबाबत जनजागृत नसल्याने आपला भारत देश या रोगाची राजधानी बनण्याच्या वाटेवर आहे. दुर्दैवाने आपल्या देशात थॅलेसेमिया आजाराची म्हणावी तेवढी ओळख समाजाला झालेली नाही. समाजातील खूप मोठ्या वर्गाला असा काही आजार असतो, हेच माहीत नाही. काय आहे हा थॅलेसेमिया, हा आजार किती भयंकर आहे, हा आजार कोणाला होऊ शकतो, कशामुळे होतो, याला प्रतिबंध कसा घालता येईल... याविषयीची माहिती सर्वसामान्यांना होणं अत्यत महत्त्वाचं आहे. त्याचं कारण म्हणजे, या आजाराविषयी पुरेशी माहिती असेल, तरच यापासून बचाव होऊ शकतो.

### थॅलेसेमिया म्हणजे काय?

थॅलेसेमिया या आजाराचे सर्वसाधारणपणे दोन प्रकार असतात – थॅलेसेमिया मायनर आणि थॅलेसेमिया मेजर. खरं म्हणजे आणखी एक तिसरा प्रकारही आहे, थॅलेसेमिया इंटरमीडिया. पण, थॅलेसेमिया मायनर आणि मेजर हे दोन प्रमुख प्रकार आहेत. थॅलेसेमिया मायनर हा नावाप्रमाणेच जीवघेणा आजार नाही, किंबहुना याला आजार म्हणावं किंवा नाही, याबाबतही मतभेद आहेत. बहुतेक वेळा थॅलेसेमिया मायनर रुग्णाला तो थॅलेसेमिया मायनर आहे हेही माहीत नसतं, कारण तो इतरांप्रमाणेच सर्वसामान्य जीवन जगत असतो. या आजाराचा कोणत्याही प्रकारचा त्रास त्याला जाणवत नसतो. केवळ त्याच्या रक्तातील हिमोग्लोबिनचं प्रमाण उच्चतम पातळीवर नसतं, ते नेहमी कमी असतं एवढंच. अशा व्यक्तींना बाहेरून रक्त देण्याची गरजही बहुधा पडत नाही. पण, थॅलेसेमिया मेजर मात्र नावाप्रमाणेच घातक आणि जीवघेणा आजार आहे. अशा रुग्णाच्या शरीरात हिमोग्लोबिन तयार होत नाही, त्यामुळे अशा रुग्णाला दर महिन्याला बाहेरून नियमितपणे रक्त पुरवावं लागतं.

रुग्णाचं वय जसजसं वाढत जातं, तशी त्याच्या शरीराला रक्ताची गरज अधिकाधिक भासत असल्याने महिन्यातून दोनदा–तीनदाही रुग्णाला रक्तपुरवठा करावा लागण्याची शक्यता असते. वारंवार रक्त द्यावं लागत असल्याने अशा मुलांना रक्तसंक्रमणामुळे होणारे एच आय व्ही, कावीळ, सिफलिस (Syphilis) यांसारखे आजार होण्याची शक्यता असते. रक्त घेण्यासाठी नेहमी नेहमी आयव्ही कॅन्युला (Cannula), इट्राकॅथ (Intra Cath) लावावी लागते, जे लहान मुलांच्या मानाने खूप त्रासदायक असतं.

वारंवार रक्त दिल्याने शरीरात अतिरिक्त मात्रेत लोह जमा होतं, ज्यामुळे हृदय, लिव्हर, स्पाईनचं कार्य मंदावतं. प्रमाणाच्या बाहेर लोह वाढल्यास या अवयवाचं कार्य थाबतं, परिणामी रुग्ण दगावतो. थॅलेसेमिया मेजर आजाराने ग्रस्त असलेल्या मुलांच्या शरीराची वाढ व्यवस्थित होत नाही, उंची प्रमाणात वाढत नाही, त्यांना नेहमी थकवा जाणवतो, सामान्य मुलाप्रमाणे जीवन जगण्यास मर्यादा येतात. अशा मुलांचं आयुष्य कमी असतं. एकंदरीत, त्यांचं आयुष्य हे दुःख, भीती आणि वेदनांनी भरलेलं असतं. या आजारांच्या उपचारांबद्दल बोलायचं तर, अजुनपर्यंत तरी या आजारावर निश्चितपणे लागू होईल असं औषध सापडलेलं नाही. केवळ बोन मॅरो ट्रान्सप्लान्ट, ज्याला स्टेम सेल ट्रान्सप्लांटही म्हटलं जातं, ते उपलब्ध आहे. एवढा एकच पर्याय अशा रुग्णासमोर असतो, तेही एका ठरावीक वयाच्या आत झालं, तरच यशस्वी होण्याची शक्यता अधिक असते.

बोन मॅरो ट्रान्सप्लान्ट यशस्वी झाल्यास रुग्णाच्या शरीरात हिमोग्लोबिन तयार होऊ लागतं व त्याला बाहेरून रक्त देण्याची गरज राहत नाही. रुग्ण कायमचा बरा होतो. ट्रान्सप्लान्टच्या यशस्वितेसाठी रुग्णाला त्याच्या स्टेम सेलशी शंभर टक्के जुळणाऱ्या स्टेम सेल असणारा डोनर हवा असतो. काही वेळा शंभर टक्क्यापेक्षा कमी जुळणाऱ्या स्टेम सेल असलेला डोनर उपलब्ध असेल, तरीही ट्रान्सप्लान्ट केलं जातं, परंतु स्टेम सेल ट्रान्सप्लान्टसाठी डोनर उपलब्ध होणं, ही अगदी असामान्य बाब आहे. ज्या रुग्णांना कुटुंबामध्ये असे रिलेटेड ब्लड स्टेम सेल डोनर मिळत नाहीत, त्यांना बाहेरून अनोळखी डोनर व्यक्तींकडून मॅचिंग ब्लड स्टेम सेल मिळण्याची शक्यताही असते. अशा डोनरला 'अनरिलेटेड ब्लड स्टेम सेल डोनर' म्हणतात. भारतामध्ये अशा काही संस्था आहेत, ज्या ब्लड बँकेप्रमाणे स्टेमसेल बँक चालवितात. त्यांच्यामार्फत असा डोनर उपलब्ध होऊ शकतो, परंतु भारतामध्ये आजच्या घडीला लाखामध्ये एका रुग्णाला असा अनरिलेटेड ब्लड स्टेमसेल डोनर मिळतो एवढी ही दुर्मीळ बाब आहे.

### पूर्वदक्षता हाच बचाव

थॅलेसेमिया हा एक आनुवंशिक आजार आहे, थॅलेसेमिया मायनर व्यक्ती एक सामान्य आयुष्य जगू शकते; परंतु अशी व्यक्ती थॅलेसेमिया मेजरची कॅरिअर असते. म्हणजे थॅलेसेमिया मायनर आई व थॅलेसेमिया मायनर वडील यांच्याकडून होणाऱ्या अपत्यास थॅलेसेमिया मेजर आजार होण्याची शक्यता असते. अशी शक्यता साधारण पंचवीस टक्के एवढी असते. एका अभ्यासानुसार भारतामध्ये साधारणपणे एकूण लोकसंख्येच्या तीन टक्के लोकसंख्या थॅलेसेमिया कॅरिअर आहे. वरील सर्व माहितीवरून एक गोष्ट लक्षात येईल की, हा विषय तसा साधा आणि सोपा आहे. थॅलेसेमिया मायनर मुलगा व थॅलेसेमिया मायनर मुलगी यांनी शक्यतो आपसात लग्न करू नये, जेणेकरून थॅलेसेमिया मेजर आजाराचा प्रसार होणार नाही. याउपरही जर असं लग्न झालंच, तर गर्भधारणा होताच पहिल्या दहा आठवड्यांमध्ये आईच्या पोटात असणाऱ्या बाळाची तपासणी करून, पोटात वाढणाऱ्या बाळाला थॅलेसेमिया मेजर आजार आहे किंवा नाही, हे समजू शकतं, एवढं सगळं स्पष्ट असताना केवळ माहिती नसल्याने, अज्ञानातून आपण या महाभयंकर आजाराला जन्माला घालतो आणि त्याची किंमत आपल्याला आणि एका निष्पाप जिवाला पुढे मोजावी लागते. भयानक अशा मानसिक, आर्थिक, शारीरिक त्रासाला सामोर जावं लागतं. हे जर नको असेल, तर आपल्याला सावध व्हावं लागेल, जागरूक व्हावं लागेल. जगामध्ये असे बरेच देश आहेत की, जिथं लग्नापूर्वी थॅलेसेमिया तपासणी करणं बंधनकारक आहे. काही देशांत त्याशिवाय मॅरेज सर्टिफिकेट मिळत नाही पण, आपल्या देशात मात्र दुर्दैवाने या विषयावर काम होताना दिसत नाही. आपण हा विषय कधी गांभीर्याने घेतलाच नाही. नुकतीच मी थॅलेसेमियासाठी काम करणाऱ्या एका संस्थेची व्हिडीओ क्लिप पाहिली, ज्यात एक थॅलेसेमियाग्रस्त वयात आलेली, शरीराने थकलेली समजदार मुलगी रडून रडून लोकांना आवाहन करत होती की, कृपा करून लग्नाच्या आधी तुमची आणि तुमच्या जीवनसाथीदाराची थॅलेसेमिया तपासणी करून घ्या, जेणेकरून माझ्यासारखं नरकयातनांनी भरलेलं जीवन उदयास येणार नाही. तिचं हे रडणं, तिची आर्त साद आम्हाला कधी ऐकू येणार आहे? आई–बाप आयुष्यभर कष्ट घेतात, राबराब राबतात, खूप खूप धन, मिळकत कमावून ठेवण्याचा प्रयत्न करतात कारण त्यांना माहीत असतं की, आपल्यानंतर हे सगळं आपल्या मुलांना मिळणार आहे. वारसाहक्काने तुम्ही मुलांना मिळकत, धन, जमीन नाही दिली तरी चालेल, पण मुलांना वारसाहक्काने हा आजार देऊ नका, हेच ती मुलगी रडून रडून सांगत असावी.

समाजामध्ये आज रक्तदानाविषयी समाधानकारक जागृती झालेली आहे. रक्तदानाचं महत्त्व लोकांना बऱ्यापैकी समजलं आहे. आज समाजातील तरुणवर्ग स्वयंप्रेरणेने, स्वेच्छेने रक्तदानासाठी पुढे येतोय. थोर नेत्यांच्या, महापुरुषांच्या जयंती–पुण्यतिथीच्या निमित्ताने, सण–समारंभाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात रक्तदान शिबिरांचं आयोजन होताना आपण पाहतोय. दर तीन महिन्यांनी नित्यनियमाने रक्तदान करणारे आधुनिक महापुरुष आपल्या अवतीभोवती वावरतांना आपण पाहतोय. खऱ्या अर्थाने रक्तदानाची एक सामाजिक चळवळ उभी राहिलेली आपणास दिसते आहे. रक्तदानाची चळवळ भविष्यात आणखी भक्कम होण्याच्या मार्गावर आहे. हे नक्कीच आपल्या सशक्त समाजासाठी अभिमानास्पद आहे.

रक्तदान केल्याने तुमच्या शरीराचं काहीही नुकसान होत नाही, तसचं स्टेम सेल दान केल्यानेदेखील तुमच्या शरीराचं कोणतंही नुकसान होत नाही. रक्तदान केल्याने अशा रुग्णांच आयुष्य काही दिवसांसाठी वाढतं, पण स्टेम सेल डोनेशन केल्याने असे रुग्ण कायमचे बरे होऊ शकतात, त्यांना तुम्ही कायमस्वरूपी एक सर्वसामान्य आयुष्य देऊ शकता, हे आम्हाला अजून कोणी सांगितलंच नाही. आजकाल तर स्टेम सेल डोनेशन ब्लड डोनेशनइतकच सोप झालं आहे, याची माहिती आम्हाला कधी मिळणार आणि जर माहितीच मिळणार नसेल, तर आयुष्य वाचविण्यासाठी स्टेम सेल डोनर न मिळाल्याने अल्पावधीत बहरण्याच्या वयात जगाचा निरोप घेणाऱ्या त्या हजारो–लाखो कोवळ्या जिवांवर अन्याय नाही का होणार? स्टेम सेल डोनेशन इतकं सोपं व सुरक्षित असतांना, मरणाच्या वाटेवर असणाऱ्या हजारो–लाखो रुग्णांना याने सर्वसामान्य आयुष्य मिळणार असतानाही लाखामध्ये एखाद्याच रुग्णाला स्टेम सेल डोनर बाहेरून उपलब्ध होतो, ही आजची मनाला सुन्न करणारी भयाण परिस्थिती आहे. समाजातील रंजल्या–गांजलेल्यासाठी कार्य करण्याची, विविध आजारांनी त्रस्त रुग्णांची सेवा करण्याची, त्यांना जीवन देण्याची, त्यांच्यासाठी काहीतरी करण्याची तळमळ असलेले रुग्णसेवक/समाजसेवक आजही आपल्याकडे अगदी हजारोंच्या संख्येने आहेत. स्वतः ला रुग्णसेवेत झोकून देऊन जमेल ते करण्याचा प्रयत्न करताहेत आपल्या संवेदनशील मनाला सतत जागं ठेवून अफाट कार्य करताहेत, जोपर्यंत असं महान कार्य करणारे महात्मे जिवंत आहेत, तोपर्यंत आपला समाज जिवंत आहे. याच जिवंत समाजाला जागृत करण्याचा हा प्रयत्न.



**– ॲड. नदीम सय्यद**
असंही जगणं असतं! (विश्व थॅलेसेमियाचे) या पुस्तकाचे लेखक आहेत.



हरियाली संस्थेच्या वतीने अहिल्यानगर मध्ये अनेक ठिकाणी पक्षांसाठी दानापाण्याची कायमस्वरूपीची व्यवस्था करण्यात आली.

# वन्य जीवांची तहान भागवण्यासाठी केली कायमची व्यवस्था

नगर – हरियाली संस्थेच्या वतीने अहिल्यानगर मध्ये अनेक ठिकाणी पक्षांसाठी दानापाण्याची कायम स्वरूपीची व्यवस्था करण्यात आलेली असून तेथे विविध प्रजातींचे शेकडो पक्षी दररोज या व्यवस्थेचा लाभ घेतात. आता वन्यजीव यांच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी या तीव्र उन्हाळ्यात अहिल्यानगर तालुक्यातील माथनी या गर्भगिरीच्या रांगेत वसलेल्या गावात डोंगर उतारावरती महेश वाघ यांच्या खाजगी जागेत कायमस्वरूपी दोन सिमेंटच्या टाक्यामध्ये पाण्याची साठवणूक करून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. असे हरियालीचे अध्यक्ष सुरेश खामकर यांनी सांगितले.

या तीव्र उन्हाळ्यात वन्य जीव, विविध प्रजातींचे पक्षी, सरपटणारे प्राणी यामध्ये प्रामुख्याने हरीण, मोर, लांडोर, ससे, काळवीट, सरडे, ऊद, घोरपड आदींची पाण्या वाचून अत्यंत गैरसोय होत होती, म्हणून त्यांच्यासाठी पिण्याच्या पाण्याची सोय कायमस्वरूपी करण्यात आली असून गावातील ग्रामस्थ गर्भगिरी संस्थेचे अध्यक्ष महेश वाघ यांनी त्यांच्या बोरवेल मधून पाणी उपलब्ध करून दिले असून दैनंदिन देखभालही तेच करणार आहेत.

पाणी साठविण्यासाठी सिमेंटच्या भक्कम टाक्या अहिल्यानगरमधील सुरुची फरसाणच्यावतीने तुलशीराम पालिवाल यांनी उपलब्ध करून दिल्या आहेत.

वन्य जीव वाचविण्याच्या या मोहिमेत गावातील सुधाकर कांडेकर, राम घोरपडे, जालिंदर घोरपडे, सोनाजी घोरपडे, प्रज्वल घोरपडे आदींनी सहभाग घेतला आहे.

## राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजनेसाठी अर्ज करण्यास २० मे पर्यंत मुदतवाढ

नगर – सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती, नवबौध्द प्रवर्गातील परदेशात अध्ययन करण्यासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना सन २०२५–२६ या शैक्षणिक वर्षाच्या शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख ३० एप्रिल २०२५ अशी होती. या योजनेंतर्गत अर्ज करण्यास २० मे २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून योजनेच्या अधिक माहितीसाठी शासनाच्या www.maharashtra.gov.in संकेतस्थळास भेट देण्याचे आवाहन समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त प्रविण कोरगंटीवार यांनी केले आहे.

# प्रभावी उपचारांद्वारे थॅलेसेमिया मुक्तीचा निर्धार

## सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांचे प्रतिपादन; 'एक पाऊल थॅलेसेमिया मुक्तीकडे' अभियानाचा शुभारंभ

मुंबई – थॅलेसेमियासारख्या गंभीर अनुवंशिक रक्तविकाराविषयी जनजागृती निर्माण करण्याचा व्यापक प्रयत्न करण्यात येत असून प्रभावी उपचारपद्धतींद्वारे थॅलेसेमिया मुक्तीचा निर्धार करण्यात येत असल्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितले.



एक पाऊल थॅलेसेमिया मुक्तीकडे या महत्वाकांक्षी अभियानाचा शुभारंभ आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर व राज्यमंत्री श्रीमती मेघना साकोरे – बोर्डीकर यांच्या हस्ते झाला.

८ मे आंतरराष्ट्रीय थॅलेसेमिया दिनानिमित्त सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागामार्फत एक पाऊल थॅलेसेमिया मुक्तीकडे या महत्वाकांक्षी अभियानाचा शुभारंभ आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर व राज्यमंत्री श्रीमती मेघना साकोरे – बोर्डीकर यांच्या हस्ते झाला.

या कार्यक्रमाला आरोग्य सेवा आयुक्त तथा संचालक आरोग्य अभियान रंगा नायक, संचालक आरोग्य सेवा डॉ. नितीन अबांडेकर, संचालक (शहरी) आरोग्य सेवा डॉ. स्वप्नील लाळे, अतिरिक्त संचालक डॉ. विजय बाविस्कर, सहसंचालक तुळशीदास सोळंके, डॉ. सुनीता गोल्हाईत, डॉ. गोविंद चौधरी, डॉ. सरिता हजारे, सहाय्यक संचालक डॉ. महेंद्र केंद्रे (राज्य रक्त कक्ष), तसेच थॅलेसेमिया ग्रुप परभणीचे डॉ. लक्ष्मीकांत पिंपळगावकर उपस्थित होते.

मंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले, थॅलेसेमिया रुग्णांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडविण्याकरिता आणि त्यांच्या संपूर्ण पुनर्वसनासाठी शासन विविध पातळ्यांवर प्रयत्नशील आहे. यामध्ये नियमित रक्त संक्रमण, बोन मॅरो ट्रान्सप्लांटसारख्या उपचारपद्धती उपलब्ध करून दिल्या जात आहेत. यासोबतच मोफत आरोग्य सल्ला व मार्गदर्शन केंद्रांची उभारणी देखील करण्यात आली असल्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री श्री. आबिटकर यांनी सांगितले.

### सकारात्मक परिणाम घडविणारा उपक्रम

**राज्यमंत्री मेघना साकोरे – बोर्डीकर**

शासनाचा हा उपक्रम केवळ एक कार्यक्रम न राहता, तो समाजात सकारात्मक परिवर्तन घडविणारा एक मोठा पाऊल ठरेल असा विश्वास राज्यमंत्री श्रीमती मेघना साकोरे – बोर्डीकर यांनी व्यक्त केला. जनतेच्या सक्रिय सहभागाशिवाय ही लढाई जिंकता येणार नाही, हे स्पष्ट करत सर्व नागरिकांना या अभियानात सहभागी होण्याचे आवाहनही त्यांनी केले.

राज्यमंत्री श्रीमती मेघना साकोरे – बोर्डीकर म्हणाल्या, थॅलेसेमिया आजारावरील उपचारपद्धती आता प्रगत झाली असून यांसदर्भात अधिक जनजागृती करण्यात यावी.

या उपक्रमांतर्गत थॅलेसेमिया टाळण्यासाठी विवाहपूर्व चाचण्यांचे महत्व अधोरेखित करण्यात आले. थोडीशी काळजी, पुढच्या पिढीचं आयुष्य वाचवू शकते या घोषवाक्याद्वारे उद्देशून जागरूकतेचा संदेश देण्यात आला. जीवन सक्षम बनवा, प्रगतीला स्वीकारा या अभियानाच्या मुख्य सूत्रातुन आरोग्यदृष्टीने सक्षम व थॅलेसेमिया–मुक्त महाराष्ट्राचा संकल्प अधोरेखित करण्यात आला आहे.

यावेळी थॅलेसेमिया रुग्णांना दिव्यांग प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. www.thalesemiyasupport.com या वेबसाईटचे उद्घाटन झाले.

मोफत आरोग्य सल्ल्यासाठी १०४ क्रमांक उपलब्ध असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.



श्री साई इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनि. कॉलेज एस.एस.सी व एच.एस.सी.चा निकाल १००% लागला.

# नगर येथील श्री साई इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेजचा बारावीचा निकाल १०० टक्के

नगर – श्री साई इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेज एस.एस.सी व एच.एस.सी. चा निकाल प्रत्येक वर्षी १००% लागण्याची परंपरा आहे. याही वर्षी उच्च माध्यमिक मंडळाने घेतलेल्या इयत्ता बारावी (विज्ञान शाखा) फेब्रुवारी– मार्च २०२५ चा निकालही १००% लागला. संख्यात्मक व गुणात्मक असा हा उत्कृष्ट निकाल आहे.

फेब्रुवारी मार्च २०२५ या परीक्षेला विद्यालयातून एकूण ७४ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ झाले होते. सर्वच्या सर्व विद्यार्थी उत्तीर्ण होऊन उत्कृष्ट निकालाची परंपरा याही वेळी दिसून आली. ईश्वरी प्रवीण कडूस या विद्यार्थीनीस ८२.१७% गुण प्राप्त झाले असून ती विद्यालयात प्रथम आली तर श्रेयस शर्मा, एकता तुपे, वैष्णवी पांडे, प्रेमराज सारदे या विद्यार्थ्यांनी अनुक्रमे द्वितीय, तृतीय, चतुर्थ व पाचवा क्रमांक पटकावला.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन व सत्कार सोहळा महर्षी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष अशोक कानडे, विद्यालयाचे एज्युकेशन डायरेक्टर नंदकिशोर भावसार, विद्यालयाच्या प्राचार्या सौ. तनुजा लोंढे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षिका सौ. अरुंधती भोकरे, सौ. स्नेहल महाजन, सौ.योगिता सोनकुसरे उपस्थित होत्या. त्यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# जैन ओसवाल पतसंस्थेचे कामकाज व प्रगती पाहिल्यावर खूप काही शिकायला मिळते

## अमितराय जैन यांचे कौतुकोद्गार, जैन कॉन्फरन्सच्या राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांची सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेला सदिच्छा भेट

नगर – महाराष्ट्रात जैन समाजाने विविध आर्थिक संस्थांच्या माध्यमातून सर्व समाजातील लोकांच्या आर्थिक उन्नतीसाठी मोठे काम चालवले आहे. अहिल्यानगर शहरातही जैन समाज बांधवांनी अनेक आर्थिक संस्था उत्तम पद्धतीने चालवून आपला ठसा उमटवला आहे. सहकार महर्षी सुवालालजी गुंदेचा यांनी स्थापन केलेली जैन ओसवाल पतसंस्थेचे कामकाज व प्रगती पाहिल्यावर खूप काही शिकायला मिळते. पारदर्शकता आणि प्रामाणिकणा येथे आढळून येतो. अशा संस्थांमुळे खऱ्या अर्थाने सर्व घटकांना आधार मिळतो असे कौतुकोद्गार अखिल भारतीय जैन कॉन्फरन्सचे महामंत्री अमितराय जैन यांनी काढले.



नवी दिल्ली स्थित अखिल भारतीय जैन कॉन्फरन्सचे राष्ट्रीय अध्यक्ष विजय जैन, राष्ट्रीय महामंत्री अमितराय जैन, कोषाध्यक्ष विनय जैन, युवा महामंत्री अमित लोढा, शशीकुमार (पिंटू) कर्नावट, यांनी सहकार महर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेच्या मुख्यालयास भेट देऊन संस्थेच्या कामकाजाची माहिती घेतली.

नवी दिल्ली स्थित अखिल भारतीय जैन कॉन्फरन्सचे राष्ट्रीय अध्यक्ष विजय जैन, राष्ट्रीय महामंत्री अमितराय जैन, कोषाध्यक्ष विनय जैन, युवा महामंत्री अमित लोढा, शशीकुमार (पिंटू) कर्नावट, यांनी आपल्या नगर भैटीत सहकार महर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेच्या मुख्यालयास भेट देऊन संस्थेच्या कामकाजाची माहिती घेतली. त्यांचे पतसंस्थेचे चेअरमन समीर बोरा यांनी स्वागत करुन सत्कार केला. याप्रसंगी व्हाईस चेअरमन अभय पितळे, माजी चेअरमन व संचालक सतोष गांधी, सरव्यवस्थापक प्रशांत भंडारी, कमलेश भंडारी, नितीन पटवा, अभिजित लुणिया, उमेश बोरा, रोशन चोरडिया, पंकज गांधी, निखिल संचेती, रोहित नहार आदी उपस्थित होते.

संतोष गांधी यांनी प्रास्ताविक करताना सांगितले की, सहकारी बँकिंग क्षेत्रात मोठे योगदान देणाऱ्या सुवालाल गुंदेचा यांनी दूरदृष्टीने या संस्थेची मुहूर्तमेढ रोवली. संस्था रोप्य महोत्सवी वर्षात पदार्पण करत आहे. या वाटचालीत संस्थेने सभासद, ग्राहक हिताला प्राधान्य देत आर्थिक आलेख कायम उंचावत राखला आहे. विविध मान्यवरांना संस्थेत पाचारण करून त्यांना संस्थेच्या कामकाजाची माहिती दिली जाते तसेच मार्गदर्शन घेतले जाते. यातून संस्थेच्या आदर्शवत कारभार सर्वांना कळण्यास मदत होते. तसेच मान्यवरांनी केलेल्या कौतुकामुळे आणखी चांगले काम करण्याची प्रेरणा मिळते.

कमलेश भंडारी म्हणाले, माझ्या वैयक्तिक समाजकारण, राजकारणाची सुरुवात याच संस्थेतून झाली. रौप्य महोत्सवी वाटचाल करणाऱ्या या संस्थेचा माजी संचालक असल्याचा नेहमीच अभिमान वाटतो. अत्याधुनिक बँकिंग सेवा ग्राहकांना उपलब्ध करून देण्यात येते. सर्वसामान्यांना आर्थिक पत देऊन त्यांचा उत्कर्ष साधण्यासाठी संस्थेने नेहमीच योगदान दिले आहे.

शेवटी व्हाईस चेअरमन अभय पितळे यांनी आभार मानले.

# अहिल्यानगर ते शिर्डी रस्त्याचे डांबरीकरणाऐवजी काँक्रीटीकरण करण्यात यावे : डॉ. राजेंद्र पिपाडा

नगर – अहिल्यानगर ते शिर्डी रस्त्याचे डांबरीकरणा–ऐवजी काँक्रीटीकरण होवुन राहाता शिर्डी शहरातुन जाणाऱ्या रस्त्यावर उड्डाणपुल करणेत यावा या मागणीचे निवेदन भाजपा नेते डॉ.राजेंद्र पिपाडा यांनी केंद्रीय रस्ते व वाहतुक मंत्री नितीन गडकरी यांना शिर्डी विमानतळ येथे दिले.


अहिल्यानगर ते शिर्डी रस्त्याचे डांबरीकरणऐवजी काँक्रीटीकरण करा, या मागणीचे निवेदन केंद्रीय रस्ते व वाहतुक मंत्री नितीन गडकरी यांना देताना भाजपा नेते डॉ.राजेंद्र पिपाडा.

दिलेल्या निवेदनात पुढे म्हटले आहे की, गेल्या ४० वर्षापासुन नगर शिर्डी या महामार्गाची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. त्यामुळे प्रवाशांचे अतोनात हाल होत असुन असंख्य बळी जात आहे. उत्तर दक्षिण भारतातुन शिर्डीत येणा–या भाविकांना व सामान्य जनतेला मनस्ताप सहन करावा लागत आहे. जागोजागी रस्ते अर्धवट खोदुन ठेवल्याने मोठ्या प्रमाणावर अपघात होत असुन खोदलेले रस्ते तात्काळ बुजवले नाही तर पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर अपघात होवुन निराप्राध लोकांचे बळी जाणार असल्याची शक्यता आहे. रस्ते खोदुन ठेवल्याने एकेरी वाहतूक सुरु आहे. रस्त्याच्या बाजुला बांधकाम साहित्य आहे यामुळे २–३ तास एकाच ठिकाणी वाहतूक ठप्प होवुन जनतेला प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे सामान्य जनतेच्या मनात संतापाची तीव्र भावना आहे. अर्धवट कामामुळे रस्त्याची अत्यंत भिषण अवस्था झालेली असुन वाहन चालवणे अवघड झाले आहे हा रस्ता नसुन जणु मृत्युचा सापळाच बनला आहे. या रस्त्यावर प्रवास करताना प्रवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

सर्वाधिक अवजड वाहनांची वर्दळ असणाऱ्या या महामार्गावर लहान मोठी वाहने दुचाकी स्वारांना अक्षरश: जीव मुठीत धरुन प्रवास करावा लागत आहे. केवळ खड्ड्यांमळे फार लोकांचे प्राण या रस्त्यावर गेले आहेत. शिर्डी नगर जिल्ह्यातील सर्वाधिक वाहतुक असलेला शिर्डी–नगर हा एकमेव महामार्ग आहे. रस्ताला जागोजागी ठिगळ देवुन डागडुजी केली आहे. वाहने आदळुन किंवा खड्डे चुकविताना अपघात प्रवाशांचे हाडे खिळखिळी होत आहेत. खराब रस्त्यांमुळे वाहने नादुरुस्त होवुन वाहतूकीचा खोळंबा होतो. शिर्डी हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे तीर्थ क्षेत्र आहे. ज्या लोकांना शिर्डीमध्ये न थांबता पुढे जायचे आहे त्याकरीता पिंपरीनिर्मळ पासुन शिर्डी राहाता शहरातुन निमगाव –निघोज पर्यंत उड्डाणपुल होणे गरजेचे आहे. त्यामुळे रस्ता ओलांडताना भक्तांना होणारा त्रास कमी होईल. तसेच शिर्डी राहाता शहरातील वाहतुकीची कोंडी कमी होईल तरी याबाबत आपण लक्ष घालावे.

# विद्यार्थ्यांनो, यशावर थांबू नका, पुढे चालत राहा

**आयुक्त यशवंत डांगे यांचे प्रतिपादन; प्रगत स्कॉलरशिप २०२५ चा निकाल, इ.१० वी.चा धीरज भांड व सुमेध मुजूमदार, इ.७ वी.चा अवधूत शिंदे प्रथम**


दि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे प्रगत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय व रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल यांच्या संयुक्त विद्यमाने प्रगत स्कॉलरशिप २०२५ चा निकाल घोषित करण्यात आला.

नगर – ही परीक्षा म्हणजे केवळ शालेय अभ्यासक्रमाचे परीक्षण नाही, तर विद्यार्थ्यांच्या कष्ट, चिकाटी, अभ्यासपद्धती आणि आत्मविश्वासाचे मूल्यांकन आहे. आज ज्या विद्यार्थ्यांनी हा मानाचा टप्पा गाठला आहे, त्यांनी आपल्या मेहनतीने हे सिद्ध केले आहे की, सातत्याने आणि नियोजनबद्ध अभ्यास केल्यास कोणतीही अडचण मोठी वाटत नाही. विद्यार्थ्यांनो, हे यश हे एक पाऊल आहे – शेवट नव्हे. आयुष्यात असे अनेक टप्पे येतील. प्रत्येक टप्प्यावर तुम्हाला नवीन गोष्टी शिकायला मिळतील, चुका करायला मिळतील, आणि त्या चुकांतूनच पुढे वाट सापडेल. त्यामुळे हे यश मनात साठवा, पण त्यावर थांबू नका. तुमचे ध्येय मोठे ठेवा, पण त्यासाठी दररोज एक पाऊल पुढे टाका. तुमचा अभ्यास, जिज्ञासा आणि सकारात्मक दृष्टिकोन तुम्हाला नक्कीच यशाच्या शिखरावर घेऊन जाईल, असे प्रतिपादन अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांनी केले.

दि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे प्रगत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय व रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने प्रगत स्कॉलरशिप २०२५ चा निकाल घोषित करण्यात आला. इयत्ता दहावीचा भांड धीरज व सुमेध मुजूमदार यांनी २०० पैकी १६६ गुण मिळवून ते अहिल्यानगर व तालुकास्तरीय प्रगत स्कॉलरशिप परीक्षेत प्रथम आले. तर इयत्ता ७ वी मध्ये शिंदे अवधूत संतोष २०० पैकी १७८ गुण मिळवून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला.

सदरचा बक्षीस वितरण समारंभ आयुक्त यशवंत डांगे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. याप्रसंगी रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल यांचे अध्यक्ष डॉ. कुणाल कोल्हे, डॉ. श्रेया खाजगीवाले, सचिव सुनील कटारिया, प्रगत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे चेअरमन उमेश रेखे, सेक्रेटरी किरण वैकर, नगरसेवक सोनाली चितळे, शिवसेनाचे संतोष गेनप्पा, प्राचार्य सुनील पंडित आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे चेअरमन उमेश रेखे तर पाहुण्यांचा परिचय प्राचार्य सुनील पंडित यांनी करून दिला.यावेळी रोटरीचे अध्यक्ष डॉ. कुणाल कोल्हे व सेक्रेटरी किरण वैकर, प्राध्यापक रोहित सुंबरे व विकास जाधव आदींनी मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. हर्षाली देशमुख व रोकडे दिलीप यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन विजय गरड यांनी केले.

यावेळी गुणवत्ता यादीतील व परीक्षेतील प्राविण्य झालेले विद्यार्थी, पालक, संस्थेचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

निकाल पुढीलप्रमाणे –(गट – १० वी) – धीरज भांड १६६ गुण मिळवून प्रथम, सुमेध ऋषिकेश मुजुमदार १६६ गुण मिळवून प्रथम, अनिशा कोथवाले १६२ द्वितीय, चैतन्य ठाणगे १५८ गुण मिळवून तृतीय, उत्तेजनार्थ –वेदांत गव्हांदे, ध्रुव दरंदले, वरद दाणे, शंकर पवार, प्रणाली शिंदे, विवेक नेमाने, श्रद्धा दिकोंडा.

(गट– ७ वी) – अवधूत शिंदे १७८ गुण मिळवून प्रथम, प्रथमेश जाधव व आर्या मोरे १७२ गुण मिळवून द्वितीय, मृणाल तमनर व समर्थ बोरुडे १७० गुण मिळवून तृतीय, उत्तेजनार्थ –सत्यजित नबागे, कौस्तुभ तोरकड, आर्यन कुलट, आयुष कदम, श्रावणी काकडे, आयुष भोंडवे, शौर्य आठरे, अनन्या मिसळ.


शहर जिल्हास्तरीय तायक्वांदो स्पर्धेत यशस्वी झालेले एकलव्य तायक्वांदो अकॅडमीच्या खेळाडू.

# शहर जिल्हास्तरीय तायक्वांदो स्पर्धेत एकलव्य तायक्वांदो अकॅडमीच्या खेळाडूंचे यश

**१८ खेळाडूंनी पटकाविले सुवर्ण, राज्यस्तरीय स्पर्धेसाठी खेळाडूंची निवड**

नगर – तायक्वांदो स्पोर्ट्स असोसिएशन अहिल्यानगर व एकलव्य तायक्वांदो अकॅडमी अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने कॅडेट व ज्युनिअर मुले व मुलींच्या शहर जिल्हास्तरीय तायक्वांदो स्पर्धा ७ मे रोजी प्रियदर्शनी पब्लिक स्कूल भिंगार या ठिकाणी घेण्यात आल्या. या स्पर्धेमध्ये एकलव्य तायक्वांदो अकॅडमीच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत १८ सुवर्ण, १० रौप्य व ४ कांस्यपदकांची कमाई केली. सुवर्णपदक विजेते खेळाडूंची नाशिक येथे ११ ते १३ मे रोजी होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या सर्व खेळाडूंना ग्रँडमास्टर अल्ताफ खान, मुख्य प्रशिक्षक गणेश वंजारे, योगेश बिचीतकर, सचिन मरकड, मंगेश आहेर, सचिन कोतकर यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व खेळाडूंचे एकलव्य तायक्वांदो अकॅडमीचे अध्यक्ष दिलीप सातपुते, स्पोर्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष प्रा.माणिकराव विधाते, उपाध्यक्ष संतोष लांडे, राज्य उपाध्यक्ष व शहर सचिव घन:श्याम सानप यांनी अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. बक्षीस वितरण प्रसंगी धर्मनाथ घोरपडे, नारायण कराळे, राष्ट्रीय पंच शर्मिला शेख उपस्थित होते.

# 'राज्यस्तरीय पुरस्कार' मिळाल्याबद्दल जिल्हाधिकाऱ्यांचा 'स्नेहबंध'तर्फे गौरव

नगर – मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी 'राज्यस्तरीय सेवा हक्क' पुरस्कार देऊन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांना गौरवले. याबद्दल स्नेहबंध सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांचा गौरव केला. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया हे यवतमाळला जिल्हाधिकारी असताना त्यांनी अभिप्राय कक्ष स्थापन करुन सेवा हक्क अधिनियमास अनुसरून जनतेच्या प्रश्नांचे निराकरण केले. त्यांच्या या कार्याची दखल घेत शासनाने त्यांना सन्मानित केले. याबद्दल डॉ. उद्धव शिंदे यांनी शाल व रोप देऊन जिल्हाधिकाऱ्यांचा गौरव केला.



'राज्यस्तरीय पुरस्कार' मिळाल्याबद्दल जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांचा 'स्नेहबंध'चे अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी गौरव केला.

**सर्वसामान्याचे समाधान यास जिल्हाधिकारी प्राधान्यक्रम**

सर्वसामान्य माणसाचे समाधान या जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांचा प्राधान्यक्रम आहे. त्यांनी जिल्ह्यात नवनवीन संकल्पना राबविण्यावर भर द्यावा व त्याची अंमलबजावणी करावी. प्रभावीपणे काम करणाऱ्या अधिकारी–कर्मचाऱ्यांच्या पाठिशी जिल्ह्यातील जनता नेहमीच पाठीशी असते, डॉ. उद्धव शिंदे यावेळी म्हणाले.

# महिलांसाठी १५ मे पासून योगा शिबीर

नगर – अनिल मेहेर यांच्या प्रेरणेने १५ मे पासून दुपारी ४ ते ५ या वेळेत आनंदऋषी ब्लड बँकेत योग शिबीर सुरू करण्यात येत आहे.

महिलांना या वर्गात शास्त्रशुद्ध सूर्यनमस्कार, आवडतील अशी असणे, ओमकार साधना असा योग अभ्यास खेळामेळीच्या वातावरणात शिकवला जाईल. नंतर हळूहळू, 'सोप्याकडून अवघडाकडे' नेत कौशल्यपूर्ण योगासने करून घेतली जाणार आहे. योगाचे सर्व प्रकारचे प्रशिक्षण दिले जाईल. प्राणायाम व आहाराचे पण मार्गदर्शन दिले जाईल. आरोग्य आपणासही आपले शरीर तंदुरुस्त आणि चपळ ठेवायचे असेल तर आज या योग संस्थेत दाखल व्हा.

संपर्कासाठी ७९७२९६८७९१.

# नागापुरात अखंड नाम, जप, यज्ञ सप्ताहाची सांगता

**श्रीस्वामी समर्थ सेवा केंद्राचा पुढाकार**



नगर – नवनागापूर येथील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात येथे श्री स्वामी समर्थ पुण्यतिथीनिमित्त अखंड नाम–जप–यज्ञ, प्रहरी सप्ताह मंगलमय वातावरणामध्ये उत्साहात पार पडला.

या सप्ताहात नवनागापूर पंचक्रोशीमधील सेवेकरी व भाविक सहभागी झाले होते. या सप्ताह काळात एकूण ४२० सेवेकरी श्री गुरुचरित्र वाचनासाठी बसले होते. या सात दिवसांच्या काळात विविध यागाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये श्री गणेश याग, मनोबोध याग, श्री स्वामीयाग, श्री चंडी याग, गीताई याग, श्री रुद्र मल्हारी याग यासारख्या यागांचा समावेश होता. सांगतेच्या दिवशी श्री गुरूपीठ जनकल्याण प्रतिनिधी अंकुशदादा पाटील यांचे श्री जनकल्याण योजनेवर अत्यंत मौलीक मार्गदर्शन सेवेकऱ्यांना लाभले. तसेच गणेश पर्वत, सुरेश निकम व नीता कोळपकर यांनी केंद्रातील विविध सामाजिक उपक्रम, दिंडोरी प्रणित सेवा मार्गातून होणाऱ्या ८० टक्के सामाजिक कार्य व २० टक्के अध्यात्म या उपक्रमांची माहिती भाविकांना दिली. या वेळी आयोजित केलेल्या महाप्रसादाचा लाभ परिसरातील भाविकांनी घेतला. नगर–पारनेर मतदारसंघांचे आ. काशिनाथ दाते यांनी सांगतेप्रसंगी मार्गदर्शन केले. या वेळी नवनागापूरचे सरपंच बबन डोंगरे, तसेच बंडूनाना सप्रे, दत्ता सप्रे, सागर सप्रे यांचे मार्गदर्शन लाभले.

# नेप्ती विद्यालयाचे माजी विद्यार्थी वीस वर्षानंतर आले एकत्र

नगर – नगर तालुक्यातील नेप्ती विद्यालयाच्या २००४ सालच्या दहावीच्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा मोठ्या उत्साहात पार पडला. तब्बल दोन दशकांनंतर विद्यालयाच्या आवारात पुन्हा एकदा त्या निरागस आठवणी जाग्या झाल्या. बालपणाच्या गोड वळणांवर नजर फिरवत, जुन्या शालेय जीवनातील आठवणींशी माजी विद्यार्थी पुन्हा एकरूप झाले होते, अशी माहिती रामदास फुले यांनी दिली.


नेप्ती विद्यालयाच्या २००४ सालच्या दहावीच्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात पार पडला.

स्नेहमेळाव्याचा शुभारंभ विद्यालय भेटीने झाला. त्यानंतर माजी विद्यार्थी नगर–पुणे रोडवरील केडगाव येथील हॉटेलमध्ये गेट टु गेदरसाठी एकत्र आले. कार्यक्रमाला विद्यालयातील तत्कालीन मुख्याध्यापक महेश जाधव, शिक्षक दत्तात्रय शिंदे, अरुण दळवी, श्रीकांत वाखारे, नानासाहेब घोडके, भास्कर कडूस, बाळासाहेब शेटे, कालिदास बडे, तुळसाबाई कदम, बाळासाहेब काळे, संजय ठोकळ, बाबासाहेब भोर, राजेंद्र झावरे, गोरख कोतकर, संतोष खरमाळे या शिक्षकांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना शाळेतील दिवसांची आठवण करून दिली. सर्व गुरुजनांचा शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला.

**हृदयस्पर्शी स्नेहमेळाव्यात जुन्या आठवणींना उजाळा; गुरुजनांचा सन्मान**

या भावनिक कार्यक्रमात माजी विद्यार्थी कै. दिगंबर ठुबे आणि कै. माया इंगोले यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या कार्यक्रमात हास्यविनोद, कविता गायन, गाणी, खेळ, जुन्या फोटोंची झलक, स्मरणिका सादरीकरण यांसारख्या गोष्टींमुळे वातावरण हलकंफुलकं आणि उत्साही राहिलं. काही विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनप्रवासातील अनुभव शेअर करत पुढच्या पिढीसाठी प्रेरणादायी विचार सांगितले. शेवटी सर्वांनी मिळून वृक्षसंवर्धन, शाळेसाठी निधी उभारणी, गावाचा विकास आणि गरजू विद्यार्थ्यांसाठी आर्थिक मदतीचा संकल्प केला. केवळ स्नेहमेळावा न राहता हा एक सामाजिक बांधिलकीचा ठसा उमटवणारा कार्यक्रम ठरणार असल्याची भावना माजी विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

# माझे बाबा...

**बाबा – बाबाच असतो!**
**कधीही न डगमगणारा !**
**बाबा – बाबाच असतो !**
**दु:खातही न रडणारा!!**
**मुलांना नेहमी डोक्यात वाढवतो तोच असतो बाबा!!**
**मुलांच्या भविष्याचा विचार करणारा असतो बाबा !!**
**स्वतःच्या चुकांचा त्रास बाळाला होऊ नये म्हणून सतत प्रयत्न करत असतो तो असतो बाबा !!**
**मुलं सेटल होईपर्यंत जो प्रत्येक क्षणी साथ देतो, हिमालयासारखा खंबीर उभा राहतो तो असतो बाबा !!!**
**स्वतः झिजून मुलांच्या आयुष्यात सुगंध पसरवितो तो असतो बाबा !!!!**

१४ सप्टेंबर १९३४ साली माझ्या बाबांचा म्हणजेच रमाकांत मुरलीधर मुळे यांचा जन्म नेवासे तालुक्यातील 'माका' या गावी

एका शिक्षकाच्या मुरलीधर गणेश मुळे आणि राधाबाई मुरलीधर मुळे या सात्विक दांपत्याच्या पोटी हा नेत्रदीपक जन्माला आला....

वडील हाडाचे, कडक शिस्तीचे शिक्षक असल्याने सर्व बालपण, तारुण्य, शिक्षण, त्यांचे शिस्तीतच पार पडले.. प्राथमिक शिक्षण 'माका' या गावी वडिलांच्या शाळेतच झाले. मात्र माध्यमिक शिक्षणासाठी त्यांना त्यांच्या वडिलांनी नगरला पाठवले. नगरला मोठा भाऊ–भावजय श्रीयुत श्रीकृष्ण मुरलीधर मुळे यांच्याकडे राहावयास आले. त्यावेळी शिक्षकांना पगार फक्त ८० रुपये होता. अशा परिस्थितीत दुसरीकडे राहणे, खर्च भागविणे शक्य नव्हते.

बाबा – रमाकांत मुरलीधर मुळे सर्व माध्यमिक शिक्षण पूर्वीची अहमदनगर एज्युकेशन सोसायटी हायस्कूल सध्याची भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल या शाळेतच झाले. भावाकडे घरी सर्व कामे करून त्यांनी त्यांचे शिक्षण इयत्ता ११ वी (जुनी) पूर्ण केले व त्या काळात टायपिंगच्या परीक्षा सुद्धा दिल्या.

सुरुवातीला बाबा अहमदनगर नगरपालिका या ठिकाणी नोकरीस लागले. त्यांना वसुली विभागाकडे काम मिळाले. पण वडिलांनी क्लार्कच्या परीक्षेस बसविले व ती परीक्षा ते चांगल्या मार्कांनी उत्तीर्ण झाले आणि रेव्हेन्यू डिपार्टमेंटला ते नोकरीला लागले.

मनात दुसरे काही करण्याची इच्छा असूनही वडिलांसाठी आपल्या प्रत्येक छंदाचा, आवडीचा त्याग करीत त्यांच्या इच्छेप्रमाणे त्यांनी स्वतःचे शिक्षण पूर्ण करून नोकरी सुरू केली.

वडील कडक स्वभावाचे असल्याने ताबडतोब १५ मे १९५८ रोजी नगरच्या पूर्वीची अहमदनगर एज्युकेशन सोसायटी हायस्कूल आणि सध्याची भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल या ठिकाणी 'शिक्षक' या पदावर कार्यरत असणारे सदाशिव गोविंद निसरगंड सर आणि सौ. पार्वती सदाशिव निसरगंड यांची एकुलती एक सुसंस्कारित कन्या आणि अहमदनगर एज्युकेशन सोसायटीची विद्यार्थिनी विद्युलता सदाशिव निसरगंड यांच्याबरोबर बाबांना विवाह बंधनात त्यांच्या वडिलांनी अडकवून टाकले.आणि आयुष्याचा खरा प्रवास सुरू झाला....!!!


**स्व. रमाकांत मुळे**

पारनेर, कोपरगाव, जामखेड, राहुरी अशा तालुक्यांच्या गावी बदल्या होत असताना हे दाम्पत्य 'विंचवाचे बिराड पाठीवर' या म्हणीप्रमाणे स्वतःचा संसार चालू ठेवला!! तो करीत असताना प्रमोशनसाठीच्या परीक्षा बाबा देतच होते. आणि त्यात यशस्वीही होत होते.

इसवी सन १९८४ ला बाबांना तहसीलदार पदाचे प्रमोशन मिळाले. बाबांच्या साध्या शांत गोड स्वभावामुळे त्यांच्या भोवती माणसांचा गराडा असे. त्यांच्या प्रत्येक कठीण प्रसंगात त्यांच्या पत्नीने खांद्याला खांदा लावून त्यांना आयुष्यभर साथ दिली.

पूर्वी रेशनचे धान्य त्यांना खावे लागायचे. कित्येक वेळेला सणावाराला उसनवार करून त्यांनी मुलांसाठी सण साजरे केले. पण बाबा..... एकदाही डगमगले नाहीत. कष्ट करीतच राहिले. त्याचेच फळ म्हणून १९८४ ला ते तहसीलदार झाले. आणि प्रमोशनवर पहिल्यांदा संगमनेर या ठिकाणी रुजू झाले.

संगमनेर हे गाव दंगलीचे !!! पण बाबांनी न डगमगता अहोरात्र काम करून, त्यांनी संगमनेर सारख्या ठिकाणी स्वतःच्या कर्तुत्वाचा ठसा उमटविला....

१९८८ ला त्यांची बदली नाशिक येथे झाली. नाशिक मोठी सिटी, पण तिथेही बाबांनी प्रत्येकाच्या हृदयात आपल्या कामाच्या रूपाने छाप उमटवली. सर्वांना आपलेसे केले. त्यावेळी त्यांचे सहकारी श्री अण्णा म्हस्के यांनीही त्यांना खूप साथ दिली. शेवटच्या क्षणापर्यंत अण्णा आपल्या साहेबांना म्हणजेच बाबांना भेटायला येत होते.

पहिल्यापासूनच गरिबीची जाण असणारी ही व्यक्ती त्यांनी कामासाठी कधीच कुणाला अडवलं नाही. ना कधी कशाची अपेक्षा केली. परमेश्वराने आपल्याला जे काम दिले ते त्यांनी प्रामाणिकपणाने पार पाडले. जशास तसे ते वागत होते. त्यामुळे प्रत्येक जनमानसात ते प्रिय झाले.

इसवी सन १९९१ ला त्यांची नगरला मूळ गावी परत बदली झाली. इथेही त्यांनी प्रत्येकाची कामे इमाने – इतबारे केली.

माजी कलेक्टर लखिना, अशोक लाल यांच्या हाताखाली काम करीत असताना आपल्या हाताखालच्या सेवकांना कधी दुखावले नाही. कधी कुणाची अडवणूक केली नाही. १४ सप्टेंबर १९९२ सेवानिवृत्त व्हायच्या आधी ते डेप्युटी कलेक्टर झाले. इसवी सन १९५५ ते इसवी सन १९९२ असा हा नोकरीचा आलेख त्यांनी उंचावतच नेला. आणि स्वतःच्या वडिलांचे नाव सार्थकी केले. आणि अतिउच्च शिखर गाठले.

संसारातही प्रत्येक नात्याला महत्त्व देत, आई–वडिलांची ही सेवा केली. पत्नीला ही सर्व सुखे दिली आणि तिची सर्व स्वप्ने साकार केली. आम्हा पाचही भावंडांना संपूर्ण शिक्षण देऊन प्रत्येकाने सरकारी नोकरीच केली पाहिजे असे प्रत्येकाच्या मनात बिंबवले त्यासाठी ते वेळप्रसंगी कडक झाले.

आयुष्यात कसे वागायचे, आपले काम हे प्रामाणिकपणानेच करायचे, सर्वांना मदत करायची हीच शिकवण त्यांनी आम्हाला दिली. वडिलांचा खूप मोठा आधार असतो. तो खंबीर खांब असतो. वय झाल्यानंतर घरात जरी बसून असले तरी मोठा आधार असतो. आईचे अस्तित्व जपणारा हा बाबाच असतो!!!!

असा हा बाबा म्हातारपणात थकला की लहान मूल होऊन जातो. पण तरीही उराशी मुलांचीच काळजी बाळगून असतो. त्यांच्या हाकेला आसुसलेला असतो. त्यांच्या स्पर्शाची वाट पाहत असतो. स्वतःच्या मस्तकावर आपल्या मुलांनी चुंबन घ्यावे याची आशा लावून बसलेला असतो.!!!!

असा माझा बाबा !! १९ एप्रिल २०२५ शनिवारी आम्हाला सोडून गेला..... फक्त शरीराने!!! मनाने अजूनही तो इथेच आहे आमच्यापाशी !!!! Miss you Baba, Life is not same without you....

**तुमच्या जाण्याने जग सुने झाले**
**सुख सारे असूनही भासे काहीतरी उणे**
**रिक्त झाली तुमची नेहमीची जागा**
**तुम्ही दिसणार तेथे आम्हा असे आशा**
**असे कसे मध्येच सोडूनीया गेले??**
**तुमच्या जाण्याने जग सुने झाले ।।**
**कार्य केली अनेक ओंजळ भरून दिले दान,**
**दया केली दानांवर, सदा काळजी काळीज भरून,**
**स्वतः केले दुसऱ्यांचे भले**
**तुमच्या जाण्याने जग सुने झाले ।।**

**– साधना मुळे**

# पुन्हा सर्वांचे हक्काचे अरुणकाका होणे नाही : अरविंद पारगावकर



आमी संघटना व मराठा चेम्बर्स ऑफ कॉमर्सच्या वतीने आयोजित शोकसभेत माजी आमदार अरुणकाका जगताप यांना श्रद्धांजली वाहताना मराठा चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष अरविंद पारगावकर, आमी संघटनेचे अध्यक्ष जयद्रथ खाकाळ व श्रीकृष्ण जोशी. यावेळी उद्योजक उपस्थित होते.

नगर – कोणत्याही शहरात औद्योगिक क्षेत्र, व्यापार, बाजारपेठ समृद्ध होण्यासाठी राजकीय वरदहस्त लागतो. नगरच्या या क्षेत्रांचे पालकत्व अरुणकाका यांनी करून सर्वांना कायम सहकार्य केले. त्याचबरोबर प्रत्येक क्षेत्रात त्यांचे वजन होते. नगरच्या एमआयडीसी मधील उद्योजकांचे ते आधारस्तंभ होते. त्यांचे उच्च राहणीमान असले तरी काकांची नम्रपणाची वागणूक ही प्रत्येकाला भावात असे. त्यामुळे सामन्यातील सामन्य व श्रीमंतांनाही काका आपले वाटत असल्याने सार्वजन त्यांच्याकडे विनासंकोच मदत मागत असे. त्यामुळे खऱ्या अर्थाने ते नगरचे काकाच होते. आत ते गेल्याने काका हा शब्द पोरका झाला असून पुन्हा असे सर्वांचे हक्काचे काका होणे नाही. नगर शहराच्या व एमआयडीसीच्या विकासासाठी अजून १० ते १५ वर्ष अरुणकाका पाहिजे होते. त्यांच्या निधनाने सर्वच क्षेत्रांमध्ये मोठी पोकळी निर्माण झाली असल्याने काकांची सतत उणीव भासणार आहे, अशा शाबदात मराठा चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष अरविंद पारगावकर यांनी दिवंगत अरुणकाका जगताप यांना श्रद्धांजली वाहिली.

एमआयडीसी मधील उद्योजकांच्या आमी संघटना व मराठा चेम्बर्स ऑफ कॉमर्सच्या

## आमी संघटना व मराठा चेम्बर्स ऑफ कॉमर्सच्यावतीने श्रद्धांजली

वतीने अहिल्यानगरचे अरुणकाका जगताप यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मराठा चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष अरविंद पारगावकर, आमी संघटनेचे अध्यक्ष जयद्रथ खाकाळ व श्रीकृष्ण जोशी यांनी अरुणकाका जगताप यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उद्योजक उपस्थित होते.

यावेळी जयद्रथ खाकाळ म्हणाले, अरुणकाका जगताप यांचे उद्योजकांना कायम मार्गदर्शन व सहकार्य असे. उद्योजकांचे अनेक प्रश्न त्यांनी सोडवले होते. आज त्यांच्या मुळेच नगरची एमआयडीसी सुरक्षित आहे. त्यांच्या कडून खूप काही शिकण्यास मिळाले, असे सांगून आदरांजली वाहिली.

श्रीकृष्ण जोशी म्हणाले, दहावी पास झाल्यावर नोकरी शोधण्यासाठी मी नगरला आल्यावर काकांनीच मला आधार देत सहकार्य केले. त्यांचा लाभलेला सहवासाने माझ्या जीवनाला मोठी कलाटणी मिळाली. अरुणकाकांनी पाठीवर थाप दिल्यानेच मी औद्योगिक क्षेत्रात पडण्याचे धाडस करून यशस्वी उद्योजक होऊ शकलो. आज त्यांच्या विचारावरच आकाश ग्रुपचे काम सुरु आहे. अशा महान कर्तृत्ववान, धार्मिक, धाडसी व मैत्री जपणारे अरुणकाका आज आपल्यातून गेल्याचा विश्वासच बसत नाहीये. ते माझ्या मनात कायम असणार आहेत.

यावेळी प्रा.माणिक विधाते, उद्योजक राजेंद्र कटारिया, सतीश गवळी, राजेश बंसल, सतीश इंदानी, दिलीप अकोलकर, दौलत शिंदे, कारभारी भिंगारे, बालकृष्ण नरोडे, जितेंद्र भळगट, संदीप कोदरे, नागराज बडगिरी, प्रफुल्ल नातू, धीरज गोलांडे, संदेश पिंपळकर, श्री.कराड, संतोष शिंदे, तेजस टाक, चिन्मय सुखटणकर, सुमित लोढा व आकाश जोशी आदींसह उपस्थित होते.

# नगर शहरात योग, प्राणायमसाठी येण्याचे योगगुरु स्वामी रामदेव बाबा यांना आमंत्रण

### हरिद्वार येथे अखंड भारत निरोगी करण्यासंदर्भात घेतलेल्या शिबिरामध्ये अहिल्यानगरचे साधक सहभागी



हरिद्वार येथे योग गुरु रामदेव महाराज यांनी अखंड भारत निरोगी करण्यासंदर्भात घेतलेल्या शिबिरामध्ये नगर शहराचे माजी महापौर भगवान फुलसौंदर, अविनाश ठोकळ बाळासाहेब निमसे, मधुकर निकम, गोरख चौधरी, कारभारी सुपेकर, प्रफुल्ल गायकवाड, ज्ञानेश्वर अहिरराव, कल्पना ठोकळ, सुनिता फुलसौंदर, छाया राजपूत आदींनी भेट घेतली.

नगर – योगगुरु, स्वामी रामदेव बाबा यांना अहिल्यानगर जिल्ह्याच्या वतीने आमंत्रित केले आहे. हे केवळ आमच्या जिल्ह्यासाठीच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रासाठी एक गौरवाची बाब आहे. स्वामी रामदेव बाबा हे केवळ योगाचार्य नाहीत, तर त्यांनी भारतीय संस्कृती, आरोग्य आणि स्वावलंबन यांचा जागर जनमानसात घडवला आहे. योगासारख्या प्राचीन ज्ञानशास्त्राला त्यांनी सामान्य जनतेच्या आयुष्यात आणलं, आणि त्यातून लाखो लोकांनी आरोग्य सुधारले, जीवनशैलीत सकारात्मक बदल घडवून आणले. अहिल्यानगर जिल्हा हा कृषिप्रधान भाग आहे. येथे काम करणार्या शेतकरी बांधवांना, तरुणांना आणि महिलांना योग्य मार्गदर्शन मिळाल्यास त्यांचा जीवनमान उंचावेल, आणि त्यासाठी स्वामीजींचे अनुभव आणि विचार अमूल्य ठरतील, असे प्रतिपादन माजी महापौर भगवान फुलसौंदर यांनी व्यक्त केले.

हरिद्वार येथे योग गुरु रामदेव महाराज यांनी अखंड भारत निरोगी करण्यासंदर्भात घेतलेल्या शिबिरामध्ये नगरचे भगवान फुलसौंदर, अविनाश ठोकळ, बाळासाहेब निमसे, मधुकर निकम, गोरख चौधरी, कारभारी सुपेकर, प्रफुल्ल गायकवाड, ज्ञानेश्वर अहिरराव, कल्पना ठोकळ, सुनिता फुलसौंदर, छाया राजपूत व इतर ७० साधकांनी शिबिराचा लाभ घेऊन रामदेव महाराजांचा सत्कार करून अहिल्यानगर येथे योग शिबिर घेऊन निरोगी अहिल्यानगर करण्यासाठी लवकरच योग शिबिर घेण्यासंदर्भात विनंती केली.

स्वामी रामदेव बाबा यांचे मार्गदर्शन आपल्याला आरोग्याच्या दृष्टीने सजग बनवेल, आणि योग, आयुर्वेद आणि आत्मनिर्भरता या त्रिसूत्रांच्या आधारे आपला जिल्हा समृद्ध होईल, अशी माझी ठाम श्रद्धा आहे. त्यामुळे, आपल्या सर्वांच्या वतीने मी रामदेव बाबा यांना अहिल्यानगर शहरात येण्याचे आमंत्रण देतो, आणि त्यांच्या उपस्थितीने हा जिल्हा अधिक प्रेरणादायक ठरेल, असा विश्वास व्यक्त करतो.

# ब्राम्हण सेवा संघ केडगावतर्फे सामुदायिक व्रतबंध साजरा



केडगाव येथील ब्राह्मण सेवा संघातर्फे सामुदायिक व्रतबंध सोहळ्यामध्ये यामध्ये १२ बटूंच्या मुंजी लावण्यात आल्या.

नगर – केडगाव येथील ब्राह्मण सेवा संघातर्फे सामुदायिक व्रतबंध सोहळा झाला. यामध्ये १२ बटूंच्या मुंजी लावण्यात आल्या. गेल्या २७ वर्षापासून विविध उपक्रम आयोजित करत असतो. त्यातीलच २७ वर्षापासून सामुदायिक व्रतबंध सोहळा हा मोठ्या स्वरूपात साजरा केला जातो. यामध्ये अहम दनगर शहरातीलच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील बटू हे उपनयन संस्कारासाठी केडगाव येथे येत असतात. या संपूर्ण सोहळ्याचे पौराहित्य वेदगुणसंपन्न पंढरपूरकर गुरुजी यांनी केले. आणि बटूंना आशीर्वाद देण्यासाठी मंदार बुवा रामदासी यांची उपस्थिती होती. त्यांनी बटूंना आशीर्वाद देताना उपनयन संस्काराचा अर्थ आणि सध्याच्या काळात हिंदू धर्मीयांनी या आपले स्वसंरक्षण कसे करावे याविषयी मार्गदर्शन केले.

सकाळी ६ वाजता सुरू झालेला हा सोहळा यामध्ये उपनयन विधी म्हणजे काय सर्व बटूंचे चौल, मातृभोजन तसेच मिरवणूक आणि संपूर्ण विधी पार पाडले. अशी माहिती अध्यक्ष नंदकुमार पोळ यांनी दिली.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी उपाध्यक्ष किरण खुर्जेकर, सचिव पंकज जहागीरदार, खजिनदार आनंद ठिपसे, सहसचिव ज्ञानेश देशपांडे, महेश कुलकर्णी, अजित कुलकर्णी, नंदकुमार कुलकर्णी, विनायक कुलकर्णी, डॉक्टर सुधीर कुलकर्णी, किरण कुलकर्णी, डॉक्टर श्रीकृष्ण जोशी, राजेश कळसे, संजय शास्त्री, भूषण पांडव, रविकिरण देशपांडे आणि सर्व महिला सदस्य यांनी परिश्रम घेतले.



बी.पी.एच.ई. सोसायटीचे अध्यक्ष डॉ.आर.जे.बार्नबस यांच्या हस्ते १२ वीच्या परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

# अहमदनगर महाविद्यालयाचा इ. १२ वी चा ८९.५१ टक्के निकाल

नगर – फेब्रुवारी/ मार्च २०२५ मध्ये झालेल्या इ.१२ वी बोर्डाच्या परीक्षेचे निकाल नुकतेच जाहिर झाले आहेत. यात अहमदनगर महाविद्यालयाचा सायन्स विभागाचा निकाल ९५.८७ % तर कॉमर्स विभागाचा ९०.७७ % आणि आर्टस विभागाचा ६६.९९ % लागला आहे. महाविद्यालयाचा एकूण निकाल ८९.५१ % टक्के लागला आहे. विद्यार्थ्यांनी परिक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.

यामध्ये विज्ञान शाखेत – शेख अब्दुल रहमान सादिक यांनी ७८.५ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. सय्यद माहिर मोहसिन (७६.५%) दुसऱ्या क्रमांकावर तर भोसले जेसी कुमार (७६.१७%) तिसऱ्या क्रमांकावर आहेत. वाणिज्य शाखेत – चुडिवाला नीदा इक्बाल हिने ८८.५ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळवला आहे. गायके ऋतिका ज्ञानदेव (८८.३३%) दुसऱ्या आणि खान आयेशा युसुफ (८७.३३%) तिसऱ्या क्रमांकावर आहेत. कला शाखेत गौड केशव शैलेन्द्रकुमार याने ८८.१७ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला आहे. मोरे पायल संतोष (८७.६७%) दुसऱ्या आणि श्रुती दीपक डांगे (८४.६७%) तिसऱ्या क्रमांकावर आहेत.

या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे कॉलेज प्रशासन, शिक्षकवृंद आणि पालकांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

महाविद्यालयाच्या वतीने बी.पी.एच.ई. सोसायटीचे अध्यक्ष डॉ.आर.जे.बार्नबस यांच्या हस्ते या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्रभारी प्राचार्य डॉ.नोएल पारगे, उपप्राचार्य दिलीपकुमार भालसिंग, उपप्राचार्य प्रतुल कसोटे, डॉ.सय्यद रज्ज़ाक उपस्थित होते.

यावेळी बी.पी.एच.ई.सोसायटीचे अध्यक्ष डॉ.आर.जे.बार्नबस म्हणाले की, ही यादी केवळ गुणांची नसून, मेहनतीची, सातत्याची आणि सकारात्मक दृष्टिकोनाची आहे. आमचे विद्यार्थी केवळ शैक्षणिकदृष्ट्या नव्हे तर सर्वांगीण विकासाच्या दृष्टीनेही पुढे जात आहेत, हे आमच्यासाठी अत्यंत अभिमानास्पद आहे. शिक्षकवृंद, पालक आणि विद्यार्थ्यांचे हे सामूहिक यश आहे.

# बालभवनच्या 'गोल गाईड' उपक्रमाचे उत्साहात शुभारंभ

### विद्यार्थ्यांच्या भविष्यनिर्मितीसाठी नवा मार्ग



स्नेहालय संचलित बालभवनच्या वतीने 'गोल गाईड' या समाजोपयोगी आणि दूरदृष्टीपूर्ण उपक्रमाचा शुभारंभ समाजातील इच्छुक स्वयंसेवक व गरजू विद्यार्थ्यांचे फॉर्म भरून करण्यात आला.

नगर – स्नेहालय संचलित बालभवनच्या वतीने 'गोल गाईड' या समाजोपयोगी आणि दूरदृष्टीपूर्ण उपक्रमाचा शुभारंभ समाजातील इच्छुक स्वयंसेवक व गरजू विद्यार्थ्यांचे फॉर्म भरून करण्यात आला. नाते...प्रेरणादायी मैत्रीचे या संकल्पनेवर आधारित या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना दीर्घकालीन आणि सुसंगत मार्गदर्शन, मानसिक आधार आणि प्रेरणा देणे हा आहे.

'गोल गाईड' हा एक वैयक्तिक मेंटॉरशिप उपक्रम असून गरजू समाजातील गरजू विद्यार्थ्यांना G - Guide (मार्गदर्शन करणे), O - Observe (निरीक्षण करणे), A- Assist (सहाय्य करणे) L - Lead (नेतृत्व करणे) असे या उपक्रमाचे मुख्य भाग असून स्वयंसेवक विद्यार्थ्यांचे वैयक्तिक मार्गदर्शक, प्रेरणादाता आणि सहाय्यक बनून कार्य करतील. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने झाली. स्नेहालयाचे विश्वस्त राजीव गुजर, स्नेहालय अनिवासी विभागाचे संचालक हनीफ शेख यांनी उपक्रमाची संकल्पना सविस्तरपणे मांडली. समाजातील प्रत्येक घटकाने या उपक्रमात सहभागी होण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. प्रमुख पाहुण्यांमध्ये श्वेता गांधी, लीना मुथा, स्मिता बंथिया, गुणाली मुथा, बालभवनच्या मानद संचालक वैशाली चोपडा आदींनी उपस्थिती नोंदवली. स्वयंसेवकांनी विद्यार्थ्यांच्या शंकेचे निरसन केले. या कार्यक्रमात ५० इच्छुक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

शिक्षण, सामाजिक काम, करिअर मार्गदर्शनात रुची असलेले युवकांना सकारात्मक दृष्टी देण्याची इच्छा असलेले, संवेदनशील, समजूतदार व प्रेरणादायी स्वयंसेवक या उपक्रमात सहभागी होऊ शकतात. पहिल्या टप्प्यात बालभवनमधील ४० विद्यार्थ्यांना वैयक्तिक मेंटॉरशिप दिली जाणार आहे. संस्थेचे पालक राजीवभाई गुजर यांनी समाजातील संवेदनशील नागरिकांना या उपक्रमात वेळ देऊन योगदान देण्याचे आवाहन केले. इच्छुकांनी ९०११०२६४९८ या क्रमांकावर संपर्क साधावा.

'गोल गाईड' उपक्रम हा फक्त एक कार्यक्रम नसून, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एक संवेदनशील आणि परिणामकारक प्रवास ठरणार आहे. समाजात सकारात्मक बदल घडविण्याचा संकल्प उपस्थितांनी केला असून, हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी आशेचा नवा किरण ठरणार आहे.




## टेंडर नोटीस

आमच्या रेणूका शिक्षण प्रसारक मंडळाचे, प्राथमिक व माध्यमिक या विद्यालयामध्ये प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना शासन निर्णय क्र. शापोआ २०२४ / प्र.क्र.३३ / एस डी ३, दि.१४/१०/२०२४ आणि मा. शिक्षण संचालक (प्राथमिक) प्राथमिक शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे जा.क्र. प्राषिसं / पी.एम. पोषण / २०२४-२५ / ०७४७० दि. २८/११/२०२४ च्या पत्रानुसार सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाकरिता टेंडर देण्यात येत आहे. तरी इच्छुक बचत गटांनी वरील शासन पुर्तता पुर्ण करून शुक्रवार दि.१६/०५/२०२५ पर्यंत आपले अर्ज कार्यालयात सादर करावे. या तारखेनंतर येणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

टिप-

१. कोणतीही निविदा / अर्ज मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार समिती राखून ठेवीत आहे.

२. बचत गटाकडे सर्व परवाने व पुरेसा बँक बॅलन्स असणे आवश्यक आहे.


३. सर्व नियम व अटी आपणास मंजुर असतील

**अध्यक्ष / सचिव शाळा व्यवस्थापन समिती**
प्राथमिक विद्यालय व रामराव चव्हाण माध्यमिक विद्यालय नागापूर, एम.आय.डी.सी. अहिल्यानगर












# छोट्या शाळांचे अस्तित्व धोक्यात आणणाऱ्या संच मान्यतेचा 'तो' शासन निर्णय रद्द व्हावा

नगर – छोट्या शाळांचे अस्तित्व धोक्यात आणणाऱ्या व शिक्षकांना अतिरिक्त ठरविणाऱ्या २८ ऑगस्ट २०१५ चा संच मान्यतेचा शासन निर्णय रद्द करून पूर्वीप्रमाणे संच मान्यता करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्यावतीने करण्यात आली आहे. या मागणीसाठी शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने माध्यमिकचे शिक्षणाधिकारी अशोक कडूस यांना निवेदन दिले.


छोट्या शाळांचे अस्तित्व धोक्यात आणणाऱ्या संच मान्यतेचा तो शासन निर्णय रद्द व्हावा या मागणीसाठी शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने माध्यमिकचे शिक्षणाधिकारी अशोक कडूस यांना निवेदन दिले.

याप्रसंगी जिल्हा कार्यवाह शिवाजी घाडगे, कोषाध्यक्ष प्रसाद सामलेटी, एस. सी. धीवर, एस. डी. उदार, आर. बी. पवार, जे. एस. कोळकर, एस. सी. छजलाने, अभिजीत गवारे, विठ्ठल ढगे, एस. एस. शिरसाठ, दिपक आरडे आदींसह शिक्षक वर्ग उपस्थित होते.

शासन निर्णय २८ ऑगस्ट २०१५ मध्ये दुरुस्ती करून शासन निर्णय ८ जानेवारी २०१६ नुसार इयत्ता नववी, दहावी या वर्गासाठी शिक्षकांची किमान तीन पदे मंजूर होती. त्यामुळे ग्रामीण भागातील छोट्या शाळांमध्ये किमान तीन शिक्षक उपलब्ध होत होते, परंतु शासन निर्णय १५ मार्च २०२४ मधील मुद्दा क्रमांक तीन मधील निकषानुसार इयत्ता नववी मध्ये वीस विद्यार्थी तसेच इयत्ता दहावी मध्ये वीस विद्यार्थी असणे आवश्यक आहे. तर शिक्षक पद मंजूर होणार आहे. अन्यथा इयत्ता नववी, दहावी गटासाठी कोणतेही शिक्षक पद मंजूर होणार नसल्याचा गंभीर नियम असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

बहुतांश ग्रामीण भागातील माध्यमिक शाळांमध्ये इयत्ता नववी, दहावी मध्ये विद्यार्थी संख्या ४० पेक्षा कमी आहे. अशा सर्व शाळांमध्ये एकही पद मंजूर न झाल्याने संस्थाचालकांवर शाळा बंद करण्याची वेळ आलेली आहे. तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसमोर माध्यमिक शिक्षणाचा बिकट प्रश्न निर्माण होणार आहे. ग्रामीण भागात इतर वर्गात ४०, ४२ विद्यार्थी आहे. परंतु इयत्ता नववी मध्ये १८ विद्यार्थी व इयत्ता दहावी मध्ये २३ विद्यार्थी म्हणजे एकूण ४० पेक्षा पट कमी असूनही शाळेला जीटी (९–१०) गटासाठी एकही शिक्षक मंजूर नाही म्हणजे अशी शाळा आपोआप बंद होणार आहे.

किमान विज्ञान–गणित, समाजशास्त्र, भाषा असे किमान तीन शिक्षक शाळेवर असल्यास ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाही. गावातील शाळेमध्ये २० ते ३० विद्यार्थी आहेत जर ती शाळा नव्या निकषानुसार बंद होत असेल, तर त्या विद्यार्थ्यांचे शिक्षणाची सोय कशी करणार? ग्रामीण भागात सार्वजनिक वाहतूक व्यवस्था बिकट असून, त्याचा फटका पालकांना बसणार आहे. शिवाय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वेळ वाया जाईल. विद्यार्थ्यांना शारीरिक त्रास होणार तो वेगळाच. या छोट्या शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी कला, क्रीडा यासाठी शिक्षक नकोत का हा प्रश्न शिक्षक परिषदेने उपस्थित केला आहे.

गावातील छोट्या शाळा बंद झाल्याने हजारो शिक्षक अतिरिक्त ठरणार आहे. त्या अतिरिक्त शिक्षकांचा समायोजनाचा प्रश्न बिकट होणार आहे. याचा परिणाम पवित्र प्रणालीतील शिक्षक भरतीवर होणार आहे. जवळपास शिक्षक भरती रद्द करावी लागणार, अशी चिन्हे आहेत. शासन निर्णयातील जाचक व ग्रामीण भागात अभ्यास न केल्याने वरिष्ठ कार्यालयातील उच्च अधिकारी यांनी नियोजन शून्य अभ्यासातून घेतलेल्या निर्णयाने शिक्षण क्षेत्राला त्रास होणार असल्याचे निवेदनात म्हंटले आहे.

शासनाने या निर्णयाचा सखोल ग्रामीण व शहरी भागाचा स्वतंत्र विचार करून, विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या दृष्टीने व भविष्य काळातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी कायद्यामध्ये लवचिकता आणून सुधारित निकषांचा विचार करण्याची मागणी शिक्षक परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे. राज्यघटनेने सर्वांना शिक्षणाचा समान अधिकार दिला असून, याबाबत शासनाचे दायित्व नमूद केले असून, त्यांनाही जाचक शासन निर्णयाद्वारे ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्था संपणार नाही, या दृष्टीने काळजी घेण्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

# केडगाव स्मशानभूमीतील ओट्यावरील जाळ्या दुरुस्त कराव्या : मनोज कोतकर

नगर – केडगाव येथील स्मशानभूमीमध्ये बसवण्यात आलेल्या ४ ओट्यावरील जाळ्यांची दूरावस्था झाली असून त्या अक्षरशा तुटलेल्या आहे. अंत्यविधी करताना नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. तसेच अंत्यविधी करताना प्रेत ढासळण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे प्रेताची विटंबना होऊ शकते, नागरिकांच्या भावना देखील दुखावल्या जातील तसेच येथे पाण्याची टाकी असून ती नादुरुस्त झाली आहे. त्यामुळे पाण्याची समस्या देखील तीव्र झाली आहे. बाथरूम मधील नळ ना दुरुस्त झाले असल्यामुळे दशक्रिया विधी व अंत्यविधीसाठी येणाऱ्या नागरिकांना गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे.

महापालिका प्रशासनाच्या वतीने तातडीने केडगाव येथील अमरधाम मधील ओट्यावरील जाळ्या दुरुस्त करून द्याव्यात अशी मागणी स्थायी समितीचे माजी सभापती मनोज कोतकर यांनी उपयुक्त विजयकुमार मुंडे यांना निवेदनाद्वारे केली आहे.




केडगाव स्मशानभूमीतील ओट्यावरील जाळ्या दुरुस्त करून देण्याबाबतच्या मागणीचे निवेदन उपयुक्त विजयकुमार मुंडे यांना देताना मनोज कोतकर. शेजारील छायाचित्रात केडगाव येथील स्मशानभूमीमधील ओट्यावरील बसविण्यात आलेल्या जाळ्यांची झालेली दुरावस्था. (छाया – लहू दळवी)



पुरुषांसाठी
जम्बो साईज
टी-शर्ट/शर्टस्
फॉरमल पँट/ट्राऊजर्स
व सर्व प्रकारचे कपडे
डिस्काउंट रेटमध्ये
भरपुर व्हरायटीज्
ऑनलाईन पेक्षा स्वस्त
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल
पुरुषांसाठी सर्व काही
शुभ मॉल
मयुरी लेडिज मॉलच्या वर
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कूल जवळ, आगरकर मळा, अहमदनगर. ९०२८२०११८८


# धोकादायक इमारती मालकांनी स्वतःहून काढून घ्याव्यात अन्यथा कारवाई

## पावसाळ्यापूर्वी नालेसफाई, गटारी, ड्रेनेज दुरुस्ती करण्याच्या बांधकाम विभागाला सूचना; : अतीधोकादायक अवस्थेत असलेल्या १५ इमारती पडण्याचे महानगरपालिकेचे आदेश

नगर – महानगरपालिका प्रशासनाने शहरातील १५ अतीधोकादायक अवस्थेतील इमारती पडण्यासाठी प्रक्रिया सुरू केली आहे. यात बहुतांश इमारती या मध्य शहरातील आहेत व त्यातील काहींचा वापरही सुरू आहे. पावसाळ्यापूर्वी या इमारती उतरवून घेण्याचे आदेश आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी बांधकाम विभागाला दिले आहेत. नागरिकांनी धोकादायक अवस्थेतील इमारती स्वतःहून काढून घ्याव्यात, अन्यथा महानगरपालिका कारवाई करून काढतील, असा इशारा त्यांनी दिला. दरम्यान, पावसाळ्यापूर्वी नालेसफाई पूर्ण करा, ड्रेनेज लाईन दुरुस्तीची कामे पूर्ण करा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या आहेत.

यशवंत डांगे यांनी ८ मे रोजी महानगरपालिकेत मान्सून पूर्व कामांचा आढावा घेतला. बैठकीस उपायुक्त विजयकुमार मुंडे, संतोष टेंगळे, शहर अभियंता मनोज पारखे यांच्यासह सर्व विभागांचे प्रमुख उपस्थित होते. शहरातील धोकादायक इमारतींवर सुरू असलेल्या कारवाईचा यशवंत डांगे यांनी आढावा घेतला. धोकादायक अवस्थेत असलेल्या शहरातील १९७ इमारतींना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. तसेच, १६ धोकादायक इमारतींबाबत न्यायालयीन प्रक्रिया सुरू आहे. तर, १५ इमारती अती धोकादायक अवस्थेत असल्याचे बांधकाम विभागाने स्पष्ट केले. आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी या धोकादायक इमारतींवर कारवाई करण्याचे आदेश दिले. तसेच, इमारत मालकांनाही स्वतःहून इमारती काढून घेण्याचे आवाहन केले आहे. तसेच, १९७ इमारतींना नोटिसा बजावून त्याचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे व अहवाल सादर करण्याचे आदेश यापूर्वीच देण्यात आलेले आहेत. या इमारत मालकांनाही दुरुस्ती अथवा धोकादायक भाग उतरवून घेण्यासाठी सूचना द्याव्यात, असे यशवंत डांगे यांनी सांगितले.

मान्सून पूर्व कामांचा आढावा घेताना शहरातील झाडांच्या धोकादायक अवस्थेत असलेल्या फांद्या काढण्याचे, धोकादायक झाडे काढण्याचे आदेश त्यांनी दिले आहेत. पावसाळ्यात नाल्या, गटारी तुंबणार नाही, या दृष्टीने त्यांची साफसफाई करून घ्यावी, असेही त्यांनी सांगितले. ड्रेनेज लाईन, चेंबर दुरुस्ती करून घ्यावी, ड्रेनेज लाईनची साफसफाई करण्यात यावी, असेही त्यांनी सांगितले. नागरिकांना पावसाळ्यात अडचण होऊ नये, यासाठी प्रलंबित रस्त्यांची कामे पूर्ण करावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या आहेत.


भिंगार अर्बन को. ऑप. बँक लि.,
भिंगार मुख्य कार्यालय, नगर–पाथर्डी रोड, भिंगार, अहिल्यानगर – ४१४००२

छपाई निविदा सुचना

बँकेस सन २०२५–२०२६ सालासाठी आवश्यक छपाई करुन घेणे असल्यामुळे व्यावसायीकांडून सिलबंद निविदा मागविणेत येत आहेत.

१. कोरे निविदा फॉर्म रु.१०० + १८% जी. एस. टी. रकमेचा भरणा करुन दि. १३/०५/२०२५ ते २३/०५/२०२५ पर्यंत सकाळी १०.०० ते सायं. ५.०० या वेळेत सुटयांचे दिवस वगळून मुख्य कार्यालय भिंगार येथे मिळतील.
२. छपाईचे कागदाचे नमुने बँकेच्या नमुन्याप्रमाणे पाहून निविदा सादर कराव्यात. निविदेसोबतच छपाई कागदाचे नमुने सादर करावे लागतील.
३. निविदा सादर करतांना रु.५०००/– अक्षरी रु. पाच हजार मात्र रोख किंवा डी. डी. बँकेच्या अनामत खाती जमा करावे लागतील. व्यवसायाचे जी.एस.टी. रजिस्ट्रेशन आवश्यक राहील.
४. निविदा मंजूर झाल्यास छपाईचे काम वेळेत न केल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.
५. सिलबंद निविदा दि.२७/०५/२०२५ रोजी सायं ४.३० वाजेपर्यंत मुख्य कार्यालयात बँकेच्या कामकाजाच्या वेळेत सादर कराव्यात. त्यानंतर आलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.
६. कोणतेही कारण न देता निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार संचालक मंडळाने राखून ठेवला आहे.

तारीख – ०९/०५/२०२५.

श्री. शशीकांत उमाकांत महाजन
मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री. अनिलराव मधुकरराव झोडगे
चेअरमन


# संजय जोशी यांचा सचिवपदाचा राजीनामा 'हिंद सेवा मंडळा'कडून एकमताने नामंजूर

## अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक यांची माहिती; संचालक मंडळाच्या बैठकीत निर्णय

नगर – हिंद सेवा मंडळाच्या संचालक मंडळाची ३ मे रोजी झालेल्या बैठकीत झालेल्या वादावादी वरून संस्थेचे मानद सचिव संजय जोशी यांनी राजीनामा दिला होता. त्यावर निर्णय घेण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक यांनी गुरुवारी संचालक मंडळाची बैठक बोलावली होती. या बैठकीस उपस्थीत सर्व संचालकांनी २८ विरोधात शून्य मतांनी सचिव संजय जोशी यांचा राजीनामा नामंजूर केला आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक यांनी देताच उपस्थित सर्व संचालकांनी टाळ्या वाजून निर्णयाचे स्वागत केले.


हिंद सेवा मंडळाच्या बैठकीत बोलताना संस्थेचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक. समवेत सर्व संचालक.

संचालक मंडळाच्या बैठकीत अध्यक्षस्थानाहून बोलताना प्रा.शिरीष मोडक म्हणाले, ३ मे रोजी घडलेली घटना ही अत्यंत क्लेशदायक आहे. अशी घटना पुन्हा घडूच नये याची खबरदारी सर्व संचालकांनी घ्यावी. संस्थेची प्रतिमा मलीन करणारी अशी घटना पुन्हा घडल्यास संस्थेच्या घटनेप्रमाणे संबंधितांवर कडक कारवाई होईल, असा इशारा त्यांनी देत झाले गेले विसरून जाऊ सर्वांनी पुन्हा पूर्वीप्रमाणेच संस्थेला पुढे नेण्यासाठी योगदान द्यावे. सचिव संजय जोशी हे अत्यंत मनोभावे संस्थेच्या प्रगतीसाठी योगदान देत आहेत. त्यांच्यामुळेच हिंद सेवा मंडळाच्या सर्व शाळा व महाविद्यालय सर्वांगीण प्रगती करत आहे. त्यामुळे त्यांनी नाराज होऊन दिलेला राजीनामा सर्व संचालक मंडळ नामंजूर करत असून हिंद सेवा मंडळाचे सचिव म्हणून संजय जोशीच काम करतील, अशी घोषणा करून त्यांचा राजीनामा नामंजूर केला.

कार्याध्यक्ष डॉ.रमेश झरकर म्हणाले, हिंद सेवा मंडळाचे विरोधक संस्थेस अडचणीत आणण्यास टपलेले आहेत. म्हणून भविष्यात पुन्हा अशी वाईट घटना होणार नाही याची खबरदारी सर्व संचालक मंडळांनी घ्यावी. संजय जोशी हे हिंद सेवा मंडळाचे खमके नेते आहेत. त्यांच्यामुळेच ही संस्था भरभराटीस आली आहे. त्यामुळे त्यांनी दिलेला राजीनामा सर्व संचालक मंडळांनी एकामातेने नामंजूर केला आहे. यापुढील होणाऱ्या बैठकींमध्ये संचालकांनी वैयक्तिक टीकाटिप्पणी टाळून संस्थेच्या हिताचे निर्णय घ्यावेत, असे आवाहन केले.

या बैठकीत उपकार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी, ब्रिजलाल सारडा, सहसचिव अनंत फडणीस, मकरंद खेर, जगदीश झालानी, मधुसूदन सारडा, प्रा.ज्योती कुलकर्णी, अशोक उपाध्ये, कार्यकारणी सदस्य अजित बोरा, डॉ.पारस कोठारी, सुजित बेडेकर, रणजीत श्रीगोड, सुरेश चव्हाण, विष्णू सारडा, सेवक प्रतिनिधी विठ्ठल उरमुडे, कल्याण लकडे, आदिनाथ जोशी, गिरीश पाखरे, योगेश देशमुख, सुनील सुसरे व सहाय्यक सचिव बी.यु. कुलकर्णी आदींनी मनोगत व्यक्त करून संजय जोशी यांचा राजीनामा नामंजूर करण्याचे सुचवले. तसेच या बैठकीस अनुपस्थित असलेले संचालक शामसुंदर सारडा, अनिल देशपांडे, दिलीप शहा, आनंत देसाई व संजय दुगड यांनी पत्राद्वारे संजय जोशी यांच्या राजीनाम्यास विरोध केला.


सर्व कामगार बंधु आणि भगिनींना जागतिक कामगार दिनाच्या शुभेच्छा !
या निमित्ताने

इंडो आयरिश हॉस्पिटल
तपोवन रोड, सावेडी, अहिल्यानगर. फोन 0241-2423336
मो. 9130423336 * 9860310001
तर्फे
मोफत सर्वरोग तपासणी
दि. १ मे ते १० मे २०२५ रोजी स. १० ते ५ वा.
• सर्व तपासणीवर ५०% पर्यंत सवलत
Star Health, Sbi General Insurance, Oriental Health Insurance & All Tpa, National Insurance, Tata Aig General Insurance, ICICI Lombard, Bajaj Allianz, Reliance Insurance Company, Universal Sampo, Manipal Cigna, IFFCO TOKIO, HDFC ERGO, Medi Assist, Future Genrali
व इतर सर्व कॅशलेस इंशुरन्स उपलब्ध
* उपलब्ध सुविधा *
सर्व रोग निदान व उपचार
• जनरल सर्जरी (हार्निया, अपेंडीक्स व इतर सर्व शस्त्रक्रिया)
• कार्डियाक (कॅथलॅब, अँन्जीओप्लास्टी)
• युरोलॉजी (डायलिसीस, किडनीस्टोन, प्रोस्टेट सर्जरी)
• मेडिसीन (डायबेटिस, हृदयाचे आजार, स्ट्रोक, ब्लडप्रेशर)
• ऑर्थोपेडिक (सांधेदुखी, पाठदुखी, सांधे प्रत्यारोपन)
• स्त्रीरोग व प्रसुतिशास्त्र (वंध्यत्व निवारण, वेदनाविरहीत प्रसुती)
• बालरोग व नवजात रोगशास्त्र
• ऑन्कोलॉजी (सर्जरी व किमोथेरपी)
• पॅथॉलॉजी
• रेडिओलॉजी
• सिटीस्कॅन
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना
आयुष्मान भारत योजना
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगारांसाठी
२४ तास आपत्कालीन व ॲम्बुलन्स सुविधा उपलब्ध


# सावेडी परिसरातील हॉटेलमध्ये सुरु असलेल्या हुक्का बारवर छापा

नगर – नगर – मनमाड रोडवरील हॉटेल पंचशील येथे बेकायदेशीर रित्या सुरु असलेल्या हुक्का बार वर शहर विभागाचे पोलीस उपअधीक्षक अमोल भारती यांच्या पथकाने ८ मे रोजी रात्री छापा टाकत दोघांना ४ हजार रुपये किंमतीच्या मुद्देमालासह ताब्यात घेतले आहे.

पोलीस उपाधीक्षक अमोल भारती यांना मिळालेल्या माहितीवरुन त्यांच्या पोलीस पथकाने नगर मनमाड रोडवरील हॉटेल पंचशील येथे रात्री ८ च्या सुमारास छापा टाकला. त्या ठिकाणी ७ ते ८ टेबल लावलेले असून त्यापैकी एक टेबलवर एक इसम हुक्का पॉटच्या साह्याने पाईप मधून हुक्का पीत असल्याचे दिसुन आले. तसेच बाजूला एक इसम हुक्का पॉट तयार करीत असताना दिसून आले. पोलिसांनी त्यास त्यांचे नाव व पत्ता असता त्याने त्याचे नाव अक्षय बाळासाहेब गांधले (वय २६, रा. खळेवाडी, भिंगार) तर हुक्का पिणाऱ्या इसमाने त्याचे नाव गुलमोहम्मद रियाजुद्दीन अन्सारी (वय २८ रा. बिजनौर, उत्तर प्रदेश. हल्ली रा. हॉटेल पंचशील मागे, अ.नगर ) असे असल्याचे सांगितले. हा हुक्का बार कोणाचा आहे याबाबत विचारणा केली असता अक्षय गांधले याने हा माझाच आहे असे सांगितले. पोलिसांनी तेथील झडती घेतली असता झडतीमध्ये काचेचे दोन पॉट, दोन चिलीम, दोन हुक्का पाईप, तंबाखूजन्य पदार्थ असे साहित्य जप्त केले. याप्रकरणी पोलीस नाईक हेमंत खंडागळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन तोफखाना पोलिसांनी दोघांविरुद्ध सिगारेट व अन्य तंबाखूजन्य उत्पादने महाराष्ट्र सुधारणा अधिनियम २०१८ चे कलम ४ (अ), २१ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.


हरवले आहे
राधोजी महादेव जंबे या नावाचे खरेदीखत
दस्त क्र.२७/९/२०१४ हे रभाजी नगर ते
रंगोली चौक, केडगाव, अहिल्यानगर, या
दरम्यान ३/४/२०२५ रोजी गहाळ झाले आहे.
कुणाला आढळल्यास खालील मोबाईलवर संपर्क करा.
8484039084


# बोल्हेगाव व नालेगाव परिसरातील दोन अल्पवयीन मुलींचे अपहरण

नगर – शहरात दोन वेगवेगळ्या भागांमधून दोन अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्याची माहिती समोर आली असून, त्यांच्या अपहरणाची शक्यता पालकांनी व्यक्त केली आहे. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात स्वतंत्रपणे दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. बोल्हेगावात राहणाऱ्या महिलेने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, त्यांची मुलगी (वय १७) ६ मे रोजी सकाळी ९.३० च्या सुमारास घरातच होती. फिर्यादी कामानिमित्त एमआयडीसी परिसरातील कंपनीत गेल्यानंतर सायंकाळी ६.३० वाजता घरी परतल्यावर त्यांना मुलगी घरात दिसून आली नाही. तिचा फोन देखील बंद मिळाला. नातेवाईक व मैत्रिणीकडून शोध घेऊनही ती मिळून आली नाही. त्यामुळे अज्ञात इसमाने अपहरण केल्याची शक्यता फिर्यादीने व्यक्त केली आहे. पोलिसांनी गुन्ह्याची नोंद केली आहे.

दुसऱ्या घटनेत नालेगाव परिसरातील व्यक्तीने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, त्यांची मुलगी (वय १६) १ मे रोजी सकाळी १०.३० च्या सुमारास शहरातील एका दुकानात कामाला जाते, असे सांगून घरातून बाहेर पडली. परंतु रात्री आठ वाजेपर्यंत घरी न परतल्याने तिचा शोध घेण्यात आला. दुकानात चौकशी केली असता ती त्या दिवशी दुकानात आलीच नव्हती, अशी माहिती मिळाली. मैत्रिणी व नातेवाईकांकडे शोध घेऊनही मुलगी सापडली नाही. तिचे अपहरण झाल्याचा संशय फिर्यादीने व्यक्त केला आहे. पोलिसांनी गुन्ह्याची नोंद केली आहे.

# ‘काका’

मनातला सूर्य
कधी मावळत नाही...



आमचे वर्गमित्र
आदरणीय मा. आमदार
स्व. अरूणकाका जगताप
यांना भावपूर्ण श्रध्दांजली

आमचे वर्गमित्र
सदैव आमच्या सर्वांची विचारपूस व काळजी घेणारा व आमच्या ग्रुपचा आधारवड....
काळानी अचानक घेतलेला धाव व कधीच न भरून येणारी पोकळी...
आम्ही सर्व सुन्न व निशब्द

दु:खांकित
**समस्त वर्गमित्र**

---

।। जय झुलेलाल ।।
आपकी सेवा, समर्पण, और समाज के लिए आपके योगदान के लिए,
हम आपको भावभीनी श्रद्धांजलि देते हैं
और आपकी यादें हमेशा हमारे दिलों में रहेंगी।
ॐ शांति ॐ शांति ॐ शांति

भावपूर्ण श्रध्दांजली



**स्व.अरुणकाका बलभीमराव जगताप**

आपकी पावन स्मृती में भावपूर्ण श्रध्दांजली

* शोकाकुल *

**सिंधी जनरल पंचायत (ट्रस्ट) अहिल्यानगर**
**(समस्त सिंधी समाज)**

**श्री गुरुकृपा समाज सेवा ट्रस्ट, अहिल्यानगर**
**सिंधु मंगल कार्यालय**

**सत्नाम साक्षी गौशाळा, बारस्कर मळा, सावेडी**

---

# तडफदार व्यक्तिमत्व, आदर्श नेतृत्व



आमच्या धार्मिक व सामाजिक कार्यासाठी
संदैव तत्परतेने साथ देणारे आमचे मार्गदर्शक
देणारे आमचे
**स्व. मा. आ. अरूणकाका जगताप**
यांच्या स्मृतीस
भावपूर्णश्रध्दांजली

• शोकाकुल •
**पंजाबी सेवा समिती, राधाकृष्ण मंदिर,**
**पंजाबी सनातन धर्मसभा**

---

# आधारस्तंभ



प्रत्येक कार्यासाठी
तत्पर असणारे
आमचे आदर्श नेतृत्व

अहिल्यानगरचे ज्येष्ठ नेते व
माजी आमदार आदरणीय
**स्व. अरूणकाका बलभीमराव जगताप**
यांच्या स्मृतीस
भावपूर्णश्रध्दांजली

गुरुद्वारासाठी निस्वार्थ सेवा करणारे, कष्टाळू आणि
सर्वावर प्रेम करणारे व्यक्तिमत्व म्हणजे अरूण काका जगताप

• त्यांचा परिवाराच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत.. •
गुरूद्वारा भाई दयासिंहजी गोविंदपुरा, समस्त
शीख व गुरूनानक नाम लेवा सांगत अहिल्यानगर

ad magic

## पाहिजेत
जॉकी स्टोअर्स दुकानात कामासाठी

* सेल्समन : १ जागा
* सेल्सगर्ल : २ जागा

वय : २० ते ३० अनुभव १ ते २ वर्ष आवश्यक

जॉकी स्टोअर्स, श्रमिक बालाजी मंदिराजवळ, तेलीखुंट, अहिल्यानगर
9001065724

## दुकानात सफाईसाठी मुलगा पाहिजे
सारडा इंटेरिअर
सारडागल्ली, अ.नगर
9834370919

## कामगार पाहिजेत
* किराणा दुकानात काम करण्या करिता
* अनुभव असणाऱ्यास प्राधान्य.
* बायोडाटा सह समक्ष भेटावे.

सुयश कॉर्नर
तेलीखुंट, अहमदनगर
98220 67373

## मुले-मुली पाहिजेत
सबजेल चौक येथे कॉम्प्युटरवर फॉर्म भरण्यासाठी मुले पाहिजे
नक्षत्र सायबर कॅफे
9270777778

## टॅम्पो ड्रायव्हर पाहिजे
महावीर इंडस्ट्रीज
केडगाव, अ.नगर
9422727627

## विकणे/भाड्याने देणे
श्रीराज रो-हौसिंगमध्ये केडगांव देवीमागे, अहिल्यानगर
9527409718

## REQURIED ACCOUNTS ASSISTANT
At "AVATAR MEHER BABA P.P.C TRUST", Kings Road, Post Bag 31, Ahilyanagar -414001

Eligibility Criteria
1. Bachelor's degree in Commerce (B.Com) or related field.
2. Good knowledge of basic accounting, Tally Prime, Excel, and accounting software
3. Experience-4-5 years of relevant experience.

Interested candidates may drop your CV/Resume @ ambppct.anr@gmail.com, Contact No : 9423445689

## पाहिजेत
**अकौंटंट** (M/F) **जागा-२**
एका नामांकित इलेक्ट्रॉनिक्स शोरूम करीता अकौंटिंगच्या कामासाठी उमेद्वार पाहिजे, टेलीचे ज्ञान आवश्यक,
**सेल्समन** (M/F) **जागा-२**
गोदरेज कंपनीचे उपकरणे विक्रीसाठी अनुभव असल्यास प्राधान्य
**मावशी** (F) **जागा-१**
शोरुम मध्ये साफसफाई कामासाठी मावशी पाहिजे
आकर्षक पगार दिले जाईल, इच्छुकांनी संपर्क करावे
**लख्मी इलेक्ट्रॉनिक्स,**
डांगे गल्ली, माणिक चौक,अ.नगर, संपर्क : 9423464894


## पाचवे पुण्यस्मरण



भाग्यवान आम्ही
मातृछत्र ऐसे लाभले
आशीर्वादाने आपल्या
जीवन धन्य झाले...
अजुनही वाटते तुम्ही सोबत आहात...
पाठीवरुनी हात मायेचा
फिरवित आहात...

आपल्या पावन स्मृतिस भावपूर्ण श्रध्दांजली

**स्व. इंदिरा जालमसिंग परदेशी**
स्व. दि. १०/५/२०२०

* दुःखांकित *
जसवंतसिंग परदेशी (मूलगा) । शरायु जसवंतसिंग परदेशी (सुन)
लता विजयसिंग बायस (मुलगी) । सुनिता दिलीपशेठ लुंकड (मुलगी)
रेखा (मिना) राजेंद्र मुनोत । सौ. संगिता शिवकुमारसिंग राजपुत
गुणिता, ललीता जालमसिंग परदेशी (मुली)
समस्त परदेशी परिवार, अ.नगर
फर्म : जे.के परदेशी (टेलर)


## KIDS YOGA SUMMER CAMP
Shiv Tattwa — Yogpeeth —

A week full of fun, flexibility, and creativity! Let your child explore the joy of movement, mindfulness, and more!



Activities Include:
* Yoga, Chair, Wheel, Rope Yoga
* Art & Craft | Colouring & Painting
* Fireless Cooking | Abacus

12TH - 19TH MAY 2025
10 AM TO 2 PM

Age Group: 4 to 15 Years

96151 61515
Keshar villa, Sadhana Society, Professor colony chowk, Savedi, A.Nagar.


## निवड आपली सन्मानाची.. आम्हाला सदैव अभिमानाची...



महेश वेलफेअरचे विश्वस्त
**श्री. किसनलालजी बंग**
यांची रामकृष्ण पतसंस्थेच्या चेअरमनपदी
तसेच महेश वेलफेअरचे अध्यक्ष
**श्री. ओमप्रकाशजी चांडक**
यांची संचालकपदी निवड झाल्याबद्दल

हार्दिक अभिनंदन!

डॉ. विठ्ठलदास मुंदडा (उपाध्यक्ष) | सीए. संजय नावंदर (सेक्रेटरी) | सीए. ईश्वर टवाणी (खजिनदार)

विश्वस्त - चंद्रकांत काबरा, अनिल झंवर, सीए. नंदकिशोर मुंदडा, ॲड. सुनिल मुंदडा

**महेश वेलफेअर, अहिल्यानगर**


सावेडी येथील नामांकित हॉटेलसाठी

त्वरित पाहिजेत

* वेटर
* कॅशियर
* हेल्पर
* बिलिंग ऑपरेटर

संपर्क : 8208156465



## भांड्याच्या दुकानासाठी पाहिजेत
**हेल्पर/कामगार**
३ : जागा
अधिक माहितीसाठी संपर्क करा
7058018080

## अर्जंट पाहिजेत
अहिल्यानगर मधील नामांकित हॉस्पिटलसाठी

| | |
|---|---|
| वॉर्डबॉय | -15 |
| मावशी | -15 |
| स्विपर मामा | -10 |
| स्विपर भाबी | -10 |

आकर्षक पगारा सह PF ,Esic चे फायदे मिळतील
9834034452
8446790696


## ॥ ९ वे पुण्यस्मरण ॥



**स्व.सौ.अंबिका श्रीनिवास रच्चा**
स्वर्गवास - ९ मे २०१६

आठवण तुमची प्रत्येक क्षणाला,व्याकुळ करते आमच्या मनाला..
आज जरी नाही तुम्ही आमच्यात, सदैव राहतील तुमच्या आठवणी आमच्या मनात..

आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली!

: दुःखांकित :
**श्रीनिवास रामदास रच्चा**
**समस्त रच्चा परिवार** श्रमिकनगर, अहमदनगर
**समस्त गाडेपल्ली परिवार** संगमनेर
**एस.आर.सुपर शॉपी,** श्रमिकनगर, अहिल्यानगर

## मैत्रीतील राजा माणूस हरपला...



तुझ्या तेजस्वी जीवनाच्या
व्यक्तिमत्वाने आम्हाला जगायला,
हसायला व प्रेम करायला शिकवले..
तुझे जीवन एक आशिर्वाद होते..
तुझे प्रेम शब्दापलिकडले होते..
जे आम्ही आयुष्यभर
कधीच विसरणार नाही..

तुझ्या प्रेमळ स्मृतीस
भावपूर्ण आदरांजली !

**स्व. राजेंद्रजी शांतीलालजी मुनोत**
(लुणिया-मुनोत ॲण्ड कंपनी)

मुनोत परिवाराच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत..

सदैव तुझ्या आठवणीत..
**बालाजी मॉर्निंग ग्रुप सर्व सदस्य**



## काका म्हणजे आधारवड..

अहिल्यानगरचे ज्येष्ठ नेते व माजी आमदार आदरणीय
**स्व.अरुणकाका बलभीमराव जगताप** यांना
भावपूर्ण श्रध्दांजली

* शोकाकुल *
**बाबुराव रंगनाथ जाधव**
मानद सचिव-राजीव गांधी नागरी सह.पतसंस्था, अहिल्यानगर
**भारत बाबुराव जाधव**
**हॉटेल श्रीरंग** (व्हेज-नॉनव्हेज, परमिट रुम ॲण्ड बियरबार)
**आकाश बियर ॲण्ड वाईन शॉपी**
दिल्लीगेट, अहिल्यानगर

* दशक्रिया विधी *
रविवार दि. ११ मे २०२५ रोजी सकाळी ७ वा. अमरधाम, नालेगाव, अहिल्यानगर येथे



अहिल्यानगरचे ज्येष्ठ नेते व माजी आमदार आदरणीय
**स्व. अरुणकाका जगताप**
भावपूर्ण श्रध्दांजली

* दशक्रिया विधी *
रविवार दि. ११ मे २०२५ रोजी सकाळी ७ वा. अमरधाम, नालेगाव, अहिल्यानगर येथे

: दुःखांकित :
**श्री.बबनराव रंगनाथ बोरुडे | श्री.गौरव बबनराव बोरुडे**
**समस्त बोरुडे परिवार, बोरुडेमळा, अहिल्यानगर**




अहिल्यानगरचे ज्येष्ठ नेते व माजी आमदार आदरणीय
**स्व. अरुणकाका जगताप**
यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

* दशक्रिया विधी *
रविवार दि. ११ मे २०२५ रोजी सकाळी ७ वा. अमरधाम, नालेगाव, अहिल्यानगर येथे

* शोकाकुल *

| | |
|---|---|
| श्री. प्रशांत सबाजीराव गायकवाड | श्री. अनिलराव देवराम पाचपुते |
| सौ. लिलावती युवराज लाळगे | श्री. नामदेव पांडुरंग ढोकणे |
| श्री. उत्तमराव वामनराव घोगरे | श्री. बाळासाहेब बाजीराव सोनवणे |
| श्री. तान्हाजी बाबुराव गायकवाड | श्री. रामचंद्र बापुराव राळेभात |
| श्री. शंकरराव बाबुराव गायकवाड | श्री. राजु मलंगभाई फकीर |
| श्री. विजय कचरु गायकवाड | श्री. प्रकाश महादेव सदाफुले |
| श्री. सुशांत शांताराम गजे | श्री. किशोर सुर्यभान गायकवाड |
| श्री. प्रकाश पांडुरंग बोरुडे | सौ. रुक्मिणी गुलाबराव कराळे |
| सौ. विद्या विनायक काळे | श्री. व्ही.अे. सांगळे (मानद सचिव) |

श्री. प्रकाश भिमराज कराळे (व्यवस्थापक)

**सर्व सभासद व कर्मचारी वृंद..**

**अहमदनगर जिल्हा मजुर सहकारी संस्थांचा संघ मर्यादित,** अहिल्यानगर
श्रमसहकार, सहकार सभागृह रोड, मार्केटयार्ड पाठीमागे, सारसनगर रोड, अ.नगर.
फोन : ०२४१ - २४५०८९४